विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा

# यशवंतराव चव्हाण सेंटर

## वार्षिक अहवाल २०२४ -२५




# वर्ष सर्वोत्तम सेवेची..
# समर्पणाची, विश्वासाची..




मा. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त, 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०२४', मा. डॉ. राणी बंग आणि मा. डॉ. अभय बंग यांना प्रदान करताना चव्हाण सेंटरचे अध्यक्ष, मा. श्री. शरद पवार, सेंटरचे उपाध्यक्ष, मा. श्री. अरुण गुजराथी, यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार समितीचे अध्यक्ष मा. डॉ. अनिल काकोडकर.




डॉ. अभय बंग यांच्या "माझा साक्षात्कारी हृदयरोग" या मराठी पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद "My Enlightening Heart Disease" या पुस्तकाचे प्रकाशन मा. श्री. शरद पवार साहेबांच्या हस्ते, प्रकाशक मा. श्री. रामदास भटकळ व चव्हाण सेंटरचे मान्यवर पदाधिकारी

# ४०वा वार्षिक अहवाल २०२४ - २०२५

## यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

**विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा**

जन. जगन्नाथराव भोसले मार्ग,
मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी क्र. २२०२८५९८, २२०४५४६०, २२८५२३४५.
फॅक्स : २२८५२०८१, २२८५२०८२
Email: ybchavan100@gmail.com, info@chavancentre.org
Visit us: www.chavancentre.org

**शेवटच्या माणसाचे हित हेच आमचे ब्रीद**

यशवंतराव चव्हाण सेंटर

विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा

## दृष्टी

आधुनिक आणि समृद्ध समाजाच्या निर्मितीकरिता सर्व घटकांना संधी निर्माण करून देणे.

## आमची मूल्ये

सेवेची भावना । विश्वासार्हता । प्राविण्य
सर्जनशीलता । उत्तरदायित्व

## कार्यक्षेत्रे

युवा । महिला । शिक्षण
आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक । सांस्कृतिक

**विश्वासार्ह सर्वोत्तम सेवेची ४०वर्षे..**

**चार दशकांच्या प्रवासानंतर...**

आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांचे २५ नोव्हेंबर १९८४ रोजी दिल्ली येथे निधन झाले. त्या वेळी त्यांचे वय ७२ वर्षाहूनही कमी होते. त्याआधी एक वर्षापूर्वी त्यांच्या पत्नी श्रीमती वेणूताई चव्हाण यांचे निधन झाले होते, या घटनेचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला होता. व्यक्तिगत जीवनात एकाकी पण व सार्वजनिक जीवनात अस्वस्थता त्यांना एक प्रकारे पोखरत होती. या परिस्थितीत त्यांचे निधन हे अकालीच म्हणावे लागेल. अजून किमान एका दशकाची कारकीर्द त्यांच्या राजकीय,सामाजिक जीवनात त्यांना लाभायला हवी होती, अशी खंत सर्वांच्याच मनात दाटून आली होती. मात्र त्यांनी देश व राज्यासाठी जी दृष्टी दिली होती, जी कार्य संस्कृती व वर्तन संहिता घालून दिली होती आणि त्यासाठी अनेक संस्थात्मक रचना करून त्यांची भक्कम पायाभरणी केली होती. त्यामुळे आजचा महाराष्ट्र आपल्याला वैशिष्ट्यपूर्ण दिसतो. उदा. अगदी शेती, उद्योग यांपासून ते साहित्य-संस्कृती, संशोधना पर्यंत.

या दूरदृष्टीच्या नेत्याचे कार्य पुढे नेण्यासाठी स्वर्गीय वसंतदादा पाटील, दिवंगत एस एम जोशी, आदरणीय पवार साहेब व महाराष्ट्राच्या उभारणातील त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी एकत्र येऊन **यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई** या संस्थेची स्थापना १७ सप्टेंबर १९८५ रोजी केली. त्यांचा वसा आणि वारसा पुढे नेण्याचा पक्ष-पंथ, जात-धर्म निरपेक्ष संकल्प केला.

संस्थेच्या उभारणीत कालकथित दादासाहेब रूपवते, माजी केंद्रीय मंत्री अण्णासाहेब शिंदे, प्राचार्य पी बी पाटील, कमलताई विचारे, भाउसाहेब नेवाळकर, मा प मंगुडकर ,नरुभाऊ लिमये, अनंतराव पाटील, कल्लप्पांणा आवाडे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, सुधाकरराव नाईक, राम प्रधान, वि स पागे, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, बॅरिस्टर राजाभाऊ भोसले, गोविंदरावजी आदिक, बापूसाहेब खैरे, लक्ष्मण माने, हुसेन दलवाई (सिनियर) व नंतरच्या काळात मोहन धारिया अशा व इतर अनेक मान्यवर मंडळींचे योगदान झालेले दिसते.

चव्हाण साहेब हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. राजकीय, सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी महाराष्ट्र परंपरेला भक्कम अधिष्ठान मिळवून दिले. राष्ट्रीय पातळीवर उच्च स्थानी नेऊन ठेवले. प्रागतिक दिशेने राज्य त्यांनी वेगाने प्रगतीपथावर नेले.

मराठी माणूस व महाराष्ट्राचे हित यावर त्यांची नितांत निष्ठा होती. तसेच राष्ट्रीय मूल्यांवर डोळस श्रद्धाही होती. सर्वसामान्य माणसात, वंचित समाज घटकात आत्मविश्वास जागविण्याचे आणि त्यांच्या जागृत संघटित कर्तृत्त्वातून नवमहाराष्ट्राची व नवभारताची उभारणी करण्याचे मोलाचे कार्य त्यांनी हाती घेतले होते. त्यांनी दिलेली दिशा आणि दृष्टी पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरणार, यात शंका नाही.

२५ नोव्हेंबर १९८५ रोजी स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण साहेबांचे प्रथम पुण्यस्मरण कराड येथील प्रीतीसंगमावर करून संस्थेच्या कार्याची सुरुवात झाली. मुंबई येथे नरिमन पॉईंटला प्लॉट क्रमांक सात व नऊ येथील बरॅक्समध्ये संस्थेचे कार्यालय सुरू झाले. सुमारे पाच वर्षानंतर म्हणजे १९९०-१९९१ या

वर्षात संस्थेची नवीन इमारत उभी राहिली. दरम्यानच्या काळात कराड येथील विरंगुळा या चव्हाण साहेबांच्या निवासस्थानाचे खरेदीखत संस्थेने केले व त्याचे स्मृती दालनात रूपांतर केले. चव्हाण साहेबांच्या विविध कागदपत्रांचे व पत्रव्यवहाराचे संकलन करून वर्गवारी करून संरक्षित करण्याचे कार्य कराड येथे करण्यात आले. अलीकडच्या काळात चव्हाण साहेबांचे सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे येथील जन्मस्थान राज्य पुरातत्व खात्याबरोबर सामंजस्य करार करून स्मृतीसंग्रहालय म्हणून जतन करण्यासाठी संस्थेने ताब्यात घेतले. त्याची देखभाल उत्तम रीतीने करण्यात येत असून दरवर्षी शेकडो लोक या पवित्र स्थानाला भेट देत असतात.

१९८५-१९८६ साली संस्थेची मुंबई व कराड येथे कार्याची सुरुवात झाल्यानंतर पुणे, नागपूर या शहरात त्याचा विस्तार करण्यात आला आणि आत्ता राज्यातील केंद्रांची संख्या २८ झाली आहे. येत्या वर्षात उर्वरित सर्व जिल्ह्यात केंद्राची उभारणी करण्यात येईल, असा आम्हाला विश्वास आहे.

२०२४-२०२५ या वर्षीच्या कार्याचा अहवाल आपल्या हाती देत असताना गेल्या ४० वर्षातील महत्त्वाच्या उपक्रमांची नोंद घ्यावी लागेल. ६ मे १९८६ रोजी घेतलेल्या पहिल्या परिसंवादाचे शीर्षक होते.... **महाराष्ट्र कॉन्फरन्स ऑन क्रिटिकल इश्यूज, प्रॉब्लेम्स, पोटेनशियल्स अँड प्रॉस्पेक्टस** त्यानंतर पंचायत राज, पडीक जमिनी, सामाजिक परिवर्तन, सामाजिक न्याय, शेती-सहकार व नवे आर्थिक धोरण, जागतिकीकरण अश्या विषयांवर चर्चा घडविल्या. त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध केले. माहितीपट केले. विमुक्तायान नावाचा ग्रंथ भटके-विमुक्त समाजाचा ऐतिहासिक संदर्भ सांगणारा दस्तऐवज आहे. युवा, महिला, शिक्षण, आरोग्य, सांस्कृतिक विषयांवर अनेकविध उपक्रम राबविले आहेत. त्यात नाविन्याचा सतत शोध घेतला आहे. आणि आता आम्ही AI चा वेगवेगळ्या क्षेत्रांत काय परिणाम होईल याचेही विचारमंथन करत आहोत. युवा पिढीला फेलोशिप द्वारे यात सहभागी करून घेत आहोत.

आता संस्थेच्या चार दशकांच्या कार्याचे दस्ताऐवजीकरण येत्या वर्षात करण्याचा आमचा प्रयत्न राहील. संस्थेच्या कार्याची प्रक्रिया, त्यातील महत्त्वाचे टप्पे, विविध उपक्रम, विविध व्यक्ती व संस्थांचे त्यातील योगदान, काळानुरूप संस्थेच्या कार्यक्रमात झालेले बदल तसेच पुढील काळासाठी दिशा दिग्दर्शन यातून घडेल या उद्देशाने हा प्रपंच करावा असे आम्हाला मनोमन वाटते.

आपला या कार्यातील सहभाग व सूचना यांचे मन:पूर्वक स्वागत आहे.

या चार दशकात संस्थेच्या उभारणीत आणि वाटचालीत योगदान देणाऱ्या सर्व ज्ञात - अज्ञात व्यक्ती, संस्था, संघटना, देणगीदार, हितचिंतक यांचे यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने अंतकरण पूर्वक आभार. तसेच अशीच साथ - सोबत यापुढेही मिळत राहील, हीच इच्छा आणि अपेक्षा.

आपली,

सुप्रिया सुळे

कार्याध्यक्ष, यशवंतराव चव्हाण सेंटर.

# यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

वार्षिक अहवाल २०२४-२५

अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईचे विश्वस्त मंडळ, कार्यकारिणी मंडळ, कार्यकारी समिती, चव्हाण सेंटरच्या जिल्हा केद्राचे मा. अध्यक्ष, चव्हाण सेंटरचे विभाग प्रमुख व व्यवस्थापन | ६-९ |
| २ | यशवंतराव चव्हाण सेंटर अंतर्गत राबवण्यात येणारे उपक्रम | ९ |
| ३ | यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक व राष्ट्रीय पुरस्कार | १५ |
| ४ | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे घेण्यात आलेले महत्त्वाचे कार्यक्रम | १६ |
| ५ | विशेष कार्यक्रम /उपक्रम | १९ |
| ६ | यशवंतराव चव्हाण सेंटर माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी (YCPAIT) | १९ |
| ७ | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर उपक्रम | २१ |
| ८ | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईला मिळालेले अनुदान | २१ |
| ९ | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या विभागांमार्फत राबवण्यात आलेले उपक्रम | २२ |
| १० | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईची जिल्हा केंद्रे | ५७ |
| ११ | यशवंतराव चव्हाण सेंटरची प्रकाशने व व्हिडीओ कॅसेटस् | ८२ |
| १२ | यशवंतराव चव्हाण सेंटरची हिशोबपत्रके व संबंधित परिशिष्टे | ८५ |
| १३ | कार्यक्रमांची क्षणचित्रे | i-xviii |

# यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

ट्रस्ट रजि. ने. एफ १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. ने. एम. एम. एच. / बी. ओ. एम. - ५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८४९८, २२०४५४६० फॅक्स : २२८५२०८१/८२

## ➢विश्वस्त मंडळ सदस्य➢

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. हेमंत टकले | सरचिटणीस |
| ५. | मा. श्रीम. अदिती नलावडे | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. फ. मुं. शिंदे | सदस्य |
| ७. | मा. श्री. द. म. सुकथनकर | |
| ८. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| ९. | मा. श्री. अजित निंबाळकर | |
| १०. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | |
| ११. | मा. श्री विवेक सावंत | |
| १२. | मा. डॉ. समीर दलवाई | |
| १३. | मा. सौ. प्रभा कुलकर्णी | |
| १४. | मा. प्रा. फरीदा लांबे | |
| १५. | मा. प्रा. प्रज्ञा दया पवार | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव,
सचिव, (पदनिहाय)
नगर विकास विभाग

१७. अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव,
सचिव, (पदनिहाय)
विधी व न्याय विभाग

## ➢कार्यकारिणी मंडळ सदस्य➢

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. हेमंत टकले
५. मा. श्री. जयंत पाटील
६. मा. श्री. लक्ष्मण माने
७. मा. श्री. प्रकाश आवाडे
८. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
९. मा. श्री. जीवनराव गोरे
१०. मा. श्री. विजय शिर्के
११. मा. श्री. जयराज साळगांवकर
१२. मा. श्री. सचिन मुळे
१३. मा. श्री. राजेश टोपे
१४. मा. श्री. बाळासाहेब उर्फ शामराव पा. पाटील
१५. मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले-पाटील
१६. मा. श्री विवेक सावंत
१७. मा. श्रीम. अदिती नलावडे
१८. मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१९. अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव,
सचिव, (पदनिहाय)
नगर विकास विभाग

---

## ➢ कार्यकारी समिती➢

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरद पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. हेमंत टकले | सरचिटणीस |
| ५. | मा. श्रीम. अदिती नलावडे | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. अजित निंबाळकर | सदस्य |
| ७. | मा. श्री. जीवनराव गोरे | सदस्य |
| ८. | मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील | सदस्य |
| ९. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | सदस्य |
| १०. | मा. श्री. जयराज साळगावकर | विशेष निमंत्रित |

## यशवंतराव चव्हाण सेंटर च्या जिल्हा केंद्रांचे अध्यक्ष

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जिल्हा केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| २) | जिल्हा केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. महेश बंग |
| ३) | जिल्हा केंद्र, नाशिक | अध्यक्ष | ॲड. नितीन ठाकरे |
| ४) | जिल्हा केंद्र, छत्रपती संभाजीनगर | अध्यक्ष | श्री. अंकुशराव कदम |
| ५) | जिल्हा केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| ६) | जिल्हा केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. शेखर निकम |
| ७) | जिल्हा केंद्र, अमरावती | अध्यक्ष | श्री. हर्षवर्धन देशमुख |
| ८) | जिल्हा केंद्र, अहिल्यानगर | अध्यक्ष | श्री. चंद्रशेखर घुले पाटील |
| ९) | जिल्हा केंद्र, बीड | अध्यक्ष | श्री. अनिकेत लोहिया |
| १०) | जिल्हा केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | श्री. धर्मण्णा सादूल |
| ११) | जिल्हा केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |
| १२) | जिल्हा केंद्र, जळगांव | अध्यक्ष | ॲड. रविंद्र पाटील |
| १३) | जिल्हा केंद्र, नवी मुंबई | अध्यक्ष | श्री. प्रमोद कर्नाड |
| १४) | जिल्हा केंद्र, परभणी | अध्यक्ष | श्री. कांतारावजी देशमुख |
| १५) | जिल्हा केंद्र, नांदेड | अध्यक्ष | श्री. कमलकिशोर कदम |
| १६) | जिल्हा केंद्र, धाराशिव | अध्यक्ष | श्री. जीवनराव गोरे |
| १७) | जिल्हा केंद्र, गडचिरोली | अध्यक्ष | श्री. धर्मरावबाबा आत्राम |
| २८) | जिल्हा केंद्र, जालना | अध्यक्ष | श्री. राजेश टोपे |
| १९) | जिल्हा केंद्र, बुलढाणा | अध्यक्ष | श्री. राजेंद्र शिंगणे |
| २०) | जिल्हा केंद्र, हिंगोली | अध्यक्ष | श्री. चंद्रकांत नवघरे |
| २१) | जिल्हा केंद्र, भंडारा | अध्यक्ष | श्री. धनंजय माधवराव दलाल |
| २२) | जिल्हा केंद्र, यवतमाळ | अध्यक्ष | ॲड. आशिष देशमुख |
| २३) | जिल्हा केंद्र, कोल्हापूर | अध्यक्ष | श्री. विश्वास बाजीराव पाटील |
| २४) | जिल्हा केंद्र, सिंधुदुर्ग | अध्यक्ष | श्री. उमेश सुंदर गाळवणकर |
| २६) | जिल्हा केंद्र, पालघर | अध्यक्ष | - |
| २५) | जिल्हा केंद्र, धुळे | अध्यक्ष | श्री. श्री रमेश दाणे |
| २७) | केंद्र, कराड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब उर्फ शामराव पाटील |
| २८) | देवराष्ट्रे (जन्म घर) | | |

........................

| | | |
|---|---|---|
| १) | मानद वास्तुविशारद | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस् |
| २) | सांविधिक लेखा परीक्षक | मे. सी.व्ही.के. असोसिएटस्, मुंबई |
| ३) | अंतर्गत हिशेब तपासनीस | एम. एस. वी. पी. अँड असोसिएटस् |

## यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

| | | |
|---|---|---|
| ● **यशवंत संवाद** | **मानद संपादक** | **सौ. सुप्रिया सुळे** |
| | कार्यकारी संपादक | प्रा. योगेश कुदळे |
| | | डॉ. अनिल पाझारे |
| ● यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई | मुख्य कार्यकारी अधिकारी | श्रीमती दीप्ती नाखले |
| ● यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई | मानद कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ● यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई | राज्य समन्वयक | श्री. नीलेश राऊत |

## चव्हाण सेंटर विभाग

| | | |
|---|---|---|
| १. सृजन | सृजन प्रमुख | सौ. सुप्रिया सुळे |
| | सृजन समन्वयक | श्री. विद्याधर खंडे |
| २. कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| ४. माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | कोर्स कोऑर्डिनेटर | श्रीम. प्रज्ञा कनोजिया |
| ५. महिला विभाग | | |
| ६. युवा विभाग | संयोजक | श्री. नीलेश राऊत |
| | विभाग प्रमुख | श्री. संतोष मेकाले |
| ७. आरोग्य, दिव्यांग आणि | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| ज्येष्ठ नागरिक विभाग | समन्वयक | श्री.अभिजीत राऊत |
| | विभाग प्रमुख | श्रीम. दीपिका शेरखाने |
| ८. शिक्षण विभाग | मुख्य संयोजक | डॉ. श्री. वसंत काळपांडे |
| | मुख्य समन्वयक | डॉ. माधव सूर्यवंशी |
| | विभाग प्रमुख | प्रा. योगेश कुदळे |
| - यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | डॉ. अनिल पाझारे |
| - यशवंतराव चव्हाण रिसर्च सेंटर | संचालक | प्रा. योगेश कुदळे |
| ऑफ सोशल सायन्स (मुंबई विद्यापीठाशी संलग्नित) | | डॉ. अनिल पाझारे |
| - कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | ॲड. जयमंगल धनराज |
| ९. आदिवासी विकास केंद्र | सुकाणू समिती (मान्यवर कार्यकर्ते) | |
| | समन्वयक | श्री. प्रशांत ईखार |
| १०. यशवंतराव चव्हाण केंद्र सभागृहे | सहाय्यक-सभागृहे व्यवस्थापक | श्री. विप्लव वागदे |
| ११. लेखा विभाग | लेखापाल | श्री. महेश चौधरी |

## चव्हाण सेंटर मधील सहकारी

श्री. सुरेश पाटील, श्री. मनोज पोतदार, श्री. निवृत्ती भोर, श्रीम. मिनल सावंत-पाडावे, श्री. यतीन घोडेकर, श्री. राजेंद्र रुपवते, श्री. अनिल चिंदरकर, श्रीम.संजना पवार, श्रीम. सुकेशनी मर्चंडे-शेवडे, श्रीम. मनीषा खिल्लारे, श्रीम. भक्ती जांभवडेकर, श्रीम. पल्लवी वाघ, श्री. प्रशांत ईखार, श्री. अशोक जाधव, श्री. जयेश गुजराथी, श्री. विश्वदत्त मुळे, श्री. मंगेश शिंदे, श्री. सूरज पवार, श्री. शशांक आंबेरकर, श्री. विलास परदेशी, श्री. महेश साळवी, श्रीम. वंदना वाळिंजकर, श्री. संदीप दुर्गोली, श्रीम. तृप्ती वरवडेकर, श्रीम. माधुरी रामाणे, श्री. धनसिंग लाड, श्री. निलेश धुरी, श्री. प्रशांत कोटकर, श्रीम. सुरभी ओटावणेकर, श्री. मयूर गोलतकर, श्री. दीपक खरटमल, श्री. जितु जाधव, श्रीम. नर्मदा देवेंदर, श्री. अतुल तांडेल, श्री. विकास कळंबे, श्री. हुजेर खुरेशी, श्री. विनायक सुतार, श्री. नितीन साहू, सुरक्षा रक्षक, बागकाम कर्मचारी व स्वच्छता कर्मचारी यांनी दिलेल्या सहकार्यबद्दल आभार.

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईचा सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

## १. यशवंतराव चव्हाण सेंटरचे व्यवस्थापन :-

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार करण्यासाठी चव्हाण सेंटरतर्फे विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबवण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या या वर्षी ९ बैठका घेण्यात आल्या व विविध विषयांवर सांगोपांग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. कार्यकारी समिती बैठकांच्या तारखा १५ एप्रिल २०२४, ३ जून २०२४, ७ जुलै २०२४, ३ ऑगस्ट २०२४, ४ सप्टेंबर २०२४, २ ऑक्टोबर २०२४, २५ नोव्हेंबर २०२४, ५ जानेवारी २०२५, २८ फेब्रुवारी २०२५. तसेच या आर्थिक वर्षात विश्वस्त मंडळाच्या व कार्यकारिणी मंडळाच्या पुढीलप्रमाणे प्रत्येकी ३ बैठका झाल्या १९ सप्टेंबर २०२४, २५ नोव्हेंबर २०२४, १२ मार्च २०२५ आणि वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी घेण्यात आली.

चव्हाण सेंटरच्या हिशेबाची तपासणी प्रत्येक महिन्याला अंतर्गत हिशेब तपासनीस में एम. एस. वी. पी. अँड असोसिएटस्, यांच्यामार्फत करण्यात आली. वार्षिक हिशेब तपासणी सांविधिक हिशेब तपासनीस मेसर्स सी. व्ही. के. ॲन्ड असोसिएटस् चार्टर्ड अकाऊटंट याच्याकडून केली असून त्याचा अहवालही विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळासमोर ठेवण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकाच्या अधीन राहून प्रत्येक जिल्हा केंद्रासाठी व मुख्य कार्यालयातील विविध विभागांना खर्चाचे अंदाजपत्रक दिले असून त्यांच्याकडून खर्चाचे तिमाही अहवाल मागवून तपासण्यात आले व कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात येऊन त्रुटींची पूर्तता करून घेण्यात आली. चव्हाण सेंटरची वेबसाईट www.chavancentre.org असून ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत आहे. तसेच सेंटरचा ई-मेल ybchavan100@gmail.com; info@chavancentere.org ही आहे.

सभासद संख्या : यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईची निरनिराळ्या प्रकारच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

(१) विश्वस्त सदस्य - १७ (२) कार्यकारिणी सदस्य १९ (३) संस्थापक सदस्य- २०
(४) संस्था सदस्य - २८ (५) आजीव सदस्य ३१८

महाराष्ट्र शासनाचे दोन प्रतिनिधी विश्वस्त मंडळावर नेमलेले आहेत.

## २. यशवंतराव चव्हाण सेंटर अंतर्गत राबवण्यात येणारे उपक्रम :-

### २.१ सभागृहे

- **मुख्य सभागृह :-** यशवंतराव चव्हाण सेंटर मधील सभागृहाचा वापर चव्हाण सेंटरने आयोजित केलेले विविध कार्यक्रम तसेच निरनिराळ्या सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिषदा, चित्रपट महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. सभागृहामध्ये मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी नाटके, संगीत, सभा आदी कार्यक्रमही झाले.

- **सांस्कृतिक, रंगस्वर व ऋणानुबंध सभागृह :** सांस्कृतिक सभागृह, रंगस्वर व ऋणानुबंध सभागृह या तिन्ही सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. वरील तिन्ही सभागृहे आवश्यक त्या सर्व सोयींनी युक्त व अद्ययावत करण्यात आली आहेत. पुस्तक प्रकाशन, संगीत कार्यक्रम, एकांकिका, नाट्यस्पर्धा, वार्षिक सर्वसाधारण सभा. इ. या ठिकाणी कार्यक्रम संपन्न होतात.

- **विरंगुळा :** येथे पिकलबॉल, सृजन, प्रायोगिक नाटकांची तालीम, तसेच शनिवारी  शेतकरी बाजार, पुस्तक प्रकाशन, विविध प्रकारचे प्रदर्शन आदी कार्यक्रम हेतात.

२.२ **यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय :**

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालयाची स्थापना दि. २५ नोव्हेंबर, १९९६ रोजी झाली. यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय हे संदर्भ ग्रंथालय म्हणून ओळखले जाते. या ग्रंथालयाचे प्रमुख डॉ. अनिल पाझारे, ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक काम पाहतात व भक्ती जांभवडेकर, साहाय्यक ग्रंथपाल म्हणून काम करतात. ग्रंथालयात संदर्भ ग्रंथासोबत इतर माहितीचे स्रोत अशा सुविधांनी परिपूर्ण आहे. सभासदांना कमी वेळात हवी ती माहिती देणे, त्यांना आवश्यक असलेले ग्रंथ वा इतर साहित्य उपलब्ध करून देणे, यामध्ये चालू घडामोडी (CAS) वैशिष्ट्यपूर्ण माहिती (SDS), ऑनलाईन माहिती सेवा, इतर महत्त्वाच्या सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. उदा. ग्रंथालयात विविध नियतकालिके, MPSC UPSC या स्पर्धा परीक्षांकरिता नियतकालिकांची बांधणी करून तो संदर्भाकरिता सभासदांना उपलब्ध करून दिली जाते. समाजशास्त्र, राज्यशास्त्र, भाषाशास्त्र, प्रशासन, व्यवस्थापन, शिक्षण, महिला, औद्योगिक, इतिहास, भूगोल, शेती, कायदा, संस्कृती इ. विषयांवरील पुस्तके आहेत. चरित्र, आत्मचरित्र, धर्मकोश, विश्वकोश, गॅझिटीयर, ॲटलास, इअरबुक, इन्सायक्लोपीडीया (Encyclopedia), ई. संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यास ते विकत घेणे शक्य होत नाही म्हणून ही सर्व पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध केल्याने सर्व गरजू विद्यार्थ्यांना ग्रंथालयाकडून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत मदत होते. हे सर्व कार्य करत असताना वेळेची बचत करून जास्तीत जास्तग्रंथालय व्यवस्थापनाचे काम करावयाचे असते. त्यासाठी ग्रंथालय व्यवस्थापन प्रणालीचा (Library Information Management Software) या उपयोग होतो.

- **ग्रंथालयीन सभासद**

'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय' हे संदर्भ ग्रंथालय असून तेथे ग्रंथ वाचण्याची किंवा घरी घेऊन जाण्याची सुविधा आहे. याकरिता वार्षिक वर्गणी रु. १०००/- व अनामत रक्कम रु.५००/- आहे. सभासदांना एका वेळी दोन पुस्तके / ग्रंथ देण्यात येतात. ते पंधरा दिवसात परत करणे आवश्यक असते. संदर्भ ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करावयाचा असतो. संदर्भ ग्रंथ घरी नेता येत नाही. अनामत रकमेपेक्षा पुस्तकाची किंमत जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम भरून पुस्तक घरी नेता येते. महाविद्यालयीन व उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी

/ संशोधक यांच्याकरिता सवलतीची वार्षिक वर्गणी रु. ५००/- या सभासदांना ग्रंथ किंवा नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी / संदर्भासाठी देण्यात येतात. ते ग्रंथालयाबाहेर नेता येत नाहीत. संदर्भाकरिता येणारे विद्यार्थी सहा महिन्याकरिता फी रु.६००/- एवढी आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र यांच्या नियमाप्रमाणे ग्रंथालयाचे व्यवस्थापन संगणकीकृत करण्यात आले आहे.

**दि. ३१.०३.२०२५ रोजी ग्रंथालयाची सभासद फी व सभासदाची एकूण संख्या पुढीलप्रमाणे**

- **संयुक्त संस्था सभासदत्व (Corporate Membership)**

कॉर्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल. ५ वर्षासाठी एका वेळची वर्गणी रु.५०,०००/- आहे. अनामत रक्कम सर्वसाधारणपणे घेण्यात येत नाही, परंतु एखाद्या दुर्मीळ व किमती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी रक्कम घेण्यात येईल. एका वेळी जास्तीत जास्त १० पुस्तके दिली जातात.

- **संस्था सभासदत्व (Institutional Membership)**

यासाठी शिक्षण व संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधनसंस्था ही युजीसी, आय. सी. एस. एस.आर., आय.सी.सी.आर. किंवा आय. सी. एच. आर. यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली असावी, तर सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन, केंद्र शासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

- संस्था सभासदत्व : ना परतावा प्रवेश फी रु.१,०००/- वार्षिक वर्गणी रु.५,०००/-

- दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासदत्व: ५ वर्षांसाठी एका वेळी वर्गणी रु.२०,०००/- एका वेळी देण्यात येणारी पुस्तके एका वेळी जास्तीत जास्त १० पुस्तके दिली जातात. संयुक्त संस्था सभासदत्व व संस्था सभासदत्व.

सभासदत्व संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येते. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येते. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्यावतीने पुस्तके घेण्यास, तसेच परत करण्यास नामनिर्देशित करू शकतात. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागते. मात्र, पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे, ही जबाबदारी संस्था प्रमुखाची असते. वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार चव्हाण सेंटरला राहील.

महाविद्यालयीन विद्यार्थी वार्षिक फी रु. ५००/-, सर्वसामान्य सभासद फी रु. १०००/- अनामत रक्कम रु. ५००/-, विद्यार्थी रेफरन्स वार्षिक फी रु. ५००/-, ६ महिन्याकरिता फी रु.६००/- आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी संशोधन / सभासद, सर्वसामान्य यांची एकूण संख्या ४६१४ एकूण वर्गणी रु.१,७६,१७०/- व अनामत रक्कम रु. ४०००/- इतकी रक्कम जमा झाली आहे, तसेच सन २०२४- २०२५ या वर्षामध्ये चव्हाण सेंटरने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची विक्री करून एकूण रु. १५६६८/- इतकी रक्कम प्राप्त झाली आहे.

सन २०२४- २०२५ मध्ये ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाकडून रु. १,९८,५२८/- इतके अनुदान मिळाले. यशवंतराव चव्हाण सेंटरने सन २०२४- २०२५ वर्षांकरिता रु.५,००,०००/- इतकी रक्कम मंजूर केली होती व ग्रंथ खरेदीचा प्रत्यक्ष खर्च रु.१,००,८४२/- इतका झाला आहे. या रकमेतून वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, राम, संदर्भ खरेदी करण्यात आले आहेत.

त्यामध्ये १७४ पुस्तकांच्या खरेदीचा समावेश आहे व इतर खर्च उदा. DELNET Renewal Subscription, AIR Law Database AMC, SLIM – Library Information Management Software AMC, Online Magazine EPW (Economic Political Weekly) Renewal Subscription यांचा एकूण खर्च रु. २०,६६१/- इतका झाला आहे.

**ग्रंथालयाचे उपक्रम**

- **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन लिटरेचर**

महाराष्ट्र आज अनेक क्षेत्रांत देशाच्या पातळीवर आघाडीवर आहे. त्यापैकी एक अत्यंत महत्वाचे क्षेत्र म्हणजे साहित्य. मराठी साहित्याची साडेसातशे वर्षांची समृद्ध आणि सशक्त परंपरा केवळ मराठी समाजालाच नव्हे, तर भारतीय व आंतरराष्ट्रीय वाचकांनाही जीवनरस पुरवत आली आहे.

परिवर्तनवादी, आधुनिक मूल्यांवर आधारलेली महाराष्ट्रीय संस्कृती घडविण्यात मराठी साहित्याचा वाटा अतुलनीय आहे. सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनांची आव्हाने स्वीकारून त्यांना दिशा देण्याची ताकद मराठी साहित्याने वेळोवेळी दाखवून दिली आहे. दर पिढीतल्या तरुण लेखकांनी आपल्या लेखणीतून निर्माण केलेली नव्यता मराठी साहित्याच्या प्रवाहाला अधिक समृद्ध करून गेली आहे.

साहित्य हे जीवनातील संवेदनशीलता, प्रगल्भता आणि मूल्यजाणिवा टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य देते. आजच्या काळात तरुणाई ही भारतीय समाजातील सर्वात मोठी शक्ती असली, तरी वाढती स्पर्धा आणि जीवनातील गुंतागुंत यांमुळे ती साहित्यापासून दूर जात असल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर तरुण लेखक-लेखिकांना प्रोत्साहन देऊन त्यांच्यातील लेखनप्रेरणा जिवंत ठेवणे ही काळाची गरज आहे.

याच दृष्टीने, यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे ‘शरद पवार इन्स्पायर फेलोशिप“ ही योजना सुरू करण्यात आली आहे. संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यप्रेम सर्वश्रुत आहे. त्या वारशाचा गौरव राखत, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मानले जाणारे शरद पवार साहेब यांच्यावरील कृतज्ञतेतून, त्यांच्या ८१व्या वाढदिवसाच्या औचित्याने ही साहित्य फेलोशिप महाराष्ट्राला समर्पित करण्यात येत आहे.

ही फेलोशिप कादंबरी किंवा दीर्घकथा, नाटक, ललितेतर गद्य, बालसाहित्य, अनुवाद, विज्ञान साहित्य इत्यादी प्रकारांत लेखन करू इच्छिणाऱ्या युवा लेखक-लेखिकांसाठी आहे. निवड झालेल्या लेखकांना लेखनासाठी आर्थिक साहाय्य, उद्बोधन वर्ग तसेच आवश्यकतेनुसार मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते. त्यांच्या लेखनाची गुणवत्ता वृद्धिंगत व्हावी आणि त्यांचे पुस्तक समाजापर्यंत पोहोचावे यासाठी प्रकाशन साहाय्यदेखील दिले जाते.

या वर्षी एकूण २८८ लेखकांनी ऑनलाइन अर्ज सादर केले. त्यांपैकी ९९ प्रस्ताव प्राथमिक निवडीस पात्र ठरले. अखेरीस निवड समितीने विविध साहित्यप्रकारांतून १२ लेखक-लेखिकांची अंतिम निवड केली आहे.

| **कादंबरी (Fiction)** | **ललितेतर (Non-Fiction)** | **अनुवाद (Translation)** |
|---|---|---|
| १. अमर गोरे | १. सुरज दहागावकर | १. अक्षय शेलार |
| २. मुक्ता बाम | २. स्नेहा टोम्पे | २. सोहम पिंगळीकर |
| ३. संतोष पावरा | ३. अविनाश पोईणकर | |
| ४. अनिता सूर्यवंशी | ४. मोतीराम पौळ | |

**निवड समितीतील मान्यवर**

प्रमुख मार्गदर्शक: प्रा. नितीन रिंढे

कादंबरी / दीर्घ कथा: डॉ. प्रज्ञा दया पवार, रणधीर शिंदे, किरण येले, किरण गुरव

ललितेतर गद्य: मंजुश्री पवार, प्रमोद मुनघाटे, मुकुंद कुळे

भाषांतर: गणेश विसपुते, करुणा गोखले

विज्ञान साहित्य: शरद नावरे

बाल साहित्य: दासू वैद्य

नाटक: राजीव नाईक, डॉ. फणसळकर

- **९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन, दिल्ली**

दि. २१, २२ व २३ फेब्रुवारी, २०२५ रोजी सहृदय पुणे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे "**९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली - २०२५**" चे आयोजान स्थळ छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नागरी, तालकटोरा स्टेडीयम, नवी दिल्ली येथे करण्यात आले होते. सदर संमेलनात यशवंतराव चव्हाण सेंटरची प्रकाशित पुस्तके, शिक्षण विभागाची प्रकाशने आणि इतर प्रकाशित पुस्तके यांचा पुस्तक प्रदर्शनाकरिता स्टॉल लावला होता. याकरिता यशवंतराव चव्हाण सेंटर कडून सौ. भक्ती जांभवडेकर सोबत श्री. दत्ता बाळ सराफ व भूषण काळे होते.

- **मुंबई शहर ग्रंथोत्सव २०२४**

दि. ५ व ६ फेब्रुवारी, २०२५ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभाग - ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर यांच्या संयुक्त विद्यमाने "मुंबई शहर ग्रंथोत्सव २०२४" आयोजित केला होता. या निमित्ताने "वाचू आनंदे" परिसावंद आयोजित केला होता. या परिसंवादात डॉ. अनिल पाझारे यांना सहभागी म्हणून बोलविले होते.

आजचे आधुनिक युग हे माहितीचे युग आहे. माहितीचा महाविस्फोट आज आपल्याला बघायला मिळतो. प्रिंट मीडिया प्रामुख्याने माहितीपर पुस्तके, तत्त्वज्ञान, भाषांतरित, रूपांतरित पुस्तके या माध्यमातून आपल्याला सतत नवनवीन माहिती मिळत असते. पुस्तकासारखा खरा मित्र नाही. कारण पुस्तके ही कधीच खोटं बोलत नाहीत. ती तुम्हाला तुमच्या सभोवतालच्या परिस्थितीची जाणिवा देत असतात. अभ्यासाची पुस्तके परीक्षा उत्तीर्ण होण्याचे यश देतात; पण इतर महत्त्वाच्या विषयांवरील पुस्तके ही तुमची माहिती व ज्ञानात सातत्याने भर घालत असतात... आजच्या स्पर्धेच्या युगात सुख, शांतीचा मार्ग शोधायला माणुस जेव्हा निघतो, तेव्हा काही महत्त्वाच्या विषयावरची आशयगर्भ पुस्तके दीपस्तंभ बनतात. उदाहरण 'द मॉक व्हू सोल्ड फेरारी' किंवा 'अल्केमिस्ट' या पुस्तकांच्या कोट्यवधी प्रती जगभर खपल्या, तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग बनतो असे नाही तर ही पुस्तके आजच्या स्पर्धेच्या आणि व्यवहारी जगात यशस्वी होण्याचा मार्गही आपणास दाखवतात." असे आपले विचार मांडले.

- **Self-Personality Assessment Technique (स्व व्यक्तिमत्त्व मूल्यमापन तंत्र)**

दि. १६/०७/२०२४ रोजी Self-Personality Assessment Technique (स्व-व्यक्तिमत्त्व मूल्यमापन तंत्र) या विषयावर एक दिवसीय परिसंवाद सांस्कृतिक हॉल, वेळ दु. २.३० ते ६.०० येथे आयोजित केला होता. या परिसंवादाचे मुख्य मार्गदर्शक लेखक - जनार्दन पेडामकर होते. सदर परिसंवादात स्व - व्यक्तिमत्त्व मूल्यमापन तंत्रामुळे स्वत: कडे सर्वसामान्य दृष्टिकोनातून पाहण्याचे सामर्थ्य निर्माण होते, स्वत:च्या जीवनात दृष्टिकोनाचे नेमके स्थान आपल्या दृष्टिकोनाचा ईतर व्यक्तींवर होणारा परिणाम, आपण कोणत्या यशासाठी आणि किती पात्र आहोत याचा उलगडा, अपेक्षित यश साध्य करण्यासाठी स्वत:मध्ये कोणते बदल करायला हवेत, आपल्या यशाच्या मार्गातील अडसर ओळखता येतील, आपल्या दृष्टिकोनाचे आपल्याला मालक होण्याची किमया साधता येईल, स्वत:चे भावविश्व म्हणजे काय हे आयुष्यात प्रथमच समजून घेता येईल, स्वत: भोवती माणसांचे असलेले रिंगण (कडे) कसे असते हे समजून घेता येईल या मुद्द्यावर चर्चा झाली.

- **डॉ. अनिल पाझारे यांचे पीएचडी पूर्ण केल्या बद्दल हार्दिक अभिनंदन !**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या ग्रंथालयातील संसाधन व ज्ञान व्यवस्थापक डॉ. अनिल पाझारे यांनी Lib and Information Science मध्ये "The Effect of Information Technology on the Changing Role of Librarians" हा विषय घेऊन पीएचडी पूर्ण केली आहे.

त्यांच्या अभ्यासामुळे माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे ग्रंथपालांच्या भूमिकेत झालेले बदल आणि आधुनिक ज्ञान व्यवस्थापन क्षेत्रातील नवे मार्ग उलगडले गेले आहेत. यशवंतराव चव्हाण परिवारातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !

- **सर्वोत्कृष्ट ग्रंथपाल (लायब्ररीयन) पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन**



## ३. यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक व राष्ट्रीय पुरस्कार :-

- **मा. यशवंतराव चव्हाण साहेबांची जयंती**

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार दरवर्षी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी दि. १२ मार्च रोजी प्रदान केला जातो. पुरस्काराचे मानकरी ठरविण्यासाठी, विख्यात अणुशास्त्रज्ञ, डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय पुरस्कार निवड समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये एसएनडीटी विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. रूपा शाह, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर, अर्थशास्त्रज्ञ डॉ. नरेंद्र जाधव, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नामवंत श्री. विवेक सावंत, आर्किटेक्ट आय.एम. काद्री हे सदस्य म्हणून काम पाहतात. रु. ५ लाख, मानपत्र, शाल व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सन २०२४ चा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार, प्रख्यात समाजसेवी दांपत्य डॉ. राणी बंग आणि डॉ. अभय बंग यांना देण्यात आला. ग्रामीण आदिवासी आरोग्यसेवेसाठी समर्पित जीवन व्यतीत करणाऱ्या डॉ. राणी आणि डॉ. अभय बंग यांच्या कार्याची दखल राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली जात आहे. या डॉक्टर द्वयींनी आदिवासी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी चव्हाण सेंटरतर्फे हा पुरस्कार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ११२व्या जयंती कार्यक्रमात बंग दांपत्यास प्रदान करण्यात आला. या वेळी डॉ. अनिल काकोडकर यांनी पुरस्कारासंबंधीची माहिती दिली. चव्हाण सेंटरचे उपाध्यक्ष श्री. अरुणभाई गुजराथी यांनी आपल्या स्वागतपर प्रास्ताविकात यशवंतराव चव्हाण सेंटरच्या स्थापनेमागील भूमिका विषद करून चव्हाण सेंटरच्या तीन दशकातील कार्याचा मागोवा घेतला.

या वेळी यशवंतराव चव्हाण सेंटरचे अध्यक्ष, मा. श्री. शरद पवार आणि डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते डॉ. अभय बंग लिखित 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' या मराठी पुरस्काचा अनुवाद असलेल्या 'My Enlightening Heart Disease' चे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमास सेंटरचे सरचिटणीस, श्री हेमंत टकले, पुरस्कार निवड समितीचे सदस्य श्री. विवेक सावंत, तसेच चव्हाण सेंटरच्या कोषाध्यक्ष अदिती नलावडे, चव्हाण सेंटरचे विश्वस्त श्री. दिलीप वळसे पाटील, श्री. जीवनराव गोरे, श्री. बी. के. अगरवाल, श्री. जयराज साळगावकर, फरीदा लांबे, माजी महापौर विधी सल्लागार निर्मला सामंत-प्रभावळकर, प्रकाशक श्री. रामदास भटकळ, चव्हाण सेंटरचे पदाधिकारी, इतर सदस्य आणि मान्यवर उपस्थित होते.

- **मा. यशवंतराव चव्हाण साहेबांची पुण्यतिथी**

यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे दरवर्षी कृषी औद्योगिक समाज रचना, व्यवस्थापन प्रशासन, सामाजिक एकात्मता, विज्ञान-तंत्रज्ञान, ग्रामीण विकास, आर्थिक-सामाजिक विकास, मराठी साहित्य संस्कृती, कला क्रीडा या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस किंवा संस्थेस हे पारितोषिक व स्मृतिचिन्ह देण्यात येते.

चव्हाण सेंटरच्या वतीने देण्यात येणारे सन २०२४ चे राज्यस्तरीय पारितोषिक मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीदिनी - दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सेंटरचे अध्यक्ष, मा. श्री. शरद पवार यांच्या हस्ते ज्येष्ठ इतिहास संशोधक, डॉ. जयसिंगराव भाऊसाहेब पवार यांना प्रदान करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना, सत्य इतिहासाहाचा शोध घेऊन जे पुनर्लेखन केलं जातं ते कायमचं टिकतं, असा विश्वास डॉ. जयसिंगराव पवार यांनी व्यक्त केला. यशवंतराव विचारांसाठी लढले. शाहू-फुलेंनी रुजविलेला सामाजिक समतेचा न्याय राज्यकारभार करताना अमलात आणावा असा विचार यशवंतरावांनी सांगितला. अत्याधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये चव्हाण साहेबांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते, असे ते पुढे म्हणाले. यशवंतराव इतिहासाचे जाणकार, अभ्यासक आणि भाष्यकारही असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

डॉ. जयसिंगराव पवार यांनी इतिहासाच्या संशोधनातून इतिहासाचे वास्तविक चित्र जगासमोर मांडले, त्यांचे संशोधन नव्या पिढीसाठी मार्गदर्शक राहील, असे गौरवोद्गार चव्हाण सेंटरचे अध्यक्ष श्री. शरद पवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात काढले.

## ४. यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे घेण्यात आलेले महत्त्वाचे कार्यक्रम :-

- **स्व. श्री. शरद काळे स्मृती व्याख्यान**

यशवंतराव चव्हाण सेंटरचे सरचिटणीस, माजी सनदी अधिकारी श्री. शरद काळे यांचे ३१ मार्च २०२३ रोजी दुख:द निधन झाले. त्यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने चव्हाण सेंटरतर्फे २५ जून २०२४ रोजी चव्हाण सेंटर, मुंबई येथे डॉ. अभय बंग यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. "भारतात अल्कोहोल: वैज्ञानिक भूमिका व सामाजिक उपाय" या विषयावर डॉ. बंग यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. बंग 'सर्च' या संस्थेच्या माध्यमातून गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भागात वैद्यकीय सेवा आणि संशोधन कार्य करतात. त्यांचे स्वानुभव सांगताना ते म्हणाले की, दारू नीतीची अंमलबजावणी करून मद्यपान करणाऱ्यांचे प्रमाण गडचिरोलीत ६८ टक्क्यांवरून २१ टक्क्यांवर आणले आहे. त्यामुळे गडचिरोलीत राबवण्यात येत असलेला 'मुक्तिपथ' हा प्रकल्प महाराष्ट्रासाठी पथदर्शी प्रकल्प ठरू शकेल, असा विश्वास डॉ. बंग यांनी व्यक्त केला.

या स्मृती व्याख्यानाच्या आयोजनामध्ये शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेली 'प्रथम' ही स्वयंसेवी संस्था तसेच एशिॲटिक सोसायटी ऑफ मुंबई यांचाही पुढाकार आहे. या वेळी चव्हाण सेंटरचे सरचिटणीस श्री. हेमंत टकले, माजी मुख्य सचिव श्री. अजित निंबाळकर, शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेली 'प्रथम' या स्वयंसेवी संस्थेच्या संस्थापक-संचालक श्रीमती फरीदा लांबे, एशिअटिक सोसायटीच्या अध्यक्ष प्रो. विस्पी बालापोरिया, विविध स्तरातील अनेक मान्यवर, दिवंगत श्री. काळे यांचे कुटुंबीय व आप्तेष्ट आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

- **सामाजिक संस्था संघटनांची राज्यव्यापी विचारमंथन आणि निर्धार परिषद**

विविध सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये निरनिराळ्या समाजघटकांसाठी कार्य करणाऱ्या संविधानप्रेमी, लोकशाहीवादी विचारांच्या सर्व स्वयंसेवी संस्था व सामाजिक संघटनांचे मान्यवर पदाधिकारी कार्यकर्ते तसेच, साहित्यिक, कलावंत, पत्रकार यांची एक-दिवसीय राज्यव्यापी विचारमंथन व निर्धार परिषद दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहामध्ये घेण्यात आली.

या एक-दिवसीय परिसंवादामध्ये जे मुद्दे मांडले गेले, त्यांची सोडवणूक करणे आणि त्याद्वारे जनतेचे जीवन सुसह्य करण्यासाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थांच्या पाठीशी चव्हाण सेंटर कायम ताकदीने उभे राहील,

अशी ग्वाही आदरणीय शरद पवार यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात दिली. परिषदेस चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष, मा. सौ. सुप्रिया सुळे, सेंटरचे सरचिटणीस मा. हेमंत टकले, तसेच सामाजिक चळवळींमध्ये कार्यरत असणाऱ्या, प्रतिभा शिंदे, उल्का महाजन, अॅड. जयदेव गायकवाड, नितीन वैद्य, डॉ. शाम मानव, सुभाष लोमटे, सुरेश खोपडे, सुभाष वारे, युनोस तांबोटकर, माधव बावगे, कॉम्रेड धनाजी गुरव, संभाजी भगत, ब्रायन लोबो, अविनाश पाटील, सुरेखा दळवी, प्रसाद कुलकर्णी, श्रीकांत शंकर आणि विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते श्री.माधव नावगे उपस्थित होते.

- **कविवर्य ना. धों. महानोर पुरस्कार प्रदान सोहळा**

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई आणि भवरलाल अँड कांताबाई जैन फाउंडेशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा कविवर्य ना. धों. महानोर पुरस्कार वितरण सोहळा १९ सप्टेंबर २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या सभागृहात पार पडला.

कवी महानोर यांच्या नावाने साहित्य आणि शेती-पाणी या तीन क्षेत्रात लक्षणीय योगदान देणाऱ्या राज्याच्या प्रत्येक विभागातील होतकरू युवक-युवतींना एकूण सहा पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष असून यावर्षी गोंदिया जिल्ह्यातील लेंडेझरी येथील शीला खुणे आणि यवतमाळ जिल्ह्यातील आष्टी गावाच्या वर्षा हाडके यांना शेती-पाणी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी तर गणेश घुले, औरंगाबाद; महेश लोंढे, बारलोणी, सोलापूर; नामदेव कोळी, कडगाव, जि. जळगाव; आणि प्रदीप कोकरे, मुंबई या गुणवंतांना साहित्य क्षेत्रात दिलेल्या योगदानासाठी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रत्येकी रोख रुपये २५ हजार, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

चव्हाण सेंटरचे अध्यक्ष, आदरणीय शरद पवार यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. सेंटरच्या कार्याध्यक्ष, मा. सौ. सुप्रिया सुळे, जैन फाऊंडेशनचे अध्यक्ष, श्री. अशोक जैन, ना. धों. महानोर यांचे कुटुंबीय, चव्हाण सेंटरचे उपाध्यक्ष अरुण गुजराथी, सरचिटणीस हेमंत टकले, चव्हाण सेंटरचे विश्वस्त टेक्नोक्रॅट विवेक सावंत, साहित्यिक प्रज्ञा दया पवार, शिक्षणतज्ज्ञ फरिदा लांबे, जैन फाउंडेशनचे पदाधिकारी, सेंटरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दिप्ती नाखले तसेच विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने या पुरस्कार सोहळ्यास उपस्थित होते.

पुरस्कार वितरण कार्यक्रमानंतर श्री. शंभू पाटील व सहकारी यांनी परिवर्तन, जळगाव निर्मित 'तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल' हा वारकरी व संतपरंपरेचा शोध घेणारा संगीतमय कार्यक्रम सादर केला.

- **शरद काळे स्मृती व्याख्यान – व्याख्याते : श्री. कुमार केतकर**

प्रदीर्घ सनदी सेवेतील निवृत्तीनंतर जवळपास दोन तप यशवंतराव चव्हाण सेंटरचे सरचिटणीस म्हणून कार्यरत राहिलेले स्व. श्री. शरद काळे यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने यशवंतराव चव्हाण सेंटर, प्रथम शिक्षण उपक्रम आणि एशिॲटिक सोसायटी ऑफ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १९ ऑक्टोबर २०२४ रोजी त्यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत आणि राज्य सभेचे माजी खासदार, श्री. कुमार केतकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री. केतकर यांनी 'भारत आणि जग: सद्य:स्थिती' या विषयासंदर्भात विविध संदर्भ देत सविस्तर माहिती दिली. यशवंतराव चव्हाण सेंटरचे विश्वस्त

अजित निंबाळकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. व्याख्यानास श्री. हेमंत टकले, राज्याचे माजी मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, माजी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी, ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, डॉ. विजय केळकर, स्व. शरद काळे यांच्या पत्नी सुनीती काळे, कन्या सुचित्रा काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

- **मुंबई शांघाय कॉन्फरन्स (३० ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर २०२४)**

मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर ही राज्याच्या सर्वांगीण विकासाला वाहिलेली महाराष्ट्रातील प्रमुख संस्था आहे. त्यामुळे चीनच्या शांघाय शहरात आयोजित केलेल्या आगामी "जागतिक शहर दिन २०२४" ग्लोबल परिषदेत यशवंतराव चव्हाण सेंटरला सहभागी होण्यासाठी मुंबईतील पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाच्या कॉन्सुलेटने आमंत्रित केले होते. ही परिषद ३० ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत संपन्न झाली. शांघाय येथे होणाऱ्या "उत्तम जीवन शैलीसाठी लोक-केंद्रित शहरे तयार करणे" आणि शाश्वत शहरीकरणावर ज्ञानाची देवाणघेवाण, धोरण संवाद आणि सहयोग यासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ म्हणून काम करेल, अशी या परिषदेची थीम होती. या प्रतिष्ठित परिषदेत भारताचे प्रतिनिधी म्हणून यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दिप्ती नाखले यांच्या नेतृत्वाखाली आठ सदस्यीय शिष्टमंडळ पाठविण्यात आले होते. या शिष्टमंडळात नगररचनाकार आणि पर्यावरणतज्ज्ञ गौतम कीर्तने; लेखक, जेष्ठ पत्रकार आणि शिक्षणतज्ज्ञ श्रीराम पवार; Project Mumbai संस्थेचे संस्थापक शिशिर जोशी; बारामती येथील एआयसी-एडीटीचे कृषी संशोधक डॉ. विवेक भोईटे; जेष्ठ नगर रचनाकार ॲलन अब्राहम; नवभारत माध्यम समूहाचे जेष्ठ पत्रकार प्रशांत बारसिंग; आणि साप्ताहिक विवेकचे कार्यकारी संपादक निमेश वहाळकर यांचा समावेश होता.

यशवंतराव चव्हाण सेंटरला या महत्त्वाच्या व्यासपीठावर सहभागी होण्याची संधी मिळाली याबद्दल सेंटरच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रिया सुळे यांनी आनंद व्यक्त केला. भारतातील सर्वसमावेशक शहरी जीवनशैली निर्माण करण्याच्या आमच्या व्यापक दृष्टिकोनाशी संबंधित शाश्वत विकासावर विचारांची देवाणघेवाण करण्यास आणि आमचे कार्य अविरत पुढे नेण्यास आम्ही उत्सुक आहोत. तसेच मुंबई-शांघाय सिस्टर सिटी रिलेशनशिपला चालना देण्यासाठी आमच्या कामाचा विस्तार करण्यास चव्हाण सेंटर उत्सुक आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. शहरी विकासासाठी यशवंतराव चव्हाण केंद्राच्या दृष्टिकोनाला आकार देण्यासाठी श्री सुधींद्र कुलकर्णी यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शांघाय येथे होणाऱ्या जागतिक परिषदेत चव्हाण केंद्र सहभागी होत आहे. भारत आणि चीन यांच्यातील मैत्री आणि सहकार्य वाढवण्याच्या प्रयत्नांमध्ये त्यांचा दीर्घकाळ सक्रिय सहभाग राहिला आहे, असे गौरवोद्गार सुप्रिया सुळे यांनी काढले.

- **साहित्य कला संवाद २०२५**

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट आणि यशवंतराव चव्हाण सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४-५ जानेवारी २०२५ रोजी "साहित्य – कला संवाद २०२५, विद्वेषाच्या काळात प्रेमाचा उद्धार" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष, मा. सौ. सुप्रिया सुळे, सेंटरचे सरचिटणीस, मा. श्री. हेमंत टाकले, विख्यात पत्रकार-विचारवंत श्री. कुमार केतकर, अभिनेते श्री. अमोल पालेकर, चित्रपट दिग्दर्शक श्री. नागराज मंजुळे, कवयित्री प्रा. नीरजा, श्री. नितीन वैद्य, श्री. प्रमोद निगुडकर, प्रकार श्री. युवराज मोहिते, तसेच इतर मान्यवरांसह साने गुरुजी स्मारक ट्रस्टचे पदाधिकारी सुद्धा उपस्थित होते.

साहित्य, काला अधिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमाला मुंबईतील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **काळा-घोडा आर्ट फेस्टिवल**

सन २०२२-२३ पासून यशवंतराव चव्हाण सेंटर 'काळा-घोडा आर्ट फेस्टिवल'मध्ये सहभागी होत आहे. चव्हाण सेंटर आणि काला घोडा असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ दरम्यान "काळा घोडा आर्ट फेस्टिवल २०२५" चे आयोजन करण्यात आले. या वेळी क्रॉस मैदान येथील महोत्सवामध्ये यशवंतराव चव्हाण सेंटरच्या उपक्रमांचा प्रचारात्मक स्टॉल लावण्यात आला होता. तसेच यशस्विनी प्रकल्पांतर्गत महिलांनी बनविलेल्या विविध उत्पादनांची जाहिरात व विक्री करण्यासाठी स्टॉल रॅम्पार्ट रोड येथे लावण्यात आला होता. या स्टॉल्सना चांगला प्रतिसाद लाभला.

- **वसुधैव कुटुंबकम (३ फेब्रुवारी २०२५)**

यशवंतराव चव्हाण सेंटर, प्रभात चित्र मंडळ आणि विस्डम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी, प्रख्यात चित्रपट निर्माते व दिग्दर्शक, श्री. आनंद पटवर्धन यांच्या डॉक्युमेंटरी फिल्म "वसुधैव कुटुंबकम (द वर्ल्ड इज फॅमिली)" या चित्रपटाचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. ज्येष्ठ पत्रकार, कुमार केतकर, डॉ. भालचंद्र मुणगेकर, चित्रपट निर्माते व दिग्दर्शक, आनंद पटवर्धन, विस्डम फाउंडेशनच्या संचालक, झिनत शौकत अली, प्रभातचे श्री. संतोष पाठारे यांनी चर्चासत्रामध्ये भाग घेतला.

## ५. विशेष कार्यक्रम / उपक्रम :-

### ५.१ शरद पवार इंस्पायर फेलोशिप

मागील चार वर्षांपासून साहित्य, शिक्षण आणि शेती या क्षेत्रामध्ये काही करू पाहणाऱ्या तरुणांना अनुक्रमे १२, ४० आणि ८० फेलोशिप दिल्या जातात.

## ६. यशवंतराव चव्हाण सेंटर माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी (YCPAIT) :

- AIT: 25 Years of Innovation & Impact

अकॅडेमी ऑफ इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी (YCC) म्हणजेच माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनी (चव्हाण सेंटर)

सी-डॅक ही भारत सरकारच्या कम्युनिकेशन्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाची एक वैज्ञानिक संस्था आहे. सी-डॅकची प्रगत संगणक प्रशिक्षण शाळा विविध आयटी अभ्यासक्रमांच्या डिझाइन आणि वितरणाद्वारे आयटी उद्योगासाठी उच्च दर्जाचे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी समर्पित आहे. हे अभ्यासक्रम भारतातील अधिकृत प्रशिक्षण केंद्रांच्या नेटवर्कद्वारे दिले जातात. माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनी (AIT) हे सी-डॅकच्या सर्वात प्रतिष्ठित केंद्रांपैकी एक आहे.

एआयटी मध्ये कॉर्पोरेट मानक प्रयोगशाळांसह आधुनिक पायाभूत सुविधा आहेत. या नवीनतम तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधांसह सुसज्ज प्रयोगशाळा आहेत. तंत्रज्ञान आणि सॉफ्ट स्किल्ससाठी उद्योगातील सर्वोत्तम प्राध्यापकांशी संबंधित राहण्याचा या केंद्राला अभिमान आहे.

एआयटीला सी-डॅक ACTS द्वारे 'सातत्यपूर्ण सर्वोत्तम कामगिरी पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे. हे केंद्र प्रगत अभ्यासक्रमांसाठी लोकप्रिय आहे, म्हणजेच पीजी डिप्लोमा इन अॅडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग (PG-DAC).

- Unlock Your Future with AIT

तसेच आजच्या वेगवान डिजिटल जगात, पुढे राहणे म्हणजे तुमच्या टीमच्या कौशल्य विकासात गुंतवणूक करणे. संगणक अभ्यासक्रमांमधील आमचे कॉर्पोरेट प्रशिक्षण कोर्सेस तुमच्या कर्मचाऱ्यांना सतत विकसित होणाऱ्या तांत्रिक परिदृश्यात भरभराटीसाठी आवश्यक असलेल्या नवीनतम ज्ञान आणि साधनांनी सुसज्ज करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.

- Elevate Your Team's Skills

वरील संक्षिप्त माहितीशी निगडित अनेक प्रशिक्षण कोर्सेस एआयटीने ह्या वर्षात केले. आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जगात माहिती तंत्रज्ञान किती महत्वाचे आहे हे आपण सगळे जाणतोच. एआयटी ने एक महिन्याचा कृत्रिम बुद्धिमत्तेचा कोर्स सुरू केला आहे. तसेच पायथन, आय ओ टी सारखे कोर्सेस आपल्याकडे उपलब्ध झाले आहेत.

शाळकरी मुलापासून अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांसाठी अनुरूप असे कोर्सेस चव्हाणसेंटर म्हणजेच अकादमी ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (AIT) येथे उपलब्ध आहेत.

मंतालयातर्फे अकादमी ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (AIT) मध्ये मान्नालायाच्या जनरल ऍडमिनिस्ट्रेशन डिपार्टमेंटच्या ६५० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

अकादमी ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (AIT) ने प्रथम एज्युकेशन फौंडेशनच्या कर्मचाऱ्यांसाठी Advanced Excel कोर्सची खास बॅच घेण्यात आली. त्याचप्रमाणे अकादमी ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (AIT) ने Alvino Consultancyच्या कर्मचाऱ्यांसाठी Advanced Excel कोर्स घेण्यात आला. NCC GP HQ MUMBAI B च्या कर्मचाऱ्यांसाठी कोर्सेस उपलब्ध करून दिले.

MKCL च्या MS-CIT त्याचप्रमाणे KLiC Certificate Courses ना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. उन्हाळीसुट्ट्यांमध्ये MS-CIT, KLiC Certificate Course in Advanced Tally, KLiC Certificate Course in Graphic Designing, KLiC Certificate Course in Advanced Excel यांना जास्त मागणी होती.

त्याचप्रमाणे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माहिती तंत्रज्ञान अकादमीच्या Basic Computeers, Basic Programming C-DAC च्या PerCAT (Preparatory course for CCAT), Certificate Course in Full Stag, ई. कोर्सेससाठी उत्तम प्रतिसाद मिळाला.

दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी काही खास Combo Courses उपलब्ध करून देत आहे. या कोर्सेसचा विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने नक्कीच फायदा होईल.

गरजू आणि अपंग विद्यार्थांना माफक दारामध्ये शिक्षण उपलब्ध करून देण्याची संधी अकादमी ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी देते. अनेक कोर्सेस मध्ये पडताळणी नंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. अकादमी ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी तर्फे लष्कर आणि पोलीस खात्यातील व्यक्ती आणि त्याचे कुटुंब यांना फीमध्ये सवलत दिली जाते.इच्छुक आणि शैक्षणिक पत्राता असलेल्या विद्यार्थ्यासाठी फी टप्प्या टप्प्याने भरण्याची सुविधा देण्यात येते.

## ७ यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर उपक्रम :-

● **प्रथम मुंबई शिक्षण उपक्रम :-** मुंबई शहरात झोपडपट्टीवासीयांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून बालवाड्या चालविणे, संगणकाचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून या उपक्रमाकरिता शिक्षक शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्त्वपूर्ण कामे प्रथम मुंबई शिक्षण उपक्रमामार्फत डॉ. माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर केली जातात. संस्थेच्या उपक्रमास चव्हाण सेंटरकडून सहकार्य करण्यात येते. या संस्थेचे कार्यालय चव्हाण सेंटरच्या केंद्रीय इमारतीच्या चौथ्या मजल्यावर आहे.

● **युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स :-** युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य चव्हाण सेंटरच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व सहकार या सामाजिक क्षेत्रांच्या भरीव वृद्धीसाठी ते फार महत्त्वाचे आहे. युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे निरनिराळ्या क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करून घेता येईल, याची माहिती प्रसिद्ध केली जाते. या संस्थेचे कार्यालय चव्हाण केंद्र इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर आहे.

● **महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ :-** महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरू करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे, चिकित्सक पद्धतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देण्याचे काम ही संस्था करते. संस्थेतर्फे उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई व सदरची संस्था परस्पर सहकार्याने काम करतात. महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे कार्यालय केंद्र इमारतीतील तिसऱ्या मजल्यावर आहे.

● **बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाऊंडेशन (मुंबई फर्स्ट) :-** मुंबई फर्स्ट ही संस्था बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज आणि बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन या संस्थांच्या पुढाकाराने व औद्योगिक / वाणिज्य क्षेत्रातील अनेक आस्थापनांच्या आर्थिक पाठबळावर १९९५ मध्ये अस्तित्वात आली. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येचे आव्हान स्वीकारून येथील पायाभूत सुविधांमध्ये विकास करून नागरिकांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे, काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि भांडवली गुंतवणूकदारांना आकर्षित करणे हे आहे. मुंबई शहराच्या विविध प्रश्नांवर विचार करण्यासाठी शासन, महानगरपालिका व इतर स्वयंसेवी संस्था यांचे समन्वयक म्हणून ही संस्था कार्य करते. या संस्थेचे कार्यालय चव्हाण सेंटरच्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर आहे.

## ८ यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईला मिळालेले अनुदान :

यशवंतराव बव्हाण सेंटर, मुंबईला सन २०२४-२५ मध्ये रु. ८,६२,३९,५२८/- (आठ कोटी बासष्ट लाख एकोणचाळीस हजार पाचशे अठ्ठावीस) इतकी रककम देणगी म्हणून प्राप्त झाली आहे.

# ९. यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या विभागांमार्फत राबवण्यात आलेले उपक्रम :-

## ९.१ महिला विभाग

- **यशस्विनी सन्मान सोहळा**

तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने १९९४ साली जाहीर केलेल्या महिला धोरणाला २२ जून २०२४ रोजी ३० वर्षे पूर्ण झाली. याच ऐतिहासिक दिवसाचे महत्व लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने 'यशस्विनी सन्मान सोहळा' आयोजित करण्यात आला. राज्यातील सामाजिक, साहित्य, कृषी, पत्रकारिता, उद्योजकता आणि क्रीडा प्रशिक्षण या सहा क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहा यशस्विनींना हा पुरस्कार देण्यात आला. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे हा दिमाखदार सोहळा पार पडला. आदरणीय पवार साहेब यांच्या हस्ते व पद्मश्री अनु आगा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी वंदनाताई चव्हाण, हेमंत टकले, जयदेवराव गायकवाड, यशवंतराव चव्हाण सेंटरचे पुणे जिल्हा केंद्र अध्यक्ष अजित निंबाळकर, जिल्हा केंद्र सचिव अंकुश काकडे, प्रशांत जगताप, रोहिणीताई खडसे, मृणालिनी वाणी, भारती शेवाळे, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या सीईओ दिप्ती नाखले, लोकप्रतिनिधी व सहकारी यांच्यासह महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. रुपये २५ हजार, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

या कार्यक्रमात स्त्रीकेंद्री आत्मभान जपत मराठी कवितालेखनाला अनुभव व अभिव्यक्तीचे एक नवे परिमाण देणाऱ्या "ललददास्य ललबाय" या कविता संग्रहाच्या लेखिका मीनाक्षी पाटील(मुंबई) यांना 'यशस्विनी साहित्य सन्मान', स्वावलंबी शेतकरी महिला संघटना चालवणाऱ्या पर्यावरणस्नेही कलावती सवंडकर (हिंगोली) यांना 'यशस्विनी कृषी सन्मान', एकल स्त्रियांना सक्षमीकरणाकडे समर्थपणे घेऊन जाणाऱ्या आणि स्त्रियांच्या शोषणाचे प्रश्न शासन दरबारी मांडून हजारो महिलांच्या जीवनात सकारात्मक बदलाची पहाट आणणाऱ्या रुक्मिणी नागापुरे (बीड) यांना ''यशस्विनी सामाजिक सन्मान पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. विविध माध्यमातून आपली पत्रकारितेची छाप समाजमनावर उमटवणाऱ्या संध्या नरे पवार(मुंबई) यांना 'यशस्विनी पत्रकारिता सन्मान', आपल्या उद्योगाच्या माध्यमातून हजारो महिलांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या राजश्री गागरे (भोसरी-पुणे) यांना 'यशस्विनी उद्योजकता सन्मान, शूटिंग एंड राइफल ट्रेनिंग' क्षेत्रामधील निष्णात महिला प्रशिक्षक श्रद्धा नलमवार (नाशिक) यांना 'यशस्विनी क्रीडा प्रशिक्षक सन्मान' पुरस्कार देण्यात आला.

यशवंतराव चव्हाण सेंटर आयोजित यशस्विनी सन्मान सोहळ्याचे औचित्य साधून आदरणीय पवार साहेब आणि माजी खासदार पद्मश्री अनु आगा यांच्या शुभहस्ते 'धोरण कुठवर आलं ग बाई' (राज्य महिला धोरण : तीन दशकांचा आढावा) या अभ्यासपूर्ण पुस्तकाचे प्रकाशन बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे करण्यात आले.

आदरणीय पवार साहेब यांच्या दूरदृष्टीमुळे महिलांसाठी स्वतंत्र धोरण जाहीर करून त्याची योग्य व यशस्वी अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले होते. त्या ऐतिहासिक निर्णयास यंदा ३० वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने महिलाच्या धोरणाचा इतिहास, प्रवास, फायदा, परिणाम अशा विविध बाबींचा अभ्यासात्मक आढावा घेण्यासाठी पत्रकार संध्या नरे-पवार संपादित 'धोरण कुठवर आलं ग बाई' हे पुस्तक सकाळ प्रकाशन यांनी प्रकाशित केले आहे.

- **यशस्विनी प्रकल्प अंतर्गत 'सुगरण' महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक पाऊल**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि रिलायन्स स्मार्ट सुपर स्टोअर यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्विनी उपक्रमांतर्गत महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी 'सुगरण' हा उपक्रम चालू करण्यात आला आहे. या अंतर्गत महिला बचतगटांच्या उत्पादनांसाठी राज्यातील रिलायन्स सुपर स्टोअरमध्ये दर शनिवार, रविवारी स्टॉल उपलब्ध करून दिले आहेत. राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये एकूण ३७ स्टोअर्स सुरू केले आहेत. कळवा आणि पुणे हे स्टोअर्स सर्वात जास्त विक्री करणारे आहेत. भीमथडी जत्रा, कालाघोडा फेस्टिवल, उम्मेद, सरस, सुगी, गावरानसारख्या प्रदर्शनात त्यांचा सहभाग वाढत आहे.

- **महिला बचतगटांचे स्टॉल्स काला घोडा आर्ट फेस्टिवलमध्ये**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून यशस्विनी प्रकल्प चालू करण्यात आला. याअंतर्गत महिला बचत गटांनी बनविलेले उत्पादन काला घोडा फेस्टिवलमध्ये व विक्रीस ठेवले होते. या यशस्विनींच्या स्टॉल्सना भरपूर प्रतिसाद मिळाला.

- **महिला बचत गटांचे स्टॉल्स भीमथडी यात्रा २०२५ मध्ये**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून चालू केल्याल्या यशस्विनी प्रकल्पाअंतर्गत महिला बचतगटांनी बनविलेले उत्पादन भीमथडी यात्रेमध्ये प्रदर्शनास व विक्रीस ठेवले होते. या यशस्विनींच्या स्टॉल्सना भरपूर प्रतिसाद मिळाला. पुणे, अहिल्यानगर, नाशिक, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील महिला बचत गटांना ह्यामध्ये संधी मिळाली.

- **घरेलू कामगार महिलांसाठी कौशल्य प्रशिक्षण कोर्स (घरकाम महिलांना प्रगतीच्या मार्गाकडे घेऊन जाणारा कार्यक्रम)**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या महिला विभागाअंतर्गत व प्रथम यांच्या सयुंक्त विद्यमाने Domestic Worker Upward Mobility Program (घरेलू कामगार कौशल्य प्रशिक्षण कोर्स) १५ ऑगस्ट २०२४ रोजी रोज सायंकाळी २ तास सुरू करण्यात आला होता. ह्या कोर्समध्ये साधारणपणे २५ महिलांना प्रशिक्षण दिले. ७ दिवसांच्या प्रशिक्षणात कमी वेळात जास्त कामे कशी करायची हे शिकविले गेले. वैयक्तिक स्वच्छता, नीटनेटकेपणा, संभाषण, नवीन कौशल्ये कशी आत्मसात करावीत, नवीन शक्यतांचा शोध घेणे इत्यादींवर देखील चर्चा करण्यात आली. त्यातून महिलांना अधिक कामे मिळाली. महिलांसाठी त्यांच्या दैनंदिन कामातून हा एक स्वागतार्ह बदल होता. त्यांना शिकता येणाऱ्या अनेक नवीन गोष्टी, त्यांच्यामध्ये वाढलेला आत्मविश्वास आणि त्यांच्या कामातून वेळ वाचवून शारीरिक स्वच्छता आणि स्वत:ची काळजी घेण्याचे महत्त्व, ते करत असलेल्या कामात कौशल्ये वाढवणे, त्यांचा वैयक्तिक विकास आणि त्यांच्या कामातील कौशल्ये वाढवणे.

- **यशवंतराव चव्हाण सेंटर मधील विरंगुळा येथे दर शनिवारी भरणाऱ्या आठवडी बाजारामध्ये महिला बचतगटांच्या महिलांची दिवाळी निमित्त फराळ विक्री**

महिला बचतगटातील महिला सुगरण बाजारपेठ अंतर्गत मोठ्या प्रमाणावर त्यांचे खाद्यपदार्थ विक्री करत आहे आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याबरोबरच त्या आता नव्याने भरारी घेऊ लागल्या आहेत. AI च्या युगात महिला बचत

गटातील महिलांची digital बाजारपेठ झाली आहे. त्याअंतर्गत सुगरण महिलांचा ह्या वर्षीचा दिवाळी फराळ परदेशातही पोचला.

- **महिलांचे हक्क व अधिकारविषयी जनजागृतिपर सत्र**

यशवंतराव चव्हाण सेंटर महिला विभाग आयोजित विधी संवाद अंतर्गत महिलांचे हक्क व अधिकार विषयी जनजागृती सत्र कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दि. ८ एप्रिल २०२४ रोजी कै. नामदेव बंडोजी खंडोजी चव्हाण विद्यालय धायरी, सिंहगड रोड, पुणे या ठिकाणी करण्यात आले होते. अँड. परिक्रमा अरुणा जयप्रकाश खोत ह्यांनी दैनदिन जीवनात मुलींसंबंधी कायदे व त्यांचे अधिकार अतिशय सोप्या भाषेत त्यांना समजावून सांगीतले. जेणेकरून प्रत्येक युवती तिचा अधिकार आणि सुरक्षिततेबद्दल जागरूक होऊ शकेल.

दि.१० जून २०२४ ला चेंबूर मधील आनंदनगर वस्तीतील कामगार महिलांसाठी, दि. २३ जुलै २०२४ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी आणि वांबोरी गावात, दि.२८ ऑगस्ट २०२४ रोजी नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत, दि.२७ सप्टेंबर २०२४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील हळदी आणि कुरुंदवाड येथील महिलांसाठी, दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील बोल्हेगाव येथील लोकनेते मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील युवतींसाठी आयोजित करण्यात आले.

घटस्फोट, हिंदू विवाह कायदा, कार्यालयात लैंगिक हिंसा आणि छळ विरुद्ध कायदा, महिलांना कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या लैंगिक हिंसाचार आणि छळापासून कायदेशीर संरक्षण देण्यासाठी पॉश-द सेक्सुअल हैरेसमेंट ऑफ विमेन ऑट वर्कप्लेस, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण नियम, हुंडा बंदी कायदा, बलात्कारा पीडितांना मदत आणि पुनर्वसनासाठी सुधारित योजना इ. विषयावर मार्गदर्शन केले.

## ९.२ आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक विभाग

- **मोफत आरोग्य तपासणी शिबिर**

कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन, स्पॉन्सर बाय पॉवरिका लिमिटेड आणि स्वर्गीय श्री सदानंद सेठ मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श विद्यालय, भांडुप पश्चिम येथे २७ जून आणि १० जुलै २०२४ रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कर्करोगासारख्या गंभीर आजाराचे अनेक प्रकार या जगात आढळतात. आपल्याला कर्करोग हा आजार गंभीर आहे हे तर माहीत आहेच, पण त्याची सुरुवातीची लक्षणे नक्की काय आहेत ? फक्त तंबाखूमुळे कॅन्सर होतो असा समज फार पूर्वी होता, पण विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या नवीन नवीन शोधाने कर्करोगाचे इतर प्रकारही समोर आले. पण आजही जनमानसात कर्करोगाबद्दल हवी तशी जागरूकता नाही किंवा त्याबद्दल काही माहिती नाही. त्या दृष्टीने थोडी जागरुकता निर्माण करावी उद्देशाने ह्या आरोग्य तपासणीच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण २२० महिलांनी आपला सहभाग नोंदविला. जवळील परिसरातील सर्व गरजू व्यक्तींना या शिबिराचा लाभ घेता आला.

या शिबिरात समुपदेशक, नियमित रक्त चाचणी, स्त्री चिकित्सा (स्तन व गर्भाशय तपासणी) कान, नाक, घसा तपासणी, आणि शरीर चिकित्सा आदी तपासणी करण्यात आली.

या प्रसंगी कॅन्सर एड असोसिएशनचे प्रमुख नीता मोरे, सहप्रमुख मीनल परब, स्वर्गीय श्री सदानंद सेठ मित्र

मंडळाचे अध्यक्ष संजीव सदानंद, सौ. प्रिया संजीव कुमार तसेच मल्लिका दुराई, शाळेच्या मुख्याध्यापिका करंडणा गावडे, सोमनाथ निंबाळकर, शिक्षक, शिक्षिकेतर कर्मचारी उपस्थित होते.

- **दिव्यांगांसाठी कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने दिव्यांगांसाठी कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळे चे आयोजन जिल्हा केंद्र पुणे कार्यालय येथे करण्यात आले होते. ही कार्यशाळा दिनांक २ ३ ते २ ६ ऑगस्ट दरम्यान जिल्हा केद्र पुणे येथील सभागृहामध्ये संपन्न झाली. ह्या कार्यशाळेतून सहभागींना वायरपासून दागिने बनविण्याचे प्रशिक्षण दिले गेले.

कार्यशाळे पहिल्या दिवशी सहभागींनी चांगला प्रतिसाद नोंदवला. कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी सिद्ध दिव्यांग फाउंडेशनचे फाउंडिंग डायरेक्टर मा. उदय मेहेता, मा. संजय रुणावत सिद्ध फाउंडेशन, पुण्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि सृष्टी संस्था, पुणेचे संस्थापक मा. प्रशांत कोठडिया, मा मिनिता पाटील, मा. निलेश माशेले आदी उपस्थित होते.

- **मुंबई -'रिमझिम धारा.. पाऊस वारा'**

संस्थेच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांच्या संकल्पनेतून यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी, युवक आणि बालके (intergenerational bonding) उपक्रमा अंतर्गत आज रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी 'अंतर्नाद' टीम द्वारे 'रिमझिम धारा.. पाऊस वारा' हिंदी आणि मराठी गाण्यांचा संगीतमय कार्यक्रम आयोजित केला गेला. त्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून ज्येष्ठ नागरिक, तसेच विल्सन कॉलेजच्या रोट्रॅक शाखेचे विद्यार्थी, वाघे हायस्कूलच्या विद्यार्थी व परिसरातील वस्तीतील विद्यार्थ्यांनी गाण्याच्या तालावर थिरकत मनमुराद आनंद लुटला. या प्रसंगी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दिप्ती नाखले उपस्थित होत्या. तसेच विभागातील नागरिक व विविध स्तरातील मान्यवरांनी आवर्जून उपस्थिती लावली.

- **ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा व ज्येष्ठ नागरिक कृतज्ञता सन्मान**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने दिनांक ६ ऑक्टोबर २ ० २ ४ रोजी ज्येष्ठ नागरिकांसाठी दरवर्षीप्रमाणे आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये निवडक ज्येष्ठ नागरिकांना व एका ज्येष्ठ नागरिक संस्थेला पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

ठाणे येथील श्रीमती विजया शिंदे, स्वत:च्या पुढाकारातून मराठवाड्यात महिला संघटन वाढवून असंख्य सांस्कृतिक आनंद मेळाव्याचे आयोजन करणाऱ्या बीड येथील श्रीमती कमल बारुळे, समाजात एकता, न्याय आणि समतेचे बंध आपल्या कार्यातून विणणारे पुणे येथील श्री. ज्ञानेश्वर खरात, धरण क्षेत्रातील असंघटित कामगारांच्या हक्कांसाठी कायद्यांच्या चौकटीत राहून न्याय मिळवून देणारे कोल्हापूर येथील श्री. सोमनाथ गवस, गांधी आणि विनोबा भावे यांच्या पथदर्शी विचारांवर चालणारे अकोला येथील श्री. विनायक बोराळे यांना 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय ज्येष्ठ नागरिक कृतज्ञता सन्मान' प्रदान करण्यात आला तसेच यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय ज्येष्ठ नागरिक संघ/संस्था कृतज्ञता सन्मान जळगाव येथील ज्येष्ठ नागरिक संघास प्रदान करण्यात आला. या सन्मान प्रदान सोहळ्यासाठी उच्च नायायालायाचे न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. एखाद्या विशिष्ट ठिकाणी राहणारे रहिवासी आणि नागरिक यात एक फरक आहे.

रहिवासी होणं ही काही मोठी गोष्ट नव्हे, तर तुम्ही उत्तम नागरिक आहात का, हे पाहणे जास्त महत्वाचे ठरते. माणसाने नेहमी याचकाच्या भूमिकेत राहण्यापेक्षा द्यायला शिकले पाहिजे, तर त्या जगण्याला किंमत येते, असे यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या आनंद मेळाव्या प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वांचा यथोचित सन्मान करून गौरविण्यात आले. यावेळी फेस्कॉमचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे, मुंबईच्या माजी महापौर ॲड. निर्मला सामंत प्रभावळकर तथा सेंटरचे मा. विश्वस्त व मा. पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

- **'ज्येष्ठांचा पथदर्शक' पुस्तकाचे प्रकाशन**

राज्यस्तरीय परिषदेत 'ज्येष्ठांचा पथदर्शक' या पुस्तकाच्या मराठी व इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पुस्तकाचे लेखक मा. डॉ. अनघा तेंडुलकर-पाटील आणि मा. ॲड. प्रमोद ढोकले यांनी ह्या पुस्तक रचनेबाबत माहिती दिली. चव्हाण सेंटरने या पुस्तकाची निर्मिती केली असून डिजिटल वर्क्स यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिकांसंबंधीचे संयुक्त राष्ट्र संघटनेचे धोरण, केंद्र आणि राज्य सरकारचे ज्येष्ठ नागरिक धोरण याची माहिती,सायबर फ्रॉड पासून कसा बचाव करावा, इच्छापत्र व वैद्यकीय इच्छापत्र कसे बनवावे, वार्धक्यातील व्याधींवरील नवीन तंत्रज्ञाने केलेली मात, डिजिटल तंत्रज्ञान ज्येष्ठांसाठी कसे आणि किती उपयुक्त आहे याची माहिती, आरोग्य आणि आहार विषयक टिप्स, संपत्ती आणि जीविताचे रक्षण अशा अनेक विषयांवर या पुस्तकात माहिती संकलित करण्यात आली आहे. परांजपे स्कीमचे व्यवस्थापकीय संचालक शशांक परांजपे हे या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. परांजपे स्कीमच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांनी सरू केलेल्या अथश्री योजनेबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिली. चार सत्रांत पार पडलेल्या या एक दिवसीय परिषदेत निर्मलाताई सामंत प्रभावळकर, अभिजित मुरुगकर, डॉ. कल्याणी मांडके डॉ. समीर दलवाई, मा. भक्ती वाळवे, मा.हेमराज पारकर, मा.वारस पटेल, मा.राजश्री गावडे, मा.ख्याती शेखर, मा.अमेय अग्रवाल, मा.अमिषा प्रभू, मा.विधी शहा, डॉ.अनघा तेंडुलकर-पाटील, ॲड. प्रमोद ढोकळे, यांच्यासह चव्हाण सेंटरचे अन्य पदाधिकारी सहभागी झाले होते.

- **खेळातील अडथळे दूर करू या !**

यशवंतराव चव्हाण केंद्र - दिव्यांग सक्षमीकरणासाठी एकत्रित पाऊल या विषयावरती एक दिवसाचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. हे चर्चासत्र दिनांक २६ ऑक्टोबर २०२४ रोजी चव्हाण सेंटर मधील सांस्कृतिक सभागृहामध्ये संपन्न झाले. या चर्चेमध्ये स्पोर्ट्स फॉर युनिक एथलेट्स या संस्थेनी व त्यांच्या क्रीडा शिक्षकांनी सहभाग घेतला होता. अपंगत्व आणि खेळांशी संबंधित समस्यांचे परीक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे कारण खेळ हे दीर्घकाळापासून अपंगत्व असलेल्या आणि नसलेल्या व्यक्तींसाठी ओळख, सामाजिक समावेश आणि वैयक्तिक समाधानाचे स्रोत राहिले आहेत. खेळांद्वारे, लोक आत्मसन्मान, आत्मविश्वास आणि शारीरिक क्षमता निर्माण करू शकतात, ज्याचा त्यांच्या एकूण आरोग्यावर आणि कल्याणावर लक्षणीय परिणाम होऊ शकतो.

दिव्यांगांसाठी अनुकूल खेळांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक फायदे, सुलभ क्रीडा सुविधा, साधनसामग्री व तंत्रज्ञानाची आवश्यकता, सहकार्य, धोरणात्मक सुधारणा व समाजाची सक्रिय सहभागिता अशा अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली.

- **दिव्यांग हक्क कायदा – २०१६**

नॅशनल सेंटर फॉर प्रमोशन ऑफ एम्प्लॉयमेंट फॉर डिसेबल्ड पीपल (NCPEDP) यांच्या पुढाकाराने, महात्मा गांधी सेवा संघ व यशवंतराव चव्हाण केंद्र यांच्या सहकार्याने, तसेच बजाज फिनसर्व यांच्या मदतीने महाराष्ट्रातील दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांबाबत (RPWD कायदा, २०१६) स्थिती व प्रगतीवर एक महत्त्वपूर्ण सल्लामसलत बैठक आयोजित करण्यात आली होती. दिनांक १ ३ नोव्हेंबर २०२४ रोजी सेंटर च्या ऋणानुबंध या सभागृहामध्ये ही चर्चा विविध संस्थेमार्फत आलेले दिग्गज यांच्या समवेत पार पडली. "समावेशक पद्धती व टिकाऊ वकिली उपक्रम" या प्रकल्पांतर्गत आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्रातला पहिला टप्पा ठरला.

बदलासाठी सक्षमीकरण: दिव्यांग व्यक्तींसाठी समावेशक व अडथळेमुक्त भविष्याकडे महाराष्ट्र एकत्रित! या विषयाला घेऊन चर्चेची सुरुवात झाली. या विषयावर काम करणारे सर्व मान्यवर यांनी आपापली मते यावर मंडली.

RPWD कायद्याच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त दिव्यांग व्यक्ती, वकील, स्वयंसेवी संस्था, नागरी समाज व विविध हितधारक एकत्र आले. महाराष्ट्रातील दिव्यांग समावेशनातील आव्हाने व संधींचा आढावा घेण्यात आला. अंमलबजावणीतील महत्त्वाच्या त्रुटींची चर्चा करून उपाययोजना सुचवण्यात आल्या.

RPWD कायदा २०१६ ने दिव्यांग हक्कांचा व्याप्ती वाढवत २१ प्रकारच्या दिव्यांगत्वांना मान्यता दिली (१९९५ च्या कायद्यात केवळ ७ प्रकारांना मान्यता होती). तरीदेखील महाराष्ट्रासमोर राज्य आयुक्तांची नेमणूक, दिव्यांग प्रकरणांसाठी विशेष न्यायालये व सुलभ पायाभूत सुविधा उभारणी यांसारखी मोठी आव्हाने उभी आहेत. महाराष्ट्र आर्थिकदृष्ट्या प्रबळ राज्य असल्याने समावेशकता वाढविण्यासाठी नावीन्यपूर्ण आणि शाश्वत उपाययोजना राबवण्यास सक्षम आहे. असे NCPEDP चे कार्यकारी संचालक अर्मान अली म्हणाले:

"भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील ऐतिहासिक निर्णयाने दिव्यांग व्यक्तींसाठी सुलभता हा मूलभूत हक्क म्हणून मान्यता दिली आहे. दीर्घकाळ चाललेल्या वकिली प्रयत्नांना यश मिळून आता केंद्र व राज्य सरकारांना दिव्यांगांच्या हक्कांना प्राधान्य द्यावे लागेल. या सल्लामसलतींद्वारे हक्क व धोरणांविषयी जागृती अधिक व्यापक होणार आहे." कायदे, धोरणे व नियम दिशा दाखवतात, परंतु खरी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाचो ठोस ठराव, अधिसूचना आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे दिव्यांग क्षेत्रासाठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतूद आवश्यक आहे. या निधीअभावी RPWD कायदा २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी कठीण ठरते असे मत अभिजीत राऊत, समन्वयक आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक, यशवंतराव चव्हाण केंद्र यांनी व्यक्त केले.

"सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था व दिव्यांग संघटना खूप सक्रिय आहेत, पण बहुतेक वेळा त्या वेगवेगळ्या मुद्द्यांवर स्वतंत्रपणे काम करतात. प्रभावी योजना व अंमलबजावणीसाठी सर्वांनी एकत्र येणे अत्यावश्यक आहे. या महत्त्वपूर्ण प्रवासाची सुरुवात होत आहे, असे महाराष्ट्रातील आव्हानांवर बोलताना श्री. विजय कान्हेकर, सचिव, महात्मा गांधी सेवा संघ (MGSS) म्हणाले.

महाराष्ट्रातील RPWD कायद्याच्या अंमलबजावणीवरील सविस्तर स्थिती अहवाल तयार करणे. या अहवालाच्या आधारे पुढील धोरणात्मक निर्णय व वकिली प्रयत्नांना दिशा देणे.शासन व नागरी समाज यांना एकत्र आणून अडथळेमुक्त, सुलभ, सन्मानपूर्वक व समान संधींचे वातावरण निर्माण करणे.

महाराष्ट्र पुढे जात असताना दिव्यांग हक्कांची जबाबदारी समाजातील सर्व क्षेत्रांनी सामायिक करणे गरजेचे आहे. जागरूकता, भागीदारी आणि कृतीच्या माध्यमातून झालेली ही सल्लामसलत महाराष्ट्रासह देशभरात दिव्यांगांच्या हक्क व संधींना पुढे नेणारा महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. असे मुद्दे या चर्चेतून स्पष्ट झाले.

- **शैलेन्द्र कॉलेज, दहिसर येथे 'माइंडफुल महाराष्ट्र'**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने माइंडफुल महाराष्ट्र उपक्रमांतर्गत सोमवार, दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी शैलेन्द्र कॉलेज, दहिसर येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) विषयावर श्री. सारंग मेहता यांनी मार्गदर्शन केले व महत्त्वपूर्ण माहिती व विचार मांडले. जसे की सध्याच्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा तरुण पिढीवर काय प्रभाव पडत आहे व त्याच्या दोनही बाजू काय आहेत यावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. AI चा तरुणांवर व त्यांच्या मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम, AI च्या विविध अनुप्रयोग व दृष्टिकोनांचा शोध, AI चा सुयोग्य वापर करून राष्ट्रीय विकासासाठी योगदान, समाजात डिजिटल तंत्रज्ञान सामान्य होत असताना, पूर्वी मॅन्युअली आणि अनेकदा हळूहळू केली जाणारी कामे आणि सेवा आता स्वयंचलित तंत्रज्ञान प्रणालींद्वारे अधिक कार्यक्षमतेने पूर्ण केल्या जातात. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मधील प्रगतीमुळे या तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या संधींबद्दल उत्साह आणि वादविवाद दोन्ही निर्माण झाले आहेत.

यावर चांगले व वाईट परिणाम अशी विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणली. आणि या चर्चेला विद्यार्थ्यांनीही सक्रिय सहभाग घेत AI वर मर्यादा घालण्याची गरज आहे का? या विषयावर उत्साही वादविवाद केला.. पारंपरिक शिक्षणात, विद्यार्थ्यांना अन्वेषण, विश्लेषण आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित करून त्यांच्या शिक्षण प्रक्रियेत सक्रिय भूमिका घेण्यास प्रोत्साहित केले जाते. शिक्षणात एआयचा वापर आव्हानांशिवाय नाही. शिक्षणात आर्टिफिशियल इंटेलिजेंसच्या प्रभावी एकत्रीकरणासाठी तंत्रज्ञान आणि शिक्षण प्रक्रिया या दोन्हींची सखोल समज असणे आवश्यक आहे. असे बरेच मुद्दे विद्यार्थ्यांकडून या चर्चेमध्ये समोर आले. तसेच आपली पहिल्यापासून चालत आलेली शिक्षण पद्धती तसेच तंत्रज्ञानाचा अवाजवी वापर कसा टाळला पाहिजे. व आपली बौद्धिक क्षमता यावर होणारा परिणाम यावर प्रकाश टाकला. याचबरोबर AI चे फायदे व आव्हाने यांचा सखोल ऊहापोह केला.

- **दिव्यांग सक्षमीकरण राज्यस्तरीय परिषद -२०२५**

दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासावर व खऱ्या अर्थाने पुनर्वसनावर भर देत वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आणि प्रशासकीय पातळीवर आपण दिव्यांगांसाठी काय करू शकतो, यावर गांभीर्याने कृतिकार्यक्रम राबविण्याची गरज आहे, असे मत यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी मांडले. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या माध्यमातून आम्ही समाजासाठी सातत्याने कार्यरत आहोत, 'समाजातील प्रत्येक घटकाला न्याय आणि अधिकार मिळवून देण्याचा, आमचा प्रयत्न आहे. दिव्यांग मंत्रालयाची अवस्था बिकट झाली आहे. यंत्रणा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत नाही. ती शेवटपर्यंत पोहोचावी यासाठी आपण काय करू शकतो, यावर चर्चा व्हायला हवी असंही त्य म्हणाल्या. दिव्यांगांबद्दलच्या आवश्यक त्या सर्व बाबी सुरळीत झाल्या तरच खऱ्या अर्थाने दिव्यांगांचे सक्षमीकरण होईल, असे सांगत यासाठी आपण सर्वतोपरी साहाय्य करू, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

डॉ. समीर दलवाई, मा. डॉ. कल्याणी मांडके, आणि भक्ती वाळवे यांनी दिव्यांगत्वावर लवकर निदान व उपचार याबद्दल तंत्रशुद्ध माहिती दिली. दिव्यांगत्व येऊच नये, किंवा दुर्दैवाने आले तर त्याची व्याप्ती वाढू नये यासाठी, वेळीच निदान करणे व उपचार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मानसिक एकाग्रता व इतरही काही मानसिक व्याधींवर पाश्चात्त्य - उपचार पद्धती योग्य नसून मुलांमध्ये वस्तू मग्नतेपेक्षा मनुष्य मग्नता कशी वाढेल, याबाबत पालकांनी काळजी घ्यावी, असे यावर डॉ. समीर दलवाई यांनी सांगितले. दुसऱ्या सत्रामध्ये अमेय अग्रवाल यांनी शिक्षण, कौशल्य, रोजगार याबाबत आकडेवारीसहित संपूर्ण आराखडा मांडला. तळागाळापर्यंत दिव्यांगांचे सर्वेक्षण करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठीची जबाबदारी आपण कशा प्रकारे पार पाडली पाहिजे याबद्दल त्यांनी सूचविले.

दिव्यांगांचे कौशल्य आणि शिक्षण पाहून त्यांना विविध उपक्रमांमध्ये सामावून घेण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे मत धनंजय भोळे यांनी मांडले. अमिषा प्रभू यांनी त्यांच्या संस्थेमार्फत विविध कंपन्यांमध्ये, शासकीय, निमशासकीय संस्थांमध्ये दिव्यांगांना रोजगार मिळवून दिल्याचे सांगितले. याशिवाय शैक्षणिक पात्रता बघून आम्ही दिव्यांगांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठि कटीबद्ध आहोत, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. प्रज्ञा कनौजिया यांनी दिव्यांगांसाठी असलेले कॉम्प्युटर कोर्सेसबद्दल माहिती दिली तर डॉ. अनिल पाझारे यांनी ग्रंथालयाबद्दल सविस्तर माहिती दिली. हेमराज पारकर, वारस पटेल, राजवी गावडे आणि ख्याती शेखर यांनी या वेळी सॉल्विथॉन सादरीकरण केले. अत्याधुनिक अशा AI (Artificial Intelligence) तंत्रज्ञानाचा वापर करून दिव्यांगांच्या क्षेत्रातील विविध प्रश्नांना सोडविण्याचा सुलभ मार्ग सापडला आहे. याकडे सारंग नेरकर आणि अभिजीत मुरुगकर यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले.

तिसऱ्या सत्रामध्ये आरोग्य - विमा, दिव्यांगांचे प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID) यासंदर्भातील तांत्रिक अडचणी काय आहेत याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. चव्हाण सेंटर मार्फत विविध स्तरांवर दिव्यांगांसाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. शासन स्तरावर यासाठी पाठपुरावा केला जातो. तसेच केंद्र व राज्य सरकार मार्फत दिव्यांगांना मिळणाऱ्या सेवा व सुविधांमध्ये पारदर्शकता यावी, यासाठी विविध प्रकारचे बदल करून कायदे करण्यात येतात. त्यांची माहिती देण्यात आली. दिव्यांगांच्या आरोग्य - विम्यासाठी निरामय योजना, युनायटेड इन्शुरन्स, समावेशी सुरक्षा हेल्थ इन्शुरन्स पॉलिसी आणि इतरही बऱ्याच पोर्टल द्वारे आरोग्य - विमा उपलब्ध असल्याचे अभिजीत राऊत व डॉ. रुपेश आव्हाळे यांनी या वेळी सांगितले.

चौथ्या सत्रात दिव्यांगांसाठी असलेल्या सवलती व योजना तसेच सर्वेक्षण याबद्दल विधी शहा यांनी मार्गदर्शन केले. दिव्यांगांना मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती आदिद्वारे रोजगार उपलब्ध करून सक्षम करता येते, असे त्यांनी नमूद केले. अभिजीत मुरूगकर यांनी यावेळी बोलताना दिव्यांगांना सार्वजनिक ठिकाणी सहज व सुलभ प्रवेश मिळावा हा त्यांचा नैतिक अधिकार आहे, असे स्पष्ट केले यासाठी सुप्रीम कोर्टानेसुद्धा पावले उचलली आहेत. कायदा केला आहे. मात्र आजपर्यंत त्याची पूर्णपणे अंमलबजावणी झालेली नाही. याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. परिषदेतील प्रत्येक चर्चासत्रानंतर उपस्थितांना खुली चर्चा व प्रश्नोत्तरांची संधी देण्यात आली.

- **कृत्रिम अवयव मोजमाप व साहाय्यभूत सधने वितरण उपक्रम - २०२४**

कृत्रिम अवयव मोजमाप व साहाय्यभूत सधने वितरण उपक्रमांतर्गत ऑगस्ट २०२४ मध्ये नंदुरबार व ऑक्टोबर २०२४ मध्ये सिंधुदुर्ग येथे एकूण ३४६ लाभार्थ्यांनी लाभ घेतला.

- **(वैश्विक ओळखपत्र)**

जुलै २०२४ – २८६ प्रमाणपत्र लाभार्थ्यांना देण्यात आले.

- **कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा**

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई आणि सिद्ध फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने दिव्यांगांसाठी ऑगस्ट २०२४ मध्ये तीन दिवसीय कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये दिव्यांगांना वजनाने हलक्या व नाविन्यपूर्ण तसेच सोप्या व वैविध्यपूर्ण वायरपासून ज्वेलरी बनविण्याचे प्रशिक्षण दिले गेले. या प्रशिक्षणामध्ये नवीन कलाप्रकार शिकण्याचा आनंद उपस्थितांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. नवीन कलागुणांच्या आधारे दिव्यांगांसाठी अजून नवीन व्यवसायाच्या संधीचे दालन खुले झाले. अशा प्रकारच्या प्रशिक्षण कार्यशाळेमुळे दिव्यांग सहभागींना स्वावलंबी बनवण्याच्या नव्या वाटा मिळतील अशी प्रतिक्रिया समाजातून येत आहे. हार, कानातले, गळ्यातील विविध माळा, मोबाईल कव्हर, पिशव्या, हातातील कडे हे आणि यांसारख्या सजावटीच्या अनेक गोष्टी आता ह्या दिव्यांग महिला बनवू लागल्या आहेत. योग्य मार्गदर्शन आणि देखरेखेखाली या प्रशिक्षकांना विविध कार्यक्रमात त्यांचे प्रदर्शन मांडण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आले आहे. आज या महिला चव्हाण सेंटरच्या छताखाली अशा प्रकारच्या विविध कार्यक्रमात त्यांचे दागिने आणि वस्तू विक्रीकरिता ठेवत आहेत. कार्यशाळा आणि प्रदर्शनामध्ये आता मागणीनुसार वस्तूंची उत्पादकता वाढत आहे. यामुळे फक्त त्यांच्या आर्थिक बाबींचा प्रश्नच सुटत नाही, तर आत्मविश्वासही द्विगुणित झाला आहे. याच आत्मविश्वासाच्या आधारावर त्यांची अजून प्रगती होवो अशा शुभेच्छा !

सोलवाथॉन २०२५ हे एका शक्तिशाली आणि सामाजिकदृष्ट्या संबंधित थीमवर केंद्रित असलेले राष्ट्रीय नवे तंत्र आहे:

या उपक्रमाचा उद्देश साहाय्यक तंत्रज्ञान - शारीरिक आणि संवेदी अपंगत्व असलेल्या व्यक्तींना आधार देण्यासाठी नवोपक्रमांची रचना करणे आहे.

या स्पर्धेत राज्यभरातील आंतरविद्याशाखीय विद्यार्थी संघांना गतिशीलता उपकरणे, अंगात घालण्यायोग्य उपकरणे, संप्रेषण साधने आणि अपंग लोकांचे दैनंदिन जीवन आणि स्वातंत्र्य वाढवणारे समावेशक तंत्रज्ञान यासारख्या उपायांची कल्पना आणि नमुना तयार करण्यासाठी आमंत्रित केले आहे होते.

या उपक्रमात निवडलेल्या संघांना मार्गदर्शन, मार्गदर्शन आणि पुण्यातील राष्ट्रीय व्यासपीठावर त्यांचे नवोपक्रम प्रदर्शित करण्याची संधी मिळेल. या कार्यक्रमात विद्यार्थी, मार्गदर्शक, उद्योग नेते, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक तज्ज्ञ आणि नवोपक्रम भागीदार एकाच सहयोगी मोहिमेअंतर्गत एकत्र येतील: तंत्रज्ञानाद्वारे समावेश.

## ९.३ कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम, मुंबई

- समाजातील गोरगरिब, दीनदुबळ्या व असाहाय्य लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रता किंवा मागासलेपणा मुळे अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये यासाठी योग्य ते उपाय योजावेत अशा प्रकारचे सामाजिक मार्गदर्शन आपल्या

संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतुदीला अनुसरून भारतीय संसदेने १९८७ मध्ये विधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केला आहे. त्या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक साहाय्य व सल्ला पुरविला जातो. ही योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण सेंटरमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी १९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम विभागाची निर्मिती केली आहे. या फोरममध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ही योजना राबविण्यासाठी ते आपल्याला विनामूल्य सेवा देत आहेत. 'कायदेविषयक साहाय्य व मोफत सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. सध्या सदरील फोरमचे कामकाज ॲड. जयमंगल धनराज पाहतात.

**या फोरमच्या वतीने** :-

१. समाजातील गोरगरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत कायदेविषयक तोंडी सल्ला दिला जातो.

२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नासंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला दिला जातो.

३. सामान्य लोकांना कायद्याची माहिती करून देण्यासाठी विधी साक्षरता (Legal Awareness) कार्यशाळेचे नियमित आयोजन केले जाते.

**फोरमच्या बैठका**: कायदेविषयक साहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीवावत विचार करून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, झालेल्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी, पुढील कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी मासिक बैठका घेतल्या जातात.

**फोरमच्या वतीने राबवण्यात घेणारे उपक्रम :**

**१) उपक्रम -'कायदा जनजागृती' :-** कायदा जनजागृती या उपक्रमाअंतर्गत सामान्य नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आदींना विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये विविध सामाजिक कायद्यांसंबंधी माहिती देण्यात येते.

यशवंतराव चव्हाण सेंटर, कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम आणि नंदादीप ज्येष्ठ नागरिक सेवा केंद्र –चुनाभट्टी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १८ ऑगस्ट, २०२४ रोजी स्थळ: म्युनिसिपल शाळा, चुनाभट्टी (पूर्व) येथे दु. ३:०० ते सायं. ७:०० या वेळेत ज्येष्ठ नागरिकांसाठी 'कायदा जनजागृती' या उपक्रमांतर्गत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत ॲड. प्रॉस्पर डिसोझा आणि डॉ. ॲड. प्रकाश देशमुख या वकिलांनी मोलाचे मार्गदर्शन केले. उपस्थितांनी कार्यशाळेत मांडण्यात आलेली कायद्यांच्या माहितीवर प्रश्न व शंका विचारल्या आणि माननीय वकिलांनी त्याचे निरसन केले. या कार्यशाळेत ४० लोक सहभागी झाले होते.

**२) उपक्रम -आपला कायदा जाणून घ्या :-** यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने लिगल फोरमच्या माध्यमातून कायदेविषयक जागृतीचे विविध कार्यक्रम आम्ही सातत्याने आयोजित करीत असतो, त्यापैकी 'आपला

कायदा जाणून घ्या' 'Know Your Law' हा एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम असून त्या अंतर्गत वेगवेगळ्या कायद्यांवर व्याख्यान आयोजित करण्यात येते.

भारतात नव्याने लागू झालेल्या फौजदारी कायद्यांबाबत तसेच तत्पश्चात नागरिकांच्या अधिकाराबाबत जागृतीच्या उद्देशाने 'नवीन फौजदारी कायदा आणि नागरिक' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन दि. १८ ऑक्टोबर, २०२४ रोजी सायं. ५:३० वा. सांस्कृतिक सभागृह, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे करण्यात आले होते. ॲड. निलेश पावसकर यांनी या विषयावर बहुमोलाचे मार्गदर्शन केले. फार सोप्या पद्धतीने या कायद्याची माहिती दिली. या व्याख्यानासाठी विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी व सामान्य नागरिक असे १०० जण उपस्थित होते.

## ९.४ शिक्षण विभाग

शिक्षणाला महत्त्व देऊन क्रियाशील समाज घडविण्यासाठी, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे शिक्षण विकास मंच कार्यरत आहे. २००८ साली स्व. डॉ. कुमुद बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली या मंचाची स्थापन झाली. त्यांनी दाखवलेल्या मार्गावर शिक्षण विकास मंचाची वाटचाल सुरू आहे. हा मंच शैक्षणिक प्रश्न, शैक्षणिक उपक्रम, शैक्षणिक धोरण इत्यादी बाबींवर मुख्यत्वे काम करतो. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष मा.सौ.सुप्रियाताई सुळे, शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक असून डॉ.वसंत काळपांडे मुख्य संयोजक, बसंती रॉय विशेष सल्लागार आणि डॉ.माधव सूर्यवंशी शिक्षण विकास मंचच्या कोअर टीमचे समन्वयक म्हणून जबाबदारी पाहतात. नजमा काझी, ऐनुल आत्तार, अजित तिजोरे, जयवंत कुलकर्णी, तुषार म्हात्रे, मच्छिंद्र बोऱ्हाडे, डॉ. रूपेश मोरे, महेंद्र गणपुले आणि अरविंद शिंगाडे हे शिक्षण विकास मंचचे कोअर टीमचे सदस्य आहेत. दत्ता बाळसराफ हे मानद कार्यक्रम व्यवस्थापक असून शिक्षण विभागाचे प्रमुख योगेश कुदळे आहेत आणि त्यांना साहाय्य करण्याचे काम संजना पवार करतात. कोअर टीमचे सदस्य आणि शिक्षण विकास मंचशी जोडले गेलेले राज्यभरातील आणि भारताबाहेरीलही सुमारे २०००० सदस्य पूर्णपणे स्वयंसेवी वृत्तीने काम करतात. यात प्राथमिक, माध्यमिक, आणि महाविद्यालयीन शिक्षक, शाळांचे मुख्याध्यापक, संस्थाचालक, शिक्षणतज्ज्ञ, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षण प्रेमी आणि पत्रकार यांचा समावेश आहे. शिक्षण विकास मंचाच्या माध्यमातून प्रामुख्याने शिक्षण कट्टा, शैक्षणिक साहित्य पुरस्कार, ग्रंथ निर्मिती आणि ग्रंथ पुरस्कार, शिक्षण साहित्य संमेलन, व्याख्याने, पालक मेळावे, दत्तक शाळा योजना तसेच शिक्षकांसाठी प्रशिक्षणे आणि कार्यशाळा इत्यादी उपक्रम राबवले जातात.

- **ऑनलाईन शिक्षण कट्टा : राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४**

राज्य अभ्यासक्रम आराखड्याचे पुनर्लेखन व्हावे - शिक्षण कट्ट्यावर एकमुखी मागणी

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यावर चर्चा करण्यासाठी ऑनलाईन शिक्षणकट्टा आयोजित करण्यात आला होता. या शिक्षण कट्ट्यास शिक्षण विकास मंचचे मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे, बालभारतीच्या माजी विद्यासचिव मा. धनवंती हर्डीकर, शिक्षण अभ्यासक किशोर दरक, माजी शिक्षण संचालक भाऊ गावंडे, बसंती रॉय, सूर्यकांत कुलकर्णी, भाऊसाहेब चासकर, सुभाष मोरे, सुशील शेजुळे, महेंद्र गणपुले यांची उपस्थिती होती.

सुरूवातीला ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे बोलताना म्हणाले की, 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात सर्व बाबी सविस्तर व योग्य पद्धतीने मांडल्या आहेत. राज्य अभ्यासक्रम आराखड्यात त्याचे योग्य भाषांतर व्हायला हवे होते. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यातील अनेक महत्त्वाच्या बाबी राज्य अभ्यासक्रम आराखड्यात गाळल्या आहेत. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार आपण महाराष्ट्रात नेमके काय करणार आहोत ? हे राज्य अभ्यासक्रम आराखड्यात दिसायला हवे होते. या आराखड्यात सुरुवातीलाच म्हटले आहे की, 'अनेक संस्था, व्यक्तीकडून अभिप्राय मागून हा आराखडा प्रसिद्ध केला आहे.' हा आराखडा या आधी कधी प्रसिद्ध झाला आणि कोणाचे अभिप्राय यात घेतले ते एकदा जाहीर करायला हवे.

महाराष्ट्राने सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणांच्या बाबतीत देशाचे नेतृत्व केले आहे. त्याचे प्रतिबिंब राज्य अभ्यासक्रम आराखड्यात दिसत नाही. भाषा शिक्षण या विषयी वाटते की, हा आराखडा फक्त मराठी माध्यमाच्या शाळांना विचारात घेऊनच केलेला दिसतो. मराठी बरोबरच महाराष्ट्रात अनेक भाषा माध्यमांच्या शाळा आहेत. त्यांचा विचार यात दिसत नाही.आजची राज्यातील भाषा शिक्षणाची काय स्थिती आहे ? राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात काय सुचविले आहे ? राज्यात आपण नेमके काय बदल करणार आहोत अशा या विचार राज्य अभ्यासक्रम आराखड्यात करायला हवा होता.

बालभारतीच्या माजी विद्यासचिव धनवंती हर्डीकर म्हणाल्या की, "शिक्षण विकास मंचच्या माध्यमातून राज्य अभ्यासक्रम आराखड्यातील शैक्षणिक पैलूंवर चर्चा होत आहे ही बाब खूप महत्त्वाची आहे. राज्य अभ्यासक्रम आराखडा हा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याचे सुमार दर्जाचे भाषांतर आहे. राज्य अभ्यासक्रम आराखडा हे शिक्षण क्षेत्राचा खूप महत्त्वाचा दस्ताएवज आहे. आपल्या लोकशाही देशात भारतीय संविधानाच्या तात्विक चौकटीला हे महत्त्व आहे ते शिक्षणात राज्य अभ्यासक्रम आराखड्याला आहे. त्यामुळे हा आराखडा खूप गांभीर्याने तयार व्हायला हवा होता पण तसे झालेले दिसत नाही. बोजड भाषा, अर्थांची संदिग्धता, लेखनातील चुका ह्या दुर्लक्ष करता येणार नाहीत इतक्या मोठ्या प्रमाणात आहेत. हा आराखडा हा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याचे भाषांतर आहे. तर हे भाषांतर ही प्रसिद्ध करण्यापूर्वी तपासले गेलेले दिसत नाही . हे हर्डीकर यांनी उदाहरणे देऊन स्पष्ट केले. त्यामुळे असा आराखडा शासनाने परत घेऊन पुन्हा नव्याने याचे लेखन करावे मग तो अभिप्रायार्थ ठेवावा असे मत मांडले.

शिक्षण अभ्यासक किशोर दरक म्हणाले की, 'नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये पाठांतर व घोकंपट्टी ला वाव मिळू नये म्हणून मुलांच्या कृतियुक्त शिक्षणावर भर दिला आहे. राज्य अभ्यासक्रम आराखड्यात मनाचे श्लोक वैगरे पाठांतर करायला सांगणे हे मूळ नवीन शैक्षणिक धोरणाच्या विरोधात आहे.भारतीय ज्ञानप्रणाली यात गणित विषयात भारतीय गणिती यांची यादी दिली आहे.आणि विद्यार्थ्यांनी याचा अभिमान बाळगावा असे क्षमता विधान दिलेले आहे आणि पण नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थी जागतिक नागरिक व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. जर फक्त भारतीय गणिती किंवा शास्त्रज्ञांचा अभिमान बाळगला तर विद्यार्थी जागतिक नागरिक कसा होईल असा प्रश्न त्यांनी या वेळी उपस्थित केला. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याच्या तुलनेत राज्य अभ्यासक्रम आराखड्यातील चुका आणि संदिग्धता यामुळे राज्य आराखडा समजणे कठीण आहे. त्यामुळे इतक्या चुका असलेला हा आराखडा अभिप्रायार्थ ठेवणे म्हणजे सर्वांचाच वेळ वाया घालवणे आहे. त्यामुळे हा आराखडा शासनाने परत घेऊन नव्याने समित्या गठित करून याचे पुनर्लेखन करावे असे मत मांडले.

शिक्षण अभ्यासक बसंती रॉय यांनी एनसीएफ चांगला आहे, पण राज्य अभ्यासक्रम आराखड्यात मात्र खूप संदिग्धता दिसून येते. त्याचा अनुवाद योग्य झालेला नाही, काही ठिकाणी अनावश्यक बाबी आलेल्या आहेत. या आराखड्यावर पाठ्यपुस्तके येणार आहेत मुळातच अभ्यासक्रम आराखडा आणि पाठ्यपुस्तके याबद्दल शिक्षकांमध्ये उद्बोधन करण्याची गरज आहे असे मत व्यक्त केले. अकोले-नगर येथील शिक्षक, एटीएफ या शैक्षणिक फोरमचे मुख्य संयोजक भाऊसाहेब चासकर यांनी नवीन शैक्षणिक धोरणामध्ये ज्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत, त्याच्या पूर्ततेसाठी नवीन शिक्षक भरती करावी. कला-कार्यानुभव या विषयाच्या शिक्षक भरतीकडे त्यांनी लक्ष वेधले. माजी शिक्षण संचालक भाऊ गावंडे नागपूर यांनी मराठी भाषेचे धोरण यावर आराखड्यामध्ये योग्य ती मांडणी केली नाही असे प्रतिपादन केले. शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये पाठ्यपुस्तकासंदर्भातला योग्य ती दिशा दिली नाही. विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनाबद्दल जे प्रगतिपुस्तक असणार आहे, त्याबाबत संदिग्धता कायम ठेवली आहे. अभ्यासक्रमासाठी शिक्षकाला पूर्ण स्वातंत्र्य हवे आणि ते स्वातंत्र्य या आराखड्यामधून दिसून येत नाही. असे मत मांडले. सूर्यकांत कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे प्रवक्ते महेंद्र गणपुले, मराठी अभ्यास केंद्राचे सुशील शेजुळे यांनी सुद्धा अभ्यासक्रम आराखड्याची आराखड्याचे पुर्नलेखन करून, त्यामुळे त्यावर प्रतिक्रिया आणि आक्षेप नोंदवण्यासाठी पुन्हा वेळ द्यावी अशी विनंती शासनाकडे केली. कार्यक्रमाचा समारोप यशवंतराव चव्हाण सेंटरचे कार्यक्रमप्रमुख दत्ता बाळसराफ यांनी केला. शासनाशी संपर्क साधून आगामी काळात आराखड्यासंदर्भात आणि त्याच्या बिनचूक अंमलबजावणी संदर्भात योग्य पाठपुरावा करणार असल्याचे सांगून, आराखडा पुर्नलेखन करणे आणि पुन्हा आक्षेप आणि प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी वेळ वाढवून देणे याची मागणी समारोप प्रसंगी त्यांनी केली. कार्यक्रमाचे निवेदन शिक्षण विकास मंचाचे समन्वयक डॉ. माधव सूर्यवंशी यांनी केले.

शिक्षक, मुख्याध्यापक, अभ्यासक, पत्रकार, पालक यांनी सहभाग नोंदवला होता.

- **जिल्हा समन्वयक कार्यशाळा : धनकवडी, पुणे**

शिक्षण विकास मंचाच्या जिल्हा समन्वयकांची एकदिवसीय कार्यशाळा शरद पवार बहुउद्देशीय भवन, धनकवडी, पुणे येथे रविवार दिनांक १८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत आयोजित करण्यात आली होती. पहिल्या सत्राचा प्रारंभ आपटे प्रशालेच्या हर्षा पिसाळ यांनी उपस्थित मान्यवरांच्या स्वागताने केला. कार्यशाळेस उपस्थित प्रत्येक समन्वयकांनी आपला अल्पसा परिचय करुन दिला. सुरुवातीलाच यशवंतराव चव्हाण सेंटरचे शिक्षण विभाग प्रमुख योगेश कुदळे यांनी कार्यशाळेचा उद्देश आणि रूपरेखा विशद केली. त्यांनी मागील कार्यशाळेत धनवंती हर्डीकर यांनी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे स्मरण करून दिले. मे महिन्यात देखील अशीच एक कार्यशाळा आयोजित करणे, शिक्षण विकास मंचाच्या कार्यक्रमांचे वार्षिक कॅलेंडर तयार करणे, जिल्ह्यातील समन्वयकांमध्ये समन्वय राखणे, इत्यादी बाबींचा उल्लेख केला.

शिक्षण विकास मंचचे मुख्य समन्वयक डॉ. माधवराव सूर्यवंशी यांनी आपल्या ओघवत्या शैलीत २००८ साली डॉ. कुमुद बन्सल आणि डॉ. वसंत काळपांडे यांच्या विचाराने शिक्षण विकास मंच कशी सुरूवात

झाली..? श्रीमती बसंती रॉय यांनी त्यात कशी मदत केली. त्यामागील उद्देश, कामाचे स्वरूप, सुरुवातीला असणाऱ्या अवघ्या ५६ सदस्य संख्येवरून सध्याच्या हजारोंच्या संख्येने वृद्धिंगत झालेल्या शिक्षण विकास मंचाचा गेल्या सोळा वर्षांचा टप्प्याटप्प्याने झालेला विस्तार यावर साद्यंत खुलासा केला. सध्या चालू असलेल्या विविध शैक्षणिक कामांच्या वाटचालीवर दृष्टिक्षेप टाकला. यामध्ये त्यांनी प्रतिवर्षी घेतली जाणारी राज्यस्तरीय शिक्षण परिषद, शिक्षण कट्टे, राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार, त्याची निवड प्रक्रिया, शरद पवार इन्स्पायर फेलोशिप, प्रशिक्षणे, उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथपुरस्कार, प्रश्नमंजुषा या सोबतच शिक्षण विकास मंचाच्या प्रयत्नातून साकारलेल्या ग्रंथ निर्मिती इत्यादी मुद्द्यांचा समावेश केला होता. येत्या जानेवारी महिन्यात शिक्षक साहित्य संमेलन नाशिक येथे आयोजित करण्याचा मानस असल्याचे उपस्थितांना सांगितले.

त्यानंतर राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त आणि शिक्षण विकास मंचाचे जिल्हा समन्वयक सोमनाथ वाळके यांनी मागील वर्षी अवलंबिण्यात आलेली राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्काराची निवड प्रक्रिया आणि त्या संदर्भातील अनुभवांना उजाळा दिला. शिक्षण विकास मंचाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारासाठी समन्वयकांकडून केली जाणारी नामनिर्देशन पद्धत, मुलाखती, माहितीची सत्यता पडताळा करण्यासाठी प्रत्यक्ष शाळा भेट, शाळा आणि परिसरातील संबंधित शिक्षकांबाबत असलेले लोकमानस आजमावून केली जाणारी निवड ही निश्चितच यथोचित ठरते असे त्यांनी सांगितले. ज्यांना आत्तापर्यंत कोणतेही राज्यस्तरीय अथवा राष्ट्रीय पुरस्कार मिळाले नाहीत, जे स्वतःच प्रसिद्धी वलयापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात, जे स्वतःच कुठेही स्वतःच्या नावाची शिफारस करणे टाळतात मात्र आपली शैक्षणिक कामगिरी निरपेक्ष भावनेने बजावतात अशाच शिक्षक शिक्षिकेला हा पुरस्कार दिला जातो असे त्यांनी सांगितले. पुरस्कारांची संख्या आणि रक्कम यात वाढ करता येईल का ? अशी विचारणा/ शिफारसही त्यांनी केली. यास उत्तरादाखल श्री. योगेश कुदळे सर यांनी पुढील वर्षापासून गुणवंत शिक्षक पुरस्काराची आणि उत्कृष्ट ग्रंथाची रक्कम वाढवून प्रत्येकी रुपये २१०००/ इतकी करण्यात आली असल्याचे सांगितले. पुरस्कारांची संख्या वाढविण्याच्या संदर्भातील विविध पर्यायांचा आढावा घेऊन निर्णय घेतला जाईल असे चर्चेअंती ठरले.

डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार निवडीबाबत मुंबई जिल्हा समन्वयक मच्छिंद्र बोऱ्हाडे यांनी देखील विस्तृत माहिती दिली. मागील वर्षी प्रकाशित झालेल्या एकूण ३६ पुस्तकांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यातून उत्कृष्ट ग्रंथाची निवड करणे हे किती आव्हानात्मक काम आहे हे त्यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून देत निवड समिती सदस्यांचे मनापासून कौतुक देखील केले. गतवर्षी शिक्षक आणि लेखक निलेश निमकर लिखित 'शिकता शिकवता' या ग्रंथास हा पुरस्कार देण्यात आला होता असे म्हणत उत्कृष्ट ग्रंथ निवड प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले.

यंदाच्या शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन प्रक्रियेचा शिक्षण विभाग प्रमुख योगेश कुदळे यांनी आढावा घेतला. यंदा आतापर्यंत १४६ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यात वाढ कशी करता येईल याकडे सर्व समन्वयकांचे लक्ष वेधले. या फेलोशिपच्या आतापर्यंत दोन बॅचेस झाल्या असून तिसरी बॅच सुरू आहे. फेलोजच्या विषय निवडीमध्ये तोच तोचपणा येणे योग्य नसून त्यात वैविध्य आणण्यासाठी आपण काही प्रस्तावित विषय फेलोजना द्यायला हवेत अशी सूचनाही त्यांनी केली. या कामी मान्यवर अभ्यासकांनी एखादी विषय सूची/ यादी द्यावी असे त्यांनी सांगितले. त्यानंतर कोअर कमिटी सदस्य श्री. अजित तिजोरे यांनी आगामी काळात

शिक्षण विकास मंचाच्या वतीने हाती घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांच्या रूपरेखेचा आढावा सादर केला. यामध्ये त्यांनी मागील कार्यशाळेत मा. धनवंती हर्डीकर यांनी 'शिक्षण विकास मंचाने कोणते उपक्रम हाती घ्यावेत' यावरील मार्गदर्शन लक्षात घेऊन तीन स्तरांवर सुरू असलेल्या घडामोडींची माहिती करून दिली. यापैकी- १) मंच स्तर २) समन्वयक स्तर, ३) शिक्षकांनी वैयक्तिक स्तरावर कसे काम सुरू झाले आहेत याबाबत खुलासा केला. विविध सर्वेक्षणे, शिक्षण हक्क कायदा, विविध बोर्डाच्या शाळा आणि त्यांचे अभ्यासक्रम, दर्जा, होलिस्टिक मूल्यमापन व्यवस्था यावर अभ्यास गट काम करत आहोत. मा.भाऊ गावंडे सरांचे यामध्ये मोठे योगदान आहे. समन्वय स्तरावरील विद्यार्थ्यांचे पोर्ट फोलिओ बनविणे, माजी विद्यार्थ्यांचा करिअर विषयक कार्यावर काम करण्याचा विचार आहे असे सांगितले. शिक्षण विकास मंचाने आयोजित केलेल्या दोन प्रश्न मंजुषा यांच्या सद्य: स्थितीचा मुद्देसूद आढावा त्यांनी घेतला.

भोजन अवकाश झाल्यानंतर जिल्हा समन्वयक जयवंत कुलकर्णी यांनी 'शिक्षण विकास मंचाचा सोशल मीडिया' या विषयावर माहिती दिली. यात त्यांनी शिक्षण विकास मंचाच्या फेसबुक पेजद्वारे १७,१२२ तर व्हॉट्सॲपच्या एकूण ४० समूहात सुमारें १२००० सदस्य असल्याचे सांगितले. दोन्ही समूहाचे संचालन आचारसंहितेनुसार कसे होईल, रोजचे बातमीपत्र, अन्य पोस्ट्स व महत्त्वाच्या मुद्यावर होणारी चर्चा यावर काटेकोर लक्ष ठेवण्यात सर्वच समूह प्रमुखांचे प्रयत्न उत्तम असल्याचे सांगितले. यात मुख्य समन्वयक डॉ.माधवराव सूर्यवंशी, डॉ.रुपेश मोरे, वैभव तुपे, नितीन खंडाळे आणि इतर सदस्यांचे महत्वपूर्ण योगदान मिळत असल्याने समूहात जिवंतपणा टिकून आहे असे प्रतिपादन केले. याखेरीज गेल्या वर्षापासून आपण नव्याने निर्माण केलेल्या ब्लॉगवर देखील सुमारे ५७ लेख अनेक वाचकांच्या पसंतीला उतरले आहेत असे सांगितले.

डॉ. रुपेश मोरे यांनी 'शिक्षण विकास मंचने मला काय दिले ?' यावर आपले मनोगत व्यक्त केले. समूहावर होणारी सकस चर्चा, रोजचे बातमीपत्र, मान्यवरांचे सखोल मार्गदर्शन, उपक्रमशील शिक्षकांचे नवनवीन उपक्रम, नेहमी अपडेट राहण्यासाठी जे जे काही आवश्यक आहे ते मिळण्याचे एकमात्र साधन म्हणून खूप फायदा होतो असे म्हटले. आपल्याच समूहातूनच स्फूर्ती घेऊन अनेक विषयांवर प्रथितयश वृत्तपत्रे, मासिके यामधून लिखाण करता आले. स्वत: मुख्याध्यापक म्हणून अनेक प्रशासकीय शंका, अडचणींचे समाधान, शिक्षणक्षेत्रातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व आणि त्यांचा सहवास मिळणे ही खूप भाग्याची गोष्ट आहे असे ते म्हणाले.

कार्यशाळेच्या मुख्य विषयावर अर्थात वार्षिक शिक्षण परिषद - २०२४ बाबत शिक्षण विकास मंचाचे मुख्य संयोजक आणि सर्वांचे मार्गदर्शक डॉ. वसंतराव काळपांडे सरांनी मनोगत व्यक्त केले.

दुसऱ्या सत्राच्या अखेरीस उपस्थित सर्व समन्वयकांनी आपले सूचनावजा स्वमत मांडून खुल्या चर्चेत सहभाग घेतला. यामध्ये स्नेहल चौधरी यांनी जे विषय अद्याप घेतलेच गेले नाहीत ते फेलोशीपसाठी घ्यावेत, हर्षा पिसाळ यांनी शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता कशी उपयुक्त ठरेल यावर मार्गदर्शन व्हावे, सोमनाथ वाळके यांनी रिसर्च पेपर्स प्रेझेंटेशनची सोय उपलब्ध करून देता येईल का अशी विचारणा केली. शिक्षण विकास मंचाच्या वतीने एखादे मासिक सुरू व्हावे असेही मत त्यांनी मांडले. विवेक खैरनार यांनी शिक्षण कट्ट्यांसाठी तज्ज्ञ मार्गदर्शक मिळवून द्यावेत असे सांगितले. तर डॉ. रुपेश मोरे यांनी शिक्षकांच्या शिकवण्यातील येणारे अडथळे कसे दूर करावेत, फेलोशीपचे पूर्वी झालेल्या विषयांची यादी प्रस्ताव स्विकरण्यापूर्वी देऊन त्या खेरीज इतर संभाव्य विषय निवडण्यास उद्युक्त करता येईल असे सुचविले. अप्पा सावंत यांनी उत्कृष्ट ग्रंथ आणि शिक्षक पुरस्काराप्रमाणेच

उत्कृष्ट शाळा पुरस्कारही सुरू करू शकतो का, अशी विचारणा केली. शिल्पा पाटील यांनी फेलोजना प्रकल्प आणि संशोधनपूर्व मार्गदर्शन किंवा प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून द्यावी असे मत मांडले. शिक्षण विकास मंचाच्या कोअर कमिटी सदस्य ऐनुल अत्तार मॅडम यांनी STEM चा वापर करून टीचिंग लर्निग कसे करायचे याची कार्यशाळा/ कट्टा आयोजित करता येईल का तद्वतच स्कॉलरशिप, एनएमएमएस हया परीक्षांच्या मार्गदर्शनाची व्यवस्था करावी असे विचार मांडले. रवींद्र जंगम, तुषार म्हात्रे, बतुल शेख यांनी देखील आपापली मते मांडली. या एक दिवसीय कार्यशाळेचे सूत्रसंचालन तुषार म्हात्रे सर यांनी केले. कोअर टीम सदस्य मच्छिंद्र बोऱ्हाडे सरांनी प्रत्येक समन्वयकांच्या नामोल्लेख करत आजच्या सभेतील यशस्वी योगदानाबद्दल शिक्षण विकास मंचाच्या वतीने सुमधुर आवाजात आभार मांडले आणि कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

● **७८ व्या भारतीय स्वातंत्र्यदिननिमित्त 'स्वातंत्र्यदिन प्रश्नमंजुषा-२०२४' चे आयोजन** शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने रविवार दि.१८ ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात आले होते. राज्यस्तरीय "स्वातंत्र्यदिन प्रश्नमंजुषा-२०२४" या स्पर्धेत राज्यभरातून ५६०० स्पर्धकांनी सहभाग घेऊन विक्रमी प्रतिसाद नोंदविला.

सन २०२२ पासून प्रश्नमंजुषेला आपण सुरूवात केली आहे. गतवर्षीपेक्षा या वर्षी मिळालेला प्रतिसाद उत्साह वाढवणारा आहे. याबद्दल सर्वाचे मन:पूर्वक आभार.

विशेषत: तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून ज्यांनी मदत केली ते आपल्या शिक्षण विकास मंच व्हाट्सअप समूहाचे सदस्य डॉ.शिवानी लिमये पुणे, राहुल प्रभु मुंबई, भाऊसाहेब उमाटे लातूर यांचे आभार. या सर्व प्रक्रियेची तांत्रिक बाजू सांभाळणारे कोअर टीमचे सदस्य अजित तिजोरे आणि यशवंतराव चव्हाण सेंटरचा डिजिटल मिडिया सांभाळणारे सतिश पवार व त्यांची टीम, ज्यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रश्नमंजुषा स्पर्धा पूर्णत्वास जात आहे ते म्हणजे आपले मार्गदर्शक ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ.वसंत काळपांडे सर या सर्वांचा उल्लेख मला महत्वाचा वाटतो.

या स्पर्धेत राज्यभरातून एकूण ५६०० स्पर्धकांनी सहभाग घेतला.

शालेय गट, महाविद्यालयीन गट आणि खुला गट अशा तीन विभागात ही स्पर्धा घेण्यात आली.मराठी, इंग्रजी या दोन भाषेत झालेल्या स्पर्धेस राज्यातील विविध विभागातून विक्रमी प्रतिसाद मिळाला.

तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ.शिवानी लिमये पुणे, राहुल प्रभु मुंबई, भाऊसाहेब उमाटे लातूर यांनी मदत केली. या सर्व प्रक्रियेची तांत्रिक बाजू अजित तिजोरे यांनी सांभाळली, समन्वयाचे काम डॉ.माधव सूर्यवंशी व योगेश कुदळे यांनी केले.शिक्षण कट्टयाचे जिल्हा समन्वयक, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या पूर्ण टीमने अतिशय उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेतला आणि स्पर्धकांना प्रोत्साहित केले.

● **स्वातंत्र्यदिन प्रश्नमंजुषा २०२४**

शालेय गट निकाल

१)भार्गवी मनीष भोई - नूतन विद्यामंदिर, उमरोली, जि. पालघर

२) सर्वेश अतुल पवार - जि.प. प्रा. शा. जरेवाडी, बीड

३) त्रिवेणी प्रवीण सातपुते - रेसिडेन्शिअल हायस्कूल, अहमदनगर

महाविद्यालयीन गट निकाल

१ ) नीरज गंगाधर पवार - वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था ( व्हीजेटीआय) - मुंबई

२ ) चंचल कर्ण चव्हाण - संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालय, कोपरगाव, अहमदनगर .

३ ) शेख शिफा बेगम मोहम्मद जावेद - अंजुमन इस्लाम महाविद्यालय - मुंबई

खुला गट निकाल

१ ) नवनाथ रुखमांबाई गोविंदराव दापके - छत्रपती संभाजीनगर

२ ) सुशांत संभाजीराव निकम - सांगली

३ ) शैला नवनाथ दापके - छत्रपती संभाजीनगर

- **शालेय उपक्रमाचे कॅलेडर शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस दयावे- शिक्षण कट्टयावर मागणी**

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांच्यावतीने 'शालेय उपक्रम:गरज आणि सद्य:स्थिती' या विषयावर आज अ. भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, आरे रोड, गोरेगाव (प.) मुंबई येथे शिक्षणकट्टयाचे आयोजन करण्यात आले होते.

या कट्टयाची सुरुवातीस यशवंतराव चव्हाण सेंटरचे शिक्षण विभाग प्रमुख योगेश कुदळे यांनी मान्यवर आणि उपस्थित शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक यांचे स्वागत केले.

शिक्षण विकास मंचचे मुख्य समन्वयक डॉ.माधव सूर्यवंशी यांनी शिक्षण विकास मंचच्या कार्याचा आढावा घेतला. आगामी काळातील कार्यक्रमाची माहिती उपस्थितांना दिली. आजच्या शिक्षण कट्ट्याच्या विषयाच्या संदर्भाने ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन आणि 'शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता' या विषयावर राज्यस्तरीय वेबिनार होणार असल्याची माहिती दिली.

उपक्रमशील शिक्षक आणि शिक्षण विकास मंचचे मुंबई विभागाचे समन्वयक तुषार म्हात्रे यांनी केंद्र शासन, राज्य शासन, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदा यांच्या शिक्षण विभागांकडून घेण्यात येत असलेल्या विविध शालेय उपक्रमांचा विस्तृत आढावा घेतला. दैनंदिन कामे आणि शालेय उपक्रम यांत समन्वय साधावा, असं ते म्हणाले.

शासनाकडून येत असलेल्या उपक्रमांची सद्य:स्थिती काय आहे.. ? त्याबाबत शिक्षण अभ्यासक गिरीश सामंत यांनी मांडणी केली. शालेय उपक्रमांविषयींच्या विविध प्रकारच्या आदेशांमुळे शिक्षकांना अनावश्यक ताण येतो, असं ते म्हणाले. उपक्रमांबाबत शिक्षकांनी आणि शाळांनी जबाबदारी घ्यावी.शिवाय वर्षभरातील उपक्रमांचे कॅलेडर शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस दयावे व त्यातील निवडक उपक्रम घेण्याचे स्वातंत्र्य शिक्षकांना द्यावे. केवळ शनिवार हा आनंददायी करण्याऐवजी रोजचं शिक्षण हे आनंददायी व्हायला हवं, असे प्रतिपादन त्यांनी केले.

शालेय उपक्रमांच्या माध्यमातून जीवन कौशल्यांचा विकास होतो, त्यामुळे अशा उपक्रमांमागचा विचार शिक्षकांनी समजून घ्यावा,असे शिक्षण विकास मंचच्या मुख्य सल्लागार आणि शैक्षणिक विषयाच्या अभ्यासक मा. बसंती रॉय यांनी सांगीतले. वर्ग अध्यापन आणि उपक्रम हे एकमेकांना पूरक आहेत, त्यामुळे उपक्रमांना वेगळे करता येणार नाही, असे त्या म्हणाल्या. उपक्रमांतून मुलांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते पण त्याच वेळी शिक्षक

हे सुद्धा समृद्ध होतात. अशा उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षकांची स्वत: ची ओळख निर्माण होते, असंही त्या म्हणाल्या.

या कट्टयासाठी मुंबई, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे तसेच पालघर येथून शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांनी मोठ्या प्रमाणावर चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. या कट्ट्याच्या नियोजनात कोअर कमिटीचे सदस्य अजित तिजोरे, मच्छिंद्र बोऱ्हाडे यांनी मदत केली.

- **शिक्षक दिन व डॉ.कुमुद बन्सल स्मृतिदिन**

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई आयोजित ऑनलाईन वेबिनार गुरुवार दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६ :०० ते ७:०० या वेळेत आयोजित करण्यात येणार आला .या ऑनलाइन कार्यक्रमाचा तपशील पुढीलप्रमाणे

१) डॉ.कुमुद बन्सल स्मृतिदिन-

५ सप्टेंबर हा डॉ.कुमुद बन्सल यांचा स्मृतिदिन. त्या निमित्ताने त्यांना अभिवादन करण्यात आले.

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ मा. डॉ.वसंत काळपांडे आणि मा. बसंती रॉय हया आपल्या मनोगतांतून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

२) 'शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता' या विषयावर व्याख्यान-

वक्ते-डॉ. श्रुती पानसे- अभ्यासक, मेंदू व शिक्षण.

मा. सूर्यकांत कुलकर्णी- माजी सदस्य, बाल हक्क आयोग.

- **शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांसाठी भव्य राज्यस्तरीय निबंध स्पर्धा २०२४**

यशवंतराव चव्हाण सेंटर, शिक्षण विकास मंच यांच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. ही निबंध स्पर्धा प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांसाठी घेण्यात आली होती. या निबंध स्पर्धेसाठी दोन विषय देण्यात आले होते.

१. अशैक्षणिक कामे नसतील तर शिक्षक म्हणून आत्तापेक्षा अधिक मी काय-काय करू शकेन ?

२. शिक्षकांना कोणत्या गोष्टीचे स्वातंत्र्य हवे आणि का ?

या निबंधस्पर्धेस राज्यभरातून खूप मोठा प्रतिसाद मिळाला. इंग्रजी आणि मराठी या दोन माध्यमातून घेण्यात आलेल्या या स्पर्धेत राज्यातील विविध भागांतून एकूण ८८० निबंध प्राप्त झाले. गोपनीयता राहावी यासाठी आलेल्या सर्व निबंधांना क्रमांक देण्यात आले. ज्या स्पर्धकांनी आपले नाव किंवा त्यांची ओळख पटेल असा मजकूर निबंधात लिहिला होता त्यांना बाद करण्यात आले.

त्यानंतर उर्वरित निबंधांची विषयानुसार विभागणी करण्यात आली. विषयनिहाय प्रत्येकी दहा परीक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. एकूण पाच फेऱ्यांमध्ये निबंधांची तपासणी करण्यात आली. पहिल्या फेरीत परीक्षकांना त्यांच्या विषयाचे निबंध विभागून देण्यात आले. या फेरीत प्रत्येकाच्या वाट्याला सरासरी ३० ते ४० निबंध आले. मिळालेल्या सर्व निबंधाची तपासणी करून त्यास ए,बी,सी,डी अशी श्रेणी देण्यात आली. दुसऱ्या

फेरीत पुन्हा सर्व निबंध तपासून त्यांना पहिल्या फेरीप्रमाणेच श्रेणी देण्यात आली. मात्र परीक्षकांना पहिल्या फेरीत मिळालेले निबंध आणि दुसऱ्या फेरीत मिळालेले निबंध त्याच विषयाचे असले तरी भिन्न स्पर्धकांचे होते. ज्या निबंधाला दोन्ही परीक्षकांनी ए श्रेणी दिली आहे अशाच निबंधांची निवड तिसऱ्या फेरीसाठी करण्यात आली. बी, सी, डी श्रेणी मिळालेले निबंध बाद करण्यात आले. तिसऱ्या फेरीत प्रत्येक परिक्षकाला सरासरी ८ ते १० निबंध मिळाले. या फेरीत प्रत्येक परिक्षकाला दिलेल्या निबंधातून पुरस्कारासाठी ५ निबंध निवडायचे असतील तर ते कोणते असावेत हे सुचवण्यास सांगितले गेले. तिसऱ्या फेरीमध्ये प्रत्येक परिक्षकाने निवडलेल्या पाच निबंधांना १ ते ५ असा गुणानुक्रम देऊन चौथी फेरी पूर्ण झाली. पाचव्या आणि अंतिम फेरीत संयुक्त क्रमांक पद्धती (Composite Rank Method) वापरून चार निबंधांची निवड करण्यात आली. इंग्रजी माध्यमाचा लक्षणीय प्रतिसाद लाभल्यामुळे त्यांचे दोन स्वतंत्र परीक्षकांमार्फत परीक्षण करून तिसऱ्या फेरीत एकमताने दोन्ही विषयांचा प्रत्येकी एक निबंध निवडण्यात आला. परिक्षक म्हणून शिक्षण विकास मंचच्या जिल्हा समन्वयक शिक्षकांनी आपले शाळेतील काम सांभाळून चोखपणे परीक्षण केले.

राज्यस्तरीय निबंध स्पर्धा २०२४ अंतिम निकाल

अशैक्षणिक कामे नसतील तर शिक्षक म्हणून आत्तापेक्षा अधिक मी काय-काय करू शकेन ?

१) शशिकांत नारायण कुंभार
शाळा - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केसे.
जिल्हा - सातारा

२) दीपाली प्रवीण जाधव
शाळा- जिल्हा परिषद प्राथमिक, गारवडी
जिल्हा - सातारा

३) स्वाती विठ्ठल जोशी
शाळा - मराठी विद्या मंदिर, तांबूळवाडी.
जिल्हा - कोल्हापूर

४) शुभांगी प्रकाश निंबाळकर
शाळा - जि. प. शाळा नारळवाडी
जिल्हा- सातारा

शिक्षकांना कोणत्या गोष्टीचे स्वातंत्र्य हवे आणि का ?

१) नाव - सौ. नर्मदा नरेश कनकी.
शाळा - नू.म.वि मराठी शाळा, सोलापूर.
जिल्हा - सोलापूर.

२) कृष्णा निवृत्ती साळी.
शाळा: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंजूर.
जिल्हा - ठाणे

३) नितिन बाजीराव समुद्रे
शाळा - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा शिलोंडा
जिल्हा - पालघर

४) सुरेखा तानाजी जगदाळे.
शाळा - जि.प.प्राथ. शाळा मेघलदरेवाडी
जिल्हा - सातारा

इंग्रजी माध्यम
अशैक्षणिक कामे नसतील तर शिक्षक म्हणून आत्तापेक्षा अधिक मी काय-काय करू शकेन ?
१) हेमंत किसन गवळे
शाळा - बी. एन. एन. कॉलेज, भिवंडी
जिल्हा - ठाणे

शिक्षकांना कोणत्या गोष्टीचे स्वातंत्र्य हवे आणि का ?
१) तनुजा शंकरसिंग पेनवाल
शाळा - नवोदय इंग्लिश हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, किसननगर
जिल्हा - ठाणे
सालाबादनुसार याहीवर्षी शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशनची घोषणा करण्यात आली या वर्षी निवड झालेल्या नावाचा यादी खालील प्रमाणे.

| **अनु क्र** | **प्राथमिक शिक्षक** | **जिल्हा** | **माध्यमिक शिक्षक** | **जिल्हा** |
|---|---|---|---|---|
| १ | अर्चना महादेव सांगोलकर | गडचिरोली | बाबू साहेबराव शिंदे | अहमदनगर |
| २ | स्वरदा पांडुरंग खेडेकर | पुणे | नाझिया मेहबूब पठाण | पुणे |
| ३ | सुदर्शना गणपती चौरे | सोलापूर | वैशाली जगन्नाथ दाभाडे | कोल्हापूर |
| ४ | अमोल राजेंद्र पेन्सलवार | ठाणे | प्रथमेश पांडुरंग वाघोस्कर | ठाणे |
| ५ | पद्मश्री सुभाष गुरव | कोल्हापूर | सतिश सिताराम कुंभार | कोल्हापूर |
| ६ | प्रमोद प्रकाश धायगुडे | पुणे | गणेश दऱ्याप्पा माने | सांगली |
| ७ | मंजिरी राजन मेस्त्री | सिंधुदुर्ग | निता निवृत्ती शेटे | पुणे |
| ८ | पल्लवी रमेश शिरोडे | पुणे | समीर बाबुलाल माली | सोलापूर |
| ९ | मुख्तार युसूफ़ शेख | बीड | योगेश्वर दत्तात्रय निकम | छत्रपती संभाजीनगर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | वर्षा रमेशचंद्र साळुंखे | पुणे | प्रज्वली प्रभाकर नाईक | रायगड |
| ११ | राजेश वासुदेव कोगदे | अकोला | | |
| १२ | कुंदा जयवंत बच्छाव | नाशिक | | |
| १३ | पल्लवी विश्वनाथ फुटाणे | सोलापूर | | |
| १४ | ज्योती रामनाथ कदम | नाशिक | | |
| १५ | धर्मराज सुरेश करपे | बीड | | |
| १६ | सोहनी सुभाष पुरनाळे | अहमदनगर | | |
| १७ | पूनम सचिन कडलग | पुणे | | |
| १८ | प्रदिप अमृतराव देवरे | नाशिक | | |
| १९ | निलेश सदाशिव पोरे | सातारा | | |
| २० | आनंदा बालाजी आनेमवाड | पालघर | | |

- **स्पीफ फेलोशिप कार्यशाळा खंडाळा**

‘शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन’च्या २०२४-२५च्या बॅचची कार्यशाळा श्रम साफल्य निवास खंडाळा येथे रविवार, सोमवार दि.२७, २८ ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडली. या कार्यशाळेत राज्यभरातून निवडल्या गेलेल्या फेलोजची उपस्थिती होती. या फेलोजनी जे विविध प्रकल्प विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी आणि विकासासाठी घेतले आहेत त्याचे सादरीकरण या कार्यशाळेत करण्यात आले.

या कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी प्राचार्य ह.ना. जगताप आणि डॉ.वृषाली देहडराय यांची उपस्थिती होती. मार्गदर्शक तज्ज्ञांनी प्रकल्पात आणखीन कोणत्या सुधारणा होणे आवश्यक आहे,याचे मार्गदर्शन संबंधित फेलोजना केले. समारोपाच्या वेळी शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटरचे मुख्य संयोजक ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांनी उपस्थित फेलोंशी संवाद साधला.यावेळेस यशवंतराव चव्हाण सेंटरचे कार्यक्रमप्रमुख दत्ता बाळसराफ यांची उपस्थिती होती. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी कोअर कमिटीचे सदस्य डॉ.माधव सूर्यवंशी, महेंद्र गणपुले, योगेश कुदळे, अजित तिजोरे, तुषार म्हात्रे, डॉ. रुपेश मोरे यांची मुख्य उपस्थिती होती.

- **शिक्षणकटट्यावर राज्य अभ्यासक्रम आराखडा अपेक्षा आणि वास्तवाचे सखोल विचारमंथन**

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांच्यावतीने ‘राज्य अभ्यासक्रम आराखडा-२०२४’ या विषयावर शनिवार, दिनांक ७ डिसेंबर २०२४ रोजी शिक्षण कट्टा आयोजित केला होता.

या कटयाची सुरूवात योगेश कुदळे यांनी केलेल्या स्वागताने झाली. स्वागत करते वेळी या कट्ट्याच्या आयोजनामागची भूमिका त्यांनी उपस्थितांसमोर मांडली. शिक्षण विकास मंचाचे मुख्य समन्वयक डॉ. माधव सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यात त्यांनी शिक्षण विकास मंच करत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आगामी पंधरावी राज्यस्तरीय शिक्षण परिषद रविवार दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी होणार असल्याची आणि या परिषदेचा विषय ‘राज्य अभ्यासक्रम आराखडा-२०२४’ हा असल्याचे सांगीतले सोबतच हा कट्टा म्हणजे या परिषदेची पूर्वतयारीचा भाग असल्याचे नमूद केले.राज्य अभ्यासक्रम

आराखडयावर चर्चा घडवून आणण्यासाठी आपण असे कट्टे राज्यभर घेण्याचे आणि यातून आलेल्या शिफारसी शासनाकडे पाठवणार असल्याची माहिती दिली.

या शिक्षण कट्ट्यास शिक्षण अभ्यासक, समुपदेशक आणि लेखक अरविंद शिंगाडे यांनी 'राज्य अभ्यासक्रम आराखडा -२०२४' ची महत्त्वाची वैशिष्ट्ये मार्गदर्शक अरविंद शिंगाडे यांनी त्यांच्या सादरीकरणात दिली. त्यांच्या विवेचनात त्यांनी राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण यावर प्रामुख्याने भर दिला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील शालेय स्तर रचना, शालेय विषय, वेळेचं नियोजन आदी बाबी समजावून सांगितल्या.

स्तरनिहाय मूल्यमापन प्रक्रिया कशी असणार आहे, याबाबत त्यांनी विस्ताराने विवेचन केले. शिक्षकांचे सक्षमीकरण आणि सबलीकरण याचाही विचार या आराखड्यात केला आहे. समग्र प्रगतिपत्रक ही संकल्पना समजावून दिली. तसेच त्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये समजावून दिली. राज्य अभ्यासक्रम आराखडा काय आहे, त्याचे स्वरूप नेमकं काय आहे ? आदी मुद्द्यांवर त्यांनी विस्ताराने मांडणी केली.

या कट्ट्यासाठी मुंबई, ठाणे, सातारा, सांगली, तसेच राज्याच्या विविध भागातून शिक्षक, मुख्याध्यापक, पालक, अभ्यासक आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कट्ट्यावर 'राज्य अभ्यासक्रम आराखडा -२०२४' च्या अनुषंगाने चर्चा झाली. आराखड्याची अंमलबावणी, दहावीच्या बोर्ड परीक्षांचे संभाव्य स्वरूप, अल्पशा तासिकांमध्ये शिक्षकांनी प्रस्तावित उद्दिष्टे कशी साध्य करायची, सीबीएसईच्या धरतीवर येऊ घातलेल्या पाठ्यपुस्तकांचे स्वरूप व मूल्यमापन पद्धती, शिक्षकांना दिवसेंदिवस वाढत्या अडचणींचा सामना करावा लागत असताना अध्ययन अध्यापन प्रक्रियेस कसा न्याय द्यावा याबाबत उपस्थितांनी तळमळीने प्रश्न उपस्थित केले. त्या सर्व मुद्द्यांचा संकलित अहवाल शालेय शिक्षण विभागातील संबंधितांना सादर करण्यात येईल असे सांगून शिक्षण विकास मंचाच्या विशेष सल्लागार बसंती रॉय यांनी चर्चेचा समारोप केला. कट्ट्याचे निवेदन तुषार म्हात्रे यांनी केले तर आभारप्रदर्शन अजित तिजोरे यांनी केले.

- **राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा रविवार**

विषय: नवीन अभ्यासक्रम आराखडा

रविवार, दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय प्रश्नमंजुषेत ४४०८ शिक्षक-सदस्यांनी सहभाग घेतला होता. भरभरून प्रतिसाद मिळालेल्या प्रश्नमंजुषेचा निकाल पुढील प्रमाणे-

१. सुनील नंदी हलगे-सिंधुदुर्ग.
२. जयश्री प्रभाकर बांदल-पुणे.
३. विलास बालासाहेब पवार- लातूर.
४. श्रुतिका ज्ञानेश्वर मते, अमरावती.
५. अमोल अजाबराव वऱ्हेकर- अमरावती.
६. नंदकिशोर गुलाबराव सुसर- बुलढाणा
७. वसुमती सातव- मुंबई उपनगर
८. योगेश महारू सूर्यवंशी-नाशिक.
९. डी. ए. चव्हाण- ठाणे.
१०. खान अफसर मौसा खान-मुंबई.

- **१५ वी एकदिवसीय राज्यस्तरीय शिक्षण परिषद: ५ जानेवारी २०२५ राज्य व राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा**

आराखडयाच्या अंमलबजावणीकडे लक्ष पुरवावे- डॉ.सुनीलकुमार लवटे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने पहिल्यांदाच भारताच्या शिक्षणाची ब्ल्यू प्रिंट तयार केली असून जन्माला आलेल्या बालकापासून ते जबाबदार नागरिकांपर्यंत शिक्षणाचा एकत्रितरीत्या विचार या धोरणात केला असल्याचे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिक, संशोधक व प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी काढले. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या शिक्षण विकास मंचाच्यावतीने रविवारी मुंबईत आयोजित पंधराव्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत उद्घाटनपर भाषणात ते बोलत होते.

नव्या शैक्षणिक धोरणाची मांडणी अत्यंत आदर्श आहे मात्र अंमलबजावणीबाबत ब्र काढला जात नाही, असं ते म्हणाले. या धोरणात सगळंच गोंडस आणि गुडीगुडी सांगितले असल्याचं स्पष्ट केलं.

शिक्षक आणि प्राध्यापकांची पदे वर्षानुवर्षे भरली गेली नाहीत. तसेच शिक्षणाचा खर्च ६ टक्क्यांवरून ४ टक्के इतका खाली आणल्याबद्दल त्यांनी चिंता वक्त केली.

या धोरणात शिक्षकांना नवी कौशल्य आली पाहिजेत असं अपेक्षित आहे, मात्र अपेक्षित कौशल्यांचं कोणतंही प्रशिक्षण शिक्षकांना अद्याप नाही, अशी टीका त्यांनी केली.

महाराष्ट्र शासन या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत गंभीर नसून शासनाने अंमलबजावणीच्या अंगाने या धोरणाचा विचार करावा, असं आग्रही प्रतिपादन त्यांनी केले. शासनाने या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत ठोस कृती कार्यक्रम द्यावा, अस ते म्हणाले.

मनुष्यबळ आणि आर्थिक बळ याचा पुरवठा जोपर्यंत होत नाही तो पर्यंत हे धोरण यशस्वी होणार नाही, असं ते म्हणाले. नवे शैक्षणिक धोरण विद्यार्थिकेंद्रीत असून विद्यार्थ्यांना हवं ते शिकण्याचा अधिकार देणारं हे धोरण आहे, असं ते म्हणाले.

शिक्षकांना आगामी काळात अनेक आव्हाने पेलायची आहेत. त्यामुळे त्यांनी हा आराखडा मनापासून वाचावा, असं आवाहन त्यांनी केलं.

भविष्याकाळात संस्कृत जास्तीत जास्त मुलांनी शिकावं असं अनुस्यूत असून आराखड्याची शब्दरचना बघितली तर कधीकधी आपण घड्याळाचे काटे उलटे फिरवायला लागलो आहोत की काय असं वाटू लागले असल्याचं त्यांनी सांगितले.

शिक्षकांनी आराखड्यातील गोष्टींकडे विवेकाने बघितले पाहिजे, या धोरणातलं ग्राह्य काय आणि व्यर्थ काय ते ते निवडून विवेकशिल अंमलबजावणीकडे या परिषदेने विचार करावा, असं आवाहन त्यांनी केलं.

कौशल्यधारित शिक्षणाची शाळा म्हणजे पाबळचा विज्ञानाश्रम -डॉ. योगेश कुलकर्णी

'कहाणी पाबळच्या विज्ञानाश्रमाची' या उत्कृष्ट ग्रंथ पुरस्काराचे मानकरी ठरलेल्या डॉ योगेश कुलकर्णी यांनी पुरस्कारास उत्तर देताना व्यक्त केलेल्या मनोगतात या ग्रंथ निर्मिती मागील प्रेरणास्रोत हे विज्ञानाश्रम संस्थेचे संस्थापक डॉ. कलबाग यांचे अभिनव उपक्रम असल्याचे प्रतिपादन केले. वयाच्या व इयत्तांच्या विविध टप्प्यांवर नापासाचा शिक्का मारलेल्या सर्व स्तरातील विदयार्थ्यांना आवर्जून दिला जाणारा प्रवेश आणि कोणत्याही बंदिस्त इमारतीपलिकडे जाऊन थेट निसर्गाशी जवळीक साधत अनुभव आणि कृतींवर आधारित शिक्षणातून सर्वच

विषयांची कशी सांगड घालता येते हे त्यांनी अनेक रंजक उदाहरणातून श्रोत्यांपुढे विशद केले. विज्ञानाश्रमात शिक्षण घेतलेल्या आजी माजी गुणवंत विद्यार्थ्यांनी संपादन केलेले यश तसेच आज देश आणि परदेशातील विविध नामांकित पदावरील सक्षम अधिकारी म्हणून काम करणाऱ्या गुणवंतांचा लेखाजोखा मांडला. आधुनिक तंत्रज्ञानाला मिळत असलेली ए आयची जोड भविष्यातील उद्योग व्यवसायासाठी पूरक मनुष्यबळ निर्मितीचा विचार करून इयत्ता सहावीपासूनच उद्योग कौशल्यांच्या वाढीसाठी कसे प्रयत्न करता येईल, समवाय अध्यापन पद्धती, पाठातील अध्याय निष्पत्ती, झपाट्याने बदलत्या पिढीची शिकण्याची बदलती मानसिकता लक्षात घेऊन शालेय विषय कसे शिकवता येतील यावर भर दिला.

शिक्षण परिषदेत आलेल्या सूचनासंदर्भात शिक्षणमंत्र्याशी चर्चा करणार- सुप्रियाताई सुळे

यशवंतराव चव्हाण सेंटर, शिक्षण विकास मंचच्या वतीने आयोजित १ ५ व्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेला उपस्थित शिक्षकांशी आज सुप्रियाताई सुळे यांनी संवाद साधला.राज्य अभ्यासक्रम आराखडा २ ० २ ४ या विषयावर या परिषदेत चर्चा करण्यात आली.

सुरुवातीला सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देऊन आजचे जग तंत्रज्ञानामुळे वेगवान झाल्यामुळे काही गोष्टी स्पष्टपणे बोलता येत नाहीत, याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. तसेच आजच्या परिषदेत शिक्षण व्यवस्थेसंदर्भात ज्या सुचना आणि सुधारणा सुचवण्यात आल्या आहेत, त्याबाबत लवकरच शिक्षणमंत्र्यांसोबत बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन दिले.

आजच्या वेगवान तंत्रज्ञानाच्या जगात आपला केंद्रबिंदू असलेला विद्यार्थ्यांबद्दल आपण किती चर्चा करतो याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त केली. आज मुलांना प्रवेशासाठी अनेक परीक्षा द्यावा लागतात. त्यामुळे संपूर्ण देशासाठी एक देश एक राशनच्या धर्तीवर एक देश, एक परीक्षा का होऊ शकत नाही. ? असा सवाल उपस्थित केला.

याचबरोबर इंग्रजी शाळांची फी परवडत नाही म्हणून पालक आपल्या मुलांना मराठी शाळांमध्ये पाठवत आहेत, की खरच मराठीकडे ओढा वाढला आहे, याची चर्चा होणे गरजेचे असल्याचे सांगितले. या वेळी आर. आर. आबा पाटील सोडले तर एकाही राजकारण करणाऱ्यांची मुले मराठी शाळेत गेली नाहीत, हे वास्तव असल्याचे सांगितले, याच वेळेस समता ही शिक्षणातून येते असे प्रतिपादन केले.

वेगवेगळी आकलन क्षमता असलेल्या मुलांना शिक्षक समजावून शिकवतात, याबद्दल शिक्षकांचे कौतुक केले. शिक्षक ही नोकरी नाही तर सेवा आहे, असे मत मांडले. या वेळी चॅट जीपीटीबद्दल भीती व्यक्त केली. आज चॅट जीपीटी शिक्षण देईल पण संस्कार कोण करणार असा सवाल उपस्थित केला.

'देशोदेशीचे शालेय शिक्षण' या २१ देशांतील शालेय शिक्षणाचा तुलनात्मक आढावा घेणाऱ्या पुस्तकाबद्दल सर्व टीमचे कौतुक केले. आज या पुस्तकाची चौथी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली आहे. ज्यांना आवाज नाही त्यांना आवाज देण्याचे काम या पुस्तकाने केले आहे.

शिक्षण, शिक्षक आणि विद्यार्थी हे विकसित देशाचे केंद्रबिंदू असल्याचे मत मांडले. त्यामुळे मोठे प्रकल्प आपण उभारत असू पण त्याबरोबर चांगले शिक्षण आपण मुलांना देऊ शकत नसू तर त्या मोठ्या प्रकल्पाचा उपयोग काय ? असा सवाल उपस्थित केला.

शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवण्यासाठी या शिक्षण परिषदेचा उपयोग झाला पाहिजे , अशी इच्छा व्यक्त केली. तसेच पुढच्या वर्षी त्याचा आढावा देखील घेतला पाहिजे, कारण त्याचे फलित काय हे आपल्याला समजणे गरजेचे आहे.

पुस्तके सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी काय करता येईल याबाबत सूचना देण्याचे आवाहन केले. या वेळी शिक्षकांसाठी असणाऱ्या 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप'मध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. या वेळी शैक्षणिक गोष्टींसाठी राज्य आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन शिक्षकांना दिले. शिक्षकांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम करावे, असे आवाहन केले. शेवटी शिक्षण परिषदेला उपस्थित असलेल्या तसेच ही परिषद यशस्वी होण्यासाठी परिश्रम करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

राज्य अभ्यासक्रम आराखडा भविष्यवेधी : डॉ . विकास गरड

मुंबई -जागतिक स्तरावर शिक्षण क्षेत्रात विविध नवनवीन संकल्पना आणि प्रयोग अस्तित्वात येत आहेत भविष्यातील बदलांचा वेध घेऊन तशा पद्धतीची शिक्षण पद्धती निर्माण करणे प्रत्येक राष्ट्रापुढील महत्त्वाचे आव्हान आहे त्या हेतूने राष्ट्रीय शिक्षण धोरण २ ० २ ० ची निर्मिती करण्यात आली त्यानंतर राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा व आत्ता राज्य अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात आलेला आहे राज्य अभ्यासक्रम आराखडा २ ० २ ४ मध्ये भविष्यातील बदलांचा आणि आव्हानांचा सांगोपांग विचार करून पुढील काळातील शिक्षण प्रणालीचा मसुदा तयार करण्यात आलेला आहे . हा राज्य अभ्यासक्रम आराखडा निश्चितच भविष्यवेधी आहे, असे प्रतिपादन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,पुणे येथील वरिष्ठ अधिव्याख्याता व शिक्षण अभ्यासक डॉ . विकास गरड यांनी केले . यशवंतराव चव्हाण सेंटर ,मुंबई येथे शिक्षण विकास मंचाच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेमध्ये राज्य अभ्यासक्रम आराखडा २ ० २ ४ या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते . पुढे बोलताना डॉ .गरड यांनी राज्य अभ्यासक्रम आराखड्याची रचना, प्रचलित शिक्षण पद्धतीमध्ये सुचविण्यात आलेले बदल ,विषय योजना, अध्यापन पद्धती, मूल्यमापन पद्धती अशा अनेक बाबींमध्ये जे बदल सुचविलेले आहेत, त्यामुळे भविष्यातील शिक्षण प्रणाली अधिक सक्षम होईल असे सांगितले.

व्यावसायिक शिक्षणाला महत्त्वाचे स्थान, शालेय जीवनापासून विविध भाषा शिकण्याची संधी, कृतीयुक्त शिक्षणावर भर,आंतरसमवाय क्षेत्रातील विविध गोष्टींचा विचार अशा बाबींवर त्यांनी आपल्या भाषणातून विस्तृत मांडणी केली.

राज्य अभ्यासक्रम आराखडा -२०२४ शिक्षक, पालक, पर्यवेक्षण यंत्रणेतील अधिकारी, शिक्षण अभ्यासक, पत्रकार अशा विविध घटकांनी सविस्तरपणे अभ्यासणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन यावेळी बोलताना डॉ विकास गरड यांनी केले. या वेळी शिक्षण विकास मंचचे मुख्य समन्वयक डॉ . माधव सूर्यवंशी यांनी डिसेंबरमध्ये मुंबई व नाशिक येथे झालेल्या शिक्षण कट्ट्यांचा सारांश सादर केला .

या चर्चासत्राच्या वेळी मंचावर शिक्षण विकास मंचचे मुख्य संयोजक डॉ.वसंत काळपांडे यांचेसह माजी विद्या सचिव, शिक्षण अभ्यासक धनवंती हर्डीकर यांची उपस्थिती होती. यावेळी शिक्षण विकास मंचचे समन्वयक व समुपदेशक अरविंद शिंगाडे यांनी डॉ .विकास गरड यांचा उपस्थितांना परिचय करून दिला.मच्छींद्र बोराडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेला राज्यभरातून ६ ० ० पेक्षा जास्त शिक्षक व शिक्षणप्रेमी नागरिकांची उपस्थिती होती .

देशोदेशीचे शालेय शिक्षण

चौथी आवृत्ती - प्रकाशन सोहळा,

यशवंतराव चव्हाण सेंटर निर्मित आणि डिजीटीकल वर्क्स् प्रकाशित “देशोदेशीचे शालेय शिक्षण“ या पुस्तकाच्या चौथ्या आवृत्तीचे प्रकाशन यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष माननीय खासदार सुप्रियाताई सुळे, डॉ सुनीलकुमार लवटे व मान्यवरांच्या हस्ते पार पडले

नवीन शैक्षणिक धोरणाच्या यशस्वितेसाठी धारणा बदल आवश्यक: धनवंती हर्डीकर

मुंबई -राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यामध्ये फारसा बदल न करता राज्याने आपला अभ्यासक्रम आराखडा तयार केलेला आहे.नवीन शैक्षणिक धोरणात भविष्याचा वेध घेऊन बदल करणे अपेक्षित आहे . या बदलांना स्वीकारण्यासाठी सर्वच घटकांच्या धारणांमध्ये बदलाची आवश्यकता आहे ,असे प्रतिपादन बालभारतीच्या निवृत्त विद्या सचिव, शिक्षण अभ्यासक धनवंती हर्डीकर यांनी केले . यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे शिक्षण विकास मंचच्या पुढाकाराने संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेमध्ये राज्य अभ्यासक्रम आराखडा - २०२४ या विषयावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या .

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की,शिक्षण क्षेत्रातील नवीन बदल स्वीकारण्याअगोदर शिक्षकांनी ते पूर्णपणे समजून घेणे गरजेचे आहे.सर्व स्तरांवर सुसंगत बदल घडणे आणि घडवणे अपेक्षित आहे.प्रचलित शिक्षण पद्धतीच्या मर्यादा लक्षात घेऊन भविष्यवेधी शिक्षणाची पायाभरणी करण्याच्या दृष्टीने राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये धारणा बदलांची चर्चा केलेली आहे. केवळ बौद्धिक शिक्षणापेक्षा व्यवसाय शिक्षणाला महत्त्व देण्यात आलेले आहे. आशय आणि माहितिकेंद्रित शिक्षणाऐवजी विद्यार्थिकेंद्री शिक्षणाची ओळख या निमित्ताने होणार आहे . प्रचलित अध्यापन पद्धतींपेक्षा प्रयोग व कृतीवर आधारित प्रकल्प तसेच कप्पेबंद विषय योजनेला पर्याय म्हणून लवचीक विषय योजना अशी काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये राज्य अभ्यासक्रमा आराखड्यामध्ये आपल्या निदर्शनास येतील . त्यानुसार शिक्षक, पालक यांनी येणाऱ्या काळात हे बदल स्वीकारण्यापूर्वी आपल्या धारणांमध्ये बदल करून घेणे आवश्यक आहे.

भाषा आणि गणित यासारख्या विषयांमध्ये मूलभूत धोरणाबदल स्वीकारणे गरजेचे आहे.यासाठी शिक्षकांना येणाऱ्या काळात नवी भूमिका पार पाडावी लागणार आहे. शिक्षकांनी विद्यार्थी म्हणून सतत शिकत राहण्याची तयारी ठेवणे गरजेचे असून अद्ययावत राहणे, विद्यार्थ्यांच्या गरजांचा अभ्यास करणे ,आपल्या विषयाशिवाय इतर विषयांची माहिती घेणे, अनुभव आधारित अध्यापन पद्धतीचे नियोजन करणे, मूल्यमापनाची नवीन साधने निश्चित करणे गरजेचे आहे .

प्रशासकीय यंत्रणेतील घटकांनी नवीन पद्धतींचा शिक्षकांच्या आधी अभ्यास करून नंतरच त्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी घ्यावी असेही धनवंती हर्डीकर यांनी सांगितले.राज्य अभ्यासक्रम आराखड्याच्या केंद्रस्थानी शिक्षक असून प्रशासकीय यंत्रणेकडून शिक्षकांना पुरेशा साधन सुविधा, शिक्षकांचे सक्षमीकरण, अध्यापनाचे स्वातंत्र्य, नवीन पद्धतींचा अभ्यास इत्यादी गोष्टी करणे आवश्यक आहे.

राज्य अभ्यासक्रमाच्या आराखड्याविषयी चर्चा करताना समाजातील सर्व घटकांच्या धारणा बदलाचे महत्व धनवंती हर्डीकर यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून उपस्थित सर्व शिक्षक व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांना

पटवून सांगितले.यावेळी शिक्षण विकास मंचचे मुख्य समन्वयक डॉ.माधव सूर्यवंशी यांनी मुंबई व नाशिक येथे झालेल्या शिक्षण कट्ट्याचा सारांश सादर केला.

**शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन अंतर्गत**

- **फेलोशिप कार्यशाळा खंडाळा**

शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन बॅच तीनचे खंडाळा येथे दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पहिल्या दिवशी योगेश कुदळे यांनी सकाळ सत्रात सर्वप्रथम सर्व उपस्थित मान्यवर व फेलोजचे स्वागत केले तसेच कार्यशाळेसंबंधी सूचना दिल्या. त्यानंतर सन्माननीय मार्गदर्शक डॉ. ह .ना .जगताप सर, डॉ. वृषाली डेहाडराय मॅडम, डॉ. महेंद्र गणपुले सर यांच्यासमोर १५ फेलोजनी त्यांनी केलेल्या प्रकल्पांचे सादरीकरण केले. यावर परीक्षकांनी योग्य असा सूचना देऊन मार्गदर्शन केले.

दुपार सत्रात डॉ. ह. ना.जगताप सर यांनी नवोपक्रम लेखन उत्तम प्रकारे कसे करावे? याचे सविस्तर मार्गदर्शन केले. यात उपक्रम लेखनअंतर्गत येणाऱ्या विविध पायऱ्यांविषयी सखोल अशी माहिती दिली. संध्याकाळ सत्रात मेंटॉर व फेलोज यांच्या आंतरक्रिया व्हावी यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले. यात फेलोजना प्रकल्प कार्यवाही करताना येणाऱ्या विविध अडचणी समजून घेतल्या व त्यावर मेंटॉरने योग्य असे मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात डॉ. माधव सूर्यवंशी सर यांनी सकाळ सत्रात सर्वांचे स्वागत करताना प्रकल्प स्वत:पुरते मर्यादित न राहता त्याचे सार्वत्रिकीकरण व्हावे हे यशवंतराव चव्हाण सेंटरचे प्रमुख उद्देश असल्याचे सांगितले. त्यानंतर उर्वरित १० फेलोजनी प्रकल्पांतर्गत आत्तापर्यंत केलेल्या कार्यवाहीचे सादरीकरण केले. यावर सन्माननीय मार्गदर्शकांनी योग्य त्या सूचना देऊन काही बदल करण्यास सांगितले.

यानंतर डॉ. वृषाली डेहाडराय मॅडम यांनी नवोपक्रम लेखनातील बारकावे व प्रकल्प राबवताना करावयाच्या नोंदी याबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे त्यांनी प्रकल्प सादरीकरण करताना उत्तम PPT कशी असावी हे सुद्धा खूप छान प्रकारे सांगितले.

त्यानंतर योगेश कुदळे यांनी समारोप करताना फेलोजनी पुढील तीन महिन्यात नवोपक्रमासंदर्भात करावयाचे नियोजन व कार्यवाही याविषयी सविस्तर सूचना दिल्या. या वेळी महेंद्र गणपुले, अजित तिजोरे, मच्छिंद्र बोऱ्हाडे, तुषार म्हात्रे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

- **एक दिवसीय जिल्हा सामन्वयक कार्यशाळा, पुणे**

रोजी शिक्षण विकास मंच,यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा समन्वयक आणि कोअर टीम सदस्य यांची एकदिवशीय कार्यशाळा पुणे येथील एस. एम. जोशी फाउंडेशनच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस परिचय व समूहगीत झाल्यानंतर डॉ.माधव सूर्यवंशी यांनी कार्यशाळेचा उद्देश सांगून, मागील वर्षांच्या कार्यक्रमाचा आढावा घेतला. योगेश कुदळे यांनी संघटना म्हणून शिक्षण विकास मंच वाढीसाठी

काय करायला हवे ? याचे विवेचन केले तर दैनंदिन कामात समन्वयकांचा सहभाग यावर अजित तिजोरे यांनी सूचना केल्या.

शिक्षण कट्टा आणि गुणवंत शिक्षक पुरस्कार यासंदर्भात मा.बसंती रॉय यांनी आपली मते मांडाली. शिक्षण विकास मंच आणि शासन संवाद या संदर्भात मा.डॉ. विकास गरड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.यानंतर शिक्षण विकास मंचाने कोणते उपक्रम घ्यावेत ? माजी विद्यासचिव बालभारती, शिक्षण अभ्यासक मा.धनवंती हर्डीकर यांनी मांडणी केली.

शिक्षण विकास मंचच्या कामाची दिशा यावर ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ.वसंत काळपांडे यांनी मार्गदर्शन केले.

खुल्या चर्चेचे संचलन महेंद्र गणपुले यांनी करून जिल्हा समन्वयकांना आपली मते मांडण्याचा सूचना केल्या. शिक्षण विकास मंचचे मार्गदर्शक लेखक भाऊ गावंडे नागपूर, ऐनुल अत्तार मुंबई यांची या कार्यशाळेस विशेष उपस्थिती होती.कार्यशाळेचा समारोप यशवंतराव चव्हाण सेंटरचे कार्यक्रमप्रमुख दत्ता बाळसराफ यांनी केला. आगामी शैक्षणिक वर्षांत शिक्षण विकास मंचाने कोणते शैक्षणिक उपक्रम घ्यावेत या संदर्भात आलेल्या सूचनावरून कोअर कमिटी येत्या काही आठवड्यात पुढील वर्षांतील कार्यक्रमाची आखणी करेल.आभारप्रदर्शन अप्पा सावंत यांनी केले तर सूत्रसंचालन तुषार म्हात्रे यांनी केले.

- **'मुंबई डायलॉग' ऑन वर्ल्ड अफेअर्सचे आयोजन**

परराष्ट्र धोरणाच्या दृष्टिकोनांवर चर्चा सुरू करण्याचा प्रयत्न चव्हाण सेंटरकडून करण्यात आला आहे. परराष्ट्र धोरण हा केवळ केंद्र सरकारच्या चिंतेचा विषय होऊ शकत नाही. भविष्याच्या दृष्टीने पाहिले तर तो आपला देखील विषय आहे. मुंबई हे आर्थिक घडामोडींचे प्रमुख केंद्र ! त्यामुळेच मुंबईस जागतिक स्वरूप प्राप्त झाले आहे. चव्हाण सेंटर 'मुंबई डायलॉग' अंतर्गत परराष्ट्र धोरण समजावून सांगण्यात यशस्वी होत आहे.

| | | |
|---|---|---|
| Prof Rama Kumar | Tall Claims and Bleak realities features of the contemporary Indian Economy | 03-04-2024 |
| Vappala Balachandran | Relationship between Intelligence and National Security | 02-05-2024 |
| P Sainath | Governance by Gagging and the valorisation of Inequality | 28-06-2024 |

## ९.५ युवा विभाग

- **स्त्री-पुरुष समानता कार्यशाळा**

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी यशवंतराव चव्हाण केंद्राच्या Youth Well-being Progeram अंतर्गत केईएस श्रॉफ कॉलेज, कांदिवली येथे स्त्री-पुरुष समानता कार्यशाळा उत्साहात पार पडली.

या कार्यशाळेत ८०पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. चर्चासत्रे, गटचर्चा आणि उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी लिंग समानता, समावेश आणि न्याय याविषयी सखोल आकलन केले.

ही कार्यशाळा युवकांना सशक्त करण्याचा आणि समान व न्याय्य समाज घडविण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरली. प्रत्येकाला आवाज मिळावा, समान संधी मिळाव्यात या भावनेला नवसंजीवनी मिळाली.

- **कृषी क्षेत्रातील दिशा आणि नवनवीन उपक्रम ( शरद पवार इन्स्पायर फेल्लोशीप अंतर्गत )**

पालघर जिल्ह्यातील कोसबाड कृषी विज्ञान केंद्र येथे ग्रामविकास अधिकाऱ्यांसह मार्गदर्शन व ओरिएंटेशन सत्र आयोजित करण्यात आले. या सत्रात यशवंतराव चव्हाण केंद्राच्या विविध उपक्रमांची माहिती व त्यांची अंमलबजावणी यावर सखोल चर्चा करण्यात आली.

यानंतर वनगाव येथे भेट देऊन फळ सुकवणी व प्रगत पॅकेजिंग तंत्रज्ञान या अभिनव प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला. या प्रकल्पामुळे केवळ मूल्यवृद्धीच होत नाही तर शेतकऱ्यांसाठी नवे बाजारपेठेचे दालनही खुले होत आहे.

दोन्ही भेटींतून शाश्वत शेती, ग्रामीण विकास व कृषी क्षेत्रातील नावीन्यपूर्णतेचे महत्त्व अधोरेखित झाले. ग्रामीण भागातील भविष्य उज्ज्वल करण्यासाठी हे उपक्रम निश्चितच दिशा दाखवणारे ठरतील.

- **युथ वेलबीईंग कार्यशाळा – लांजा**

यशवंतराव चव्हाण केंद्र व लांजा येथील सायन्स अँड कॉमर्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने “ध्येय निर्धारण व समाजातील युवा नेतृत्व” या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली.

लांजा तालुक्यातील ७ २ विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सक्रिय सहभाग नोंदवला.

**ध्येय निर्धारण सत्र**: श्री. राहुल मऱ्हाठे यांनी विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांशी सुसंगत, वास्तववादी आणि अर्थपूर्ण ध्येये ठरविण्याचे तंत्र समजावून सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना आपल्या जीवनाचा स्पष्ट आराखडा करण्याची प्रेरणा मिळाली.

**युवा नेतृत्व सत्र** : श्री. संतोष मेकाले यांनी युवकांना समाजपरिवर्तनाचे शिल्पकार होण्याचे आवाहन केले. त्यांनी नेतृत्व, संवादकौशल्य, गटकार्यक्षमता आणि समाजातील युवकांची भूमिका या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर प्रकाश टाकला.

गटचर्चा, परस्परसंवाद आणि प्रात्यक्षिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना नेतृत्वाची प्रत्यक्ष अनुभूती मिळाली. अभिप्राय सत्रात अनेक विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक विकासावर प्रभावी परिणाम झाल्याचे सांगितले.

युवकांच्या सर्वांगीण घडणीत असे उपक्रम महत्त्वाचे योगदान देतात आणि यापुढेही सातत्याने आयोजित केले जाणार आहेत.

- **युथ वेलबीईंग कार्यक्रम - दहिसर**

यशवंतराव चव्हाण केंद्र व शैलेंद्र कॉलेज एनएसएस युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने दहिसर येथे युथ वेलबीईंग कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमात युवकांसाठी अत्यंत महत्त्वाचे विषय – नेतृत्व, ध्येय निर्धारण व नातेसंबंधांची जडणघडण – यावर सखोल चर्चा करण्यात आली.

**पहिले सत्र**: श्री. संतोष मेकाले यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण आत्मसात करण्यासाठी मार्गदर्शन केले. ध्येय निश्चिती, स्वत:वर विश्वास ठेवणे आणि भविष्य स्वत:च्या हातांनी घडविण्याची प्रेरणा त्यांनी दिली.

**दुसरे सत्र :** श्री. संदेश लालगे यांनी युवकांमधील आंतरव्यक्तिगत नातेसंबंध या महत्त्वपूर्ण विषयावर चर्चा केली. नातेसंबंधांतील आव्हाने, त्यांचे व्यवस्थापन आणि निरोगी संवादाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

७० विद्यार्थ्यांच्या सहभागाने हा कार्यक्रम संवादात्मक, विचारप्रवर्तक आणि उत्साहवर्धक ठरला. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना स्वत:कडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची, उद्दिष्टे ठरविण्याची आणि निरोगी नातेसंबंध प्रस्थापित करण्याची प्रेरणा मिळाली.

हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानण्यात आले. अशा उपक्रमांच्या माध्यमातून युवकांना घडविण्याचे कार्य सातत्याने सुरू राहील.

- **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार २०२४-२५**

"सकारात्मकपणे काम करणारी आजची तरुणाई सर्वांसाठी प्रेरक... : माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे"

"राज्यातील कर्तृत्ववान तरुणाईस यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार प्रदान"

छत्रपती संभाजीनगर, दि. ३० : समृद्ध समाज निर्मितीसाठी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या माध्यमातून शेती, युवक, महिला, शिक्षण, आरोग्य अशा विविध क्षेत्रात खूप मोठे सामाजिक कार्य सुरू आहे. या माध्यमातून सपर्पित भावनेने, लक्ष केंद्रित करत, जिद्द, चिकाटी, मेहनत घेत, अडचणीत तग धरून राहत, सकारात्मक आणि सातत्य ठेवत काम करणारी ही आजची तरुण पिढी ससर्वांसाठी प्रेरक आहे. भारताचे उद्याचे भविष्य असणाऱ्या तरुणाईस आज यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार देत असताना अभिमान वाटतो, असे प्रतिपादन राज्याचे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी यावेळी केले.

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने महाराष्ट्राच्या सर्वागीण विकासासाठी विविध क्षेत्रात विधायक, भरीव व विशेष कामगिरी करणाऱ्या युवक-युवतींना दिल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार सोहळ्याचे आज एमजीएम परिसरातील रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन करण्यात आले होते. या वेळी राज्याचे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या जिल्हा केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, कार्यकारिणी सदस्य डॉ.अपर्णा कक्कड, लेखक दासू वैद्य, संयोजक नीलेश राऊत, केतकी नेवपुरकर, गौरव सोमवंशी,विभागप्रमुख संतोष मेकाळे व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. टोपे म्हणाले, आज विविध क्षेत्रात काम करणारे हे सगळे तरुण समाजाच्या भल्यासाठी काम करत आहेत. विशेषत: सामान्य नागरिकांचे जीवन सुखमय आणि आनंददायी होण्यासाठी ही तरुणई आपापल्या क्षेत्रात सामाजिक बांधिलकी जपत सातत्यपूर्ण कार्यरत आहे. या सर्वांनी आपल्या कामांतून 'नोकरी मागणारे होण्यापेक्षा नोकरी देणारे व्हा" हाच संदेश दिलेला आहे. यशवंतराव चव्हाण सेंटर विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजासाठी कार्य करणाऱ्या सर्वांना प्रेरणा आणि बळ देण्याचे काम करत आहे.

आज विविध क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या या सर्व पुरस्कार प्राप्त तरुणाईचे मी मनापासून अभिनंदन करतो. भारताला संतांच्या विचारांची फार मोठी परंपरा आहे. भगवान बुध्दाने उदात्त धर्माची दिलेली शिकवण जगासाठी मार्गदर्शक ठरलेली आहे. अशा समृद्ध विचार परंपरा लाभलेल्या देशात जातिधर्माच्या नावाने होणारे वाद बघून

मन विषन्न होतं. वडीलधाऱ्या माणसाने तरुणांना या विषयी योग्य मार्ग दाखवला पाहिजे. आपण कुठे चुकत आहोत, हे दाखवून दिले पाहिजे. यशवंतराव चव्हाण सेंटरने यासाठी पुढील काळात काम केले पाहिजे. संधीची नवनवीन क्षितिजे उपलब्ध होत असताना आता या तरुणांनी न थांबता, अथक परिश्रमातून नवनवीन विक्रम स्थापित केले पाहिजेत, असे यशवंतराव चव्हाण सेंटरच्या जिल्हा केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम यांनी यावेळी सांगितले.

मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ या वेळी बोलताना म्हणाले, आज यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार प्राप्त करणारे सगळे युवक युवती समाजाच्या भल्यासाठी अनेक महत्वाच्या विषयावर काम करत आहेत. माध्यमे याची दखल घेत असतील किंवा नाही. मात्र, आज यशवंतराव चव्हाण सेंटरने यांच्या कामाची दखल घेतली आहे. आपली आवड जोपासत ही सगळी तरुण मंडळी आपले सर्वस्व झोकून देऊन काम करत आहेत. या अशा समाजातील तळागाळात काम करणाऱ्या व्यक्तींमुळे महाराष्ट्र चालतो आहे.

आज झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात ७ विविध विभागांमध्ये एकूण १६ पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. महाराष्ट्रातील युवकांच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे, हे या पुरस्कारांचे उद्दिष्ट आहे.

रोख २१ हजार रु., स्मृतीचिन्ह व मानपत्र असे यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्काराचे स्वरुप आहे.

**यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार २०२४-२५ सालचे मानकरी खालीलप्रमाणे आहेत.**

**साहित्य :**

१. विनायक होगाडे (कोल्हापूर)
२. मृदगंधा दीक्षित (पुणे),

**सामाजिक :**

३. आकाश टाले (नागपूर)
४. ऋतुजा जेवे (बुलढाणा)

**इनोव्हेटर :**

५. सुश्रुत पाटील (पालघर)
६. पद्मजा राजगुरू (परभणी)

**क्रीडा :**

७. ओजस देवतळे, नागपूर (क्रीडा प्रकार : धनुर्विद्या)
८. ह्रतिका श्रीराम, सोलापूर (डायव्हिंग),

**पत्रकारिता :**

९. प्रथमेश पाटील (पुणे)
१०. ज्योती वाय. एल. (मुंबई)

**उद्योजक :**

११. जयेश टोपे (नाशिक)

१२. शिवानी सोनवणे (पुणे)

**रंगमंचीय कलाविष्कार :**

१३. कृष्णाई उळेकर, धाराशिव (लोककला)

१४. तन्वी पालव, सिंधुदुर्ग (शास्त्रीय नृत्य)

१५. ऋतुजा सोनवणे, जळगाव (शास्त्रीय संगीत)

१६. कल्पेश समेळ, रायगड (नाट्य)

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक नीलेश राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशश्री मुळे हिने केले तर आभार विभागप्रमुख संतोष मेकाले यांनी केले. महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली तर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ९.६ आदिवासी विकास केंद्र

- **यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने आदिवासी विकासासाठी विविध उपक्रम – धोरणात्मक बैठक, गावभेटी आणि अभ्यासदौऱ्यांची तपशीलवार माहिती**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या आदिवासी विकास केंद्रामार्फत मागील एक वर्षभरात महाराष्ट्रातील विविध भागांत आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर केंद्रित अनेक धोरणात्मक बैठकां, अभ्यासदौऱ्यांचे व क्षेत्रभेटींचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांचा मुख्य उद्देश वनहक्क कायदा, पेसा, शिक्षण, आरोग्य, उपजीविका, महिला सबलीकरण आणि सांस्कृतिक हक्कांसारख्या मुद्द्यांवर संवाद घडवून आणणे व शासनस्तरावर धोरणात्मक सूचना मांडणे हा होता. खाली याचे संक्षिप्त वृत्तान्त दिले आहेत:

- **स्वयंसेवी संस्थांचा समन्वय मेळावा, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई**

५ जुलै २०२४ रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये आदिवासी समाजाशी निगडित प्रश्नांवर केंद्रित एक महत्त्वपूर्ण राज्यस्तरीय समन्वय मेळावा आयोजित करण्यात आला. या बैठकीत महाराष्ट्रातील विविध स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, वकील आणि पंचायत प्रतिनिधी यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, आरोग्य, पोषण, उपजीविका, वनहक्क, पेसा कायदा, महिला सक्षमीकरण आणि सांस्कृतिक हक्क या विविध क्षेत्रांतील आव्हानांवर सखोल चर्चा झाली. बोलीभाषेतील शिक्षणाची आवश्यकता, आश्रमशाळांच्या दर्जामध्ये सुधारणा, स्थानिक आरोग्य यंत्रणेतील त्रुटी, कुपोषणा संदर्भातील स्थानिक उपाययोजना, प्रलंबित वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दावे, सामुहिक वन हक्क गावांचा समावेशक विकास आराखडा, पेसा कायद्यानुसार ग्रामसभांच्या अधिकारांचा प्रभावी वापर, ऊएइ निधीवरील ग्रामसभेचे नियंत्रण आणि खोट्या आदिवासी प्रमाणपत्रांविषयी वाढती चिंता अशा अनेक धोरणात्मक शिफारसी या संवादातून पुढे आल्या.

या बैठकीच्या शेवटी सहभागी संस्थांनी विविध चर्चांमधून तयार केलेले मसुदे आगामी निवडणुकांतील पक्षीय जाहीरनाम्यांत समाविष्ट व्हावेत, या हेतूने एकत्रित करण्यात आले. या महत्त्वपूर्ण समन्वय बैठकीत मा. शरद पवार, मा. नाना पटोले, डॉ. अभय शुक्ला, ॲड. ब्रायन लोबो, श्रीमती उल्का महाजन , श्रीमती प्रतिभा शिंदे, श्री. दिलीप गोडे, ॲड. पूर्णिमा उपाध्याय, डॉ. किशोर मोघे आणि ॲड. इंदवी तुळपुळे या मान्यवरांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपले मौलिक विचार मांडले. आदिवासी विकास केंद्र, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या पुढाकारातून आयोजित ही बैठक केवळ विचारमंथनापुरती मर्यादित न राहता, प्रत्यक्ष कृतीसाठी दिशादर्शक ठरली. राज्यस्तरीय धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेला या संवादाने एक व्यापक आणि सामूहिक आधार दिला.

- **सामूहिक वनहक्क व पेसा कायदा जिल्हास्तरीय बैठक, पुणे**

१२ सप्टेंबर २०२४ रोजी पुणे येथील एस. एम. जोशी फाउंडेशनमध्ये सामूहिक वनहक्क व पेसा कायद्यासंदर्भातील एक महत्त्वपूर्ण जिल्हास्तरीय बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीमध्ये पुणे जिल्ह्यातील CFR (सामुहिक वन हक्क) मंजूर झालेल्या गावांचे प्रतिनिधी, स्थानिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवी संस्था मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बैठकीचा उद्देश केवळ अधिकारप्राप्तीपुरता मर्यादित न राहता, मंजूर गावांमध्ये या हक्कांच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या अडचणी समजून घेणे, विकास आराखडे तयार करणे आणि ग्रामसभांच्या निर्णयप्रक्रियेला शासनस्तरावर योग्य स्थान मिळवून देणे हा होता. चर्चेदरम्यान अनेक सहभागी संस्थांनी स्पष्ट केले की, सामूहिक वनहक्क अधिकार मिळाल्यानंतरही शासन यंत्रणांकडून अपेक्षित तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय सहकार्य मिळत नाही. त्यामुळे जंगल व्यवस्थापन, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण, आणि सामूहिक उपजीविकेच्या संधी निर्माण करण्यासाठी प्रभावी मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.

बैठकीत मंचर व आंबेगाव या भागांतील ५० सामुहिक वनहक्क मंजूर गावांचा 'मॉडेल ग्राम' म्हणून विकास करण्याचा ठोस प्रस्ताव सादर करण्यात आला. या गावांमध्ये पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, ग्रामसभा केंद्रित विकास आराखडे, वनावर आधारित अर्थव्यवस्था आणि टिकाऊ संसाधन व्यवस्थापन यावर भर देण्याचे ठरवण्यात आले. विशेषत: हिरड्याच्या झाडांच्या क्षेत्रात मालकी हक्काच्या नोंदीसाठी ७/१२ उताऱ्यांमध्ये फेरनोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे ठरले. याशिवाय ग्रामपातळीवरचे नेतृत्व सक्षम करून प्रशासनाशी सातत्याने संवाद साधणे, विकास आराखड्यांची जिल्हा योजनेत समाविष्टता, आणि विविध विभागीय योजनांचा समन्वय साधणे या विषयांवर एकमताने निर्णय घेण्यात आले. आदिवासी विकास केंद्र, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या पुढाकाराने झालेली ही बैठक राज्यभरातील सामूहिक वनहक्क गावांसाठी कृतिशील उदाहरण ठरू शकते, यावर सर्व प्रतिनिधींचे एकमत झाले.

- **आदिवासी विकासाच्या वाटचालीत एक टप्पा : आरोहन संस्थेची भेट**

आदिवासी विकास केंद्र, यशवंतराव चव्हाण सेंटरच्यावतीने प्रशांत ईखार यांनी पालघर जिल्ह्यातील जव्हार येथे कार्यरत असलेल्या 'आरोहन' संस्थेला अभ्यासदौऱ्याच्या उद्देशाने भेट दिली. संस्थेचे प्रकल्प अधिकारी बाळचंद्र साळवे यांनी या भेटीत संस्थेच्या विविध क्षेत्रातील कार्याचा तपशीलवार परिचय करून दिला. आरोहन संस्था जवळपास १५० ग्रामपंचायतींमध्ये आरोग्य, शिक्षण, जलसंधारण, महिला सक्षमीकरण आणि स्थानिक स्वशासन या क्षेत्रांमध्ये सक्रिय आहे. या भागातील आदिवासी समाजातील स्थलांतराच्या प्रश्नाकडे त्यांनी

गांभीर्याने लक्ष दिले असून, महिलांचा सामूहिक सहभाग, स्थानिक स्वयंसहायता गटांची घडवणूक, आणि जलस्रोतांचे संवर्धन या उपक्रमांवर विशेष भर देत आहेत. त्यांच्या कामातील ठोसपणा, समुदायप्रेरित उपक्रम आणि गावपातळीवरील नेतृत्वाला चालना देण्याची भूमिका अभ्यासण्यासारखी आहे.

या सहभ्रमणाच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण सेंटर आणि आरोहन संस्थेमध्ये भविष्यातील सहकार्याची दिशा स्पष्ट झाली. विशेषत: जलसंधारणाच्या रचनात्मक उपाययोजना, शासन यंत्रणेसोबत अधिक परिणामकारक संवादाची गरज, आणि महिला नेतृत्वाच्या क्षमतेचा विकास हे तीन महत्त्वाचे भाग म्हणून पुढे आले. गावपातळीवरून सुरू होणारे पाणलोट व्यवस्थापन, लोकसहभागातून योजना अंमलबजावणी आणि अधिकाराधारित विकासाची दिशा यावर दोन्ही संस्थांमध्ये चर्चा झाली. या दौऱ्याने फक्त अनुभवसंपन्न संस्था कार्याची ओळख करून दिली नाही, तर आदिवासी विकास केंद्र, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या भविष्यातील धोरणात्मक क्षेत्रभेटींसाठी एक समृद्ध दृष्टिकोनही दिला.

- **ग्रामभेट : उम्बारणेवाडी, तालुका खालापूर, जिल्हा रायगड**

१३ फेब्रुवारी २०२५ रोजी आदिवासी विकास केंद्र, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील उम्बारणेवाडी या दुर्गम आदिवासी गावाला भेट देण्यात आली. या ग्रामभेटीचा उद्देश केवळ भौतिक स्वरूपातील गरजा समजून घेणे नव्हता, तर गावाच्या सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय वास्तवाचा सखोल अभ्यास करणे हा होता. उम्बारणेवाडीला जोडणारा कोणताही पक्का रस्ता नसल्यामुळे विशेषत: पावसाळ्यात संपूर्ण गाव जगापासून तुटून राहत असल्याचे दृश्य डोळ्यांसमोर आले. गावात वीजपुरवठा नसल्यामुळे घरोघरी अंधार असून, मोबाईल नेटवर्क आणि डिजिटल सेवा पूर्णपणे ठप्प आहेत. गावाच्या शेजारीच जलस्रोत असतानाही पाईपलाइनद्वारे पाणीपुरवठा होत नसल्यामुळे महिलांना डोंगराळ भागातून लांबवरून पाणी आणावे लागते. अशा अडचणींच्या पार्श्वभूमीवर गावातील आरोग्य सेवा अत्यंत कमकुवत आहे; गरोदर माता, वृद्ध आणि रुग्ण यांना उपचारासाठी दूरवर जाणे भाग पडते.

गावाची एकंदर अर्थव्यवस्था पारंपरिक शेती, वनसंपत्तीवरील अवलंबित्व आणि मजुरीच्या कामावर आधारित आहे. शासनाच्या कोणत्याही मुख्य प्रवाहातील योजना, जसे की घरकुल, स्वच्छता अभियान, उज्ज्वला योजना किंवा आरोग्य विमा योजना यांचा लाभ या गावात फारसा पोहोचलेला नाही. मात्र या सर्व समस्या असूनही, उम्बारणेवाडीमध्ये एक विशेष प्रकारची सामाजिक एकरुपता, निसर्गाशी असलेले जवळचे नाते, आणि सांस्कृतिक परंपरांची जपणूक दिसून आली. येथील निसर्ग सौंदर्य, हिरवाई, शांतता आणि पारंपरिक जीवनशैली पाहता हे गाव भविष्यात नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यटनाच्या दृष्टीने विकसित होऊ शकते. या भेटीतून स्पष्ट झाले की शासनाच्या धोरणांमध्ये अशा दुर्गम भागातील वास्तव समाविष्ट करणे आणि विकासाच्या प्रक्रियेत स्थानिक सहभाग निश्चित करणे अत्यावश्यक आहे.

- **राज्य आदिवासी कल्याण बजेट अभ्यास व अहवाल तयार प्रक्रिया**

राज्यातील आदिवासींसाठी होणाऱ्या अंदाजपत्रकीय तरतुदींचा आणि प्रत्यक्ष खर्चाचा सखोल अभ्यास करण्याचा उपक्रम यशवंतराव चव्हाण सेंटरच्या आदिवासी विकास केंद्राने २०२४–२५ या आर्थिक वर्षात

राबवला. या अभ्यासाची अंमलबजावणी Centre for Financial Accountability (CFA) या नामवंत संस्थेमार्फत करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या वार्षिक अर्थसंकल्पातील आदिवासी उपयोजन (Tribal Sub Plan) अंतर्गत विविध क्षेत्रांमध्ये जसे की शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, वन हक्क कायदा अंमलबजावणी, पोषण, आणि नागरी भागातील आदिवासींसाठीच्या योजनांमध्ये प्रत्यक्ष किती निधी खर्च होतो, तो कोणत्या स्वरूपात वापरला जातो, कोणत्या विभागांमधून निधी गळती होते, आणि उत्तरदायित्व कुठे कमी पडते - या सर्व बाबींचा शास्त्रशुद्ध व विश्लेषणात्मक अभ्यास या अहवालात करण्यात आला आहे.

अहवाल तयार करताना एक संपूर्ण आर्थिक वर्षभर विविध विभागांचे अर्थसंकल्प, खर्चाचे ताळेबंद, मागील वर्षातील तुलना आणि योजनांची रचना यांचा अभ्यास करण्यात आला. यामध्ये स्थानिक पातळीवर प्राप्त माहिती, तज्ज्ञांच्या प्रत्यक्ष मुलाखती आणि स्वतंत्र नोंदींचाही आधार घेण्यात आला.

सदर अभ्यासाचा उद्देश्य केवळ आकड्यांवर आधारित निष्कर्ष काढणे नव्हता, तर तो समाजाधारित आणि कृतिक्षम धोरणात्मक हस्तक्षेप घडवण्यासाठी मार्गदर्शक ठरावा, हा दृष्टिकोन होता. या अभ्यासातून स्पष्ट झाले की, आदिवासींसाठी राखीव केलेल्या निधीचा संपूर्ण आणि योग्य वापर केला जात नाही. विविध योजनांतर्गत मंजूर निधीचा मोठा हिस्सा वर्षाअखेरीस खर्च न होता परत जातो, वनहक्क कायदाअंतर्गत लाभार्थी गावांपर्यंत विकास योजनांचा पोहच न होणे ही गंभीर बाब असल्याचे अधोरेखित झाले. नागरी भागातील आदिवासींसाठी स्वतंत्र आराखड्यांची कमतरता, महिलांसाठीच्या योजनांत तुटपुंजा सहभाग, आणि अनेक योजना प्रत्यक्ष ग्रामस्तरावर पोहोचत नसल्याची बाबही स्पष्टपणे मांडण्यात आली.

सदर अहवालाचा प्रारूप मार्च २०२५ मध्ये तयार करण्यात आला. हा रिपोर्ट राज्यातील संबंधित शासकीय यंत्रणांना ई-मेलद्वारे शेअर करण्यात आला असून, लवकरच अधिकृत सादरीकरणासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. या अभ्यासाअंती तयार झालेला अहवाल "महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्प २०२४-२५ - आदिवासींसाठी अंदाजपत्रकीय तरतूद व खर्च विश्लेषण" या शीर्षकाने पुस्तकरूपात मुद्रित करण्यात आला आहे. या पुस्तकाचे अधिकृत प्रकाशन जून २०२५ मध्ये होणार असून, या प्रकाशनाचे उद्घाटन मा. शरद पवार साहेबांच्या हस्ते करण्यात येणार आहे.या अभ्यासातून प्राप्त झालेली निरीक्षणे आणि सूचना शासनासाठी मार्गदर्शक ठरणार असून, त्याआधारे भविष्यातील धोरणात्मक सुधारणा, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निश्चित करण्याच्या दृष्टीने ही प्रक्रिया एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

- **निष्कर्ष**

या सर्व बैठका, भेटी, अभ्यास दौरे आणि प्रकाशन उपक्रमांच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण सेंटरने आदिवासी विकासाच्या क्षेत्रात एक सशक्त आणि संघटित हस्तक्षेप उभा केला आहे. धोरणात्मक संवाद, प्रत्यक्ष अनुभवसंपन्न निरीक्षणे, आणि जागरूक व सक्रिय संस्थांचा सहभाग यामुळे आदिवासी समाजाशी संबंधित प्रश्न अधिक स्पष्टपणे शासनदरबारी पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या उपक्रमांच्या माध्यमातून केवळ तात्पुरती मदत नव्हे, तर दीर्घकालीन धोरणात्मक बदलासाठी पाया रचला गेला आहे. या प्रक्रियेमध्ये ग्रामस्तरावरून राज्यस्तरापर्यंत विविध पातळ्यांवरची अंमलबजावणी, नियोजन, मूल्यांकन आणि सहभाग या सर्व गोष्टींचा विचार करण्यात आला आहे.

## १०. जिल्हा केंद्रे:-

### १०.१ जिल्हा केंद्र, नाशिक

- यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक व मराठा विद्याप्रसारक समाज यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ जुलै २०२४ रोजी कृषी महाविदयालय कर्मवीर दुलाजी सिताराम पाटील चाचडगांव येथे २०० वृक्षांची रोपे महाविदयालयाच्या परीसरात वृक्षारोपण कार्यक्रमाच्या वेळी लावण्यात आली.

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक व मविप्र तर्फे चाचडगांव कर्मवीर दुलाजी सिताराम पाटील कृषी महाविदयालयाच्या प्रांगणात विविध फळ जातीची रोपे जसे चिंच, आंबा, चिकु, जांभळ, पेरू तसेच औषधी वनस्पती मधील बेहडा, हीरडा, कडुलिंब, कंदब, इ. रोपे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) चे विद्यार्थी व कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी मोठया संख्येने भाग घेऊन सदरील रोपे लावण्यास मदत केली.

जिल्हा केंद्र नाशिक चे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे यांनी या वेळी बोलतांना सांगीतले की जीवनात प्रत्येकाला श्वास फार महत्त्वाचा आहे. ते निर्मीतीचे काम ही झाडे करतात. आजची परीस्थीती पाहता. विकासाच्या नावाखाली मोठया प्रमाणात वृक्षतोड होत आहे. त्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडला आहे. आणी तो जर टिकवून ठेवायचा असेल तर प्रत्येकाने आपल्या जीवनात एक तरी झाड लावले पाहिजे.

यावेळी जिल्हा केंद्राचे सचिव प्रा. अशोक पिंगळे, सदस्य ॲड. राजेंद्र डोखळे, सदस्या प्रा. सुरेखा बोऱ्हाडे व्यवस्थापक गणेश ढगे उपस्थित होते.

- यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक येथे दि. ०२ ऑगस्ट २०२४ रोजी (MPSC) मार्फत जिल्हा केंद्रातील अभ्यासिकेतील विद्यार्थी यांची पोलिस प्रशासनात PSI पदी निवड झाल्या बद्दल त्यांचा एक झाडाचे रोपटे व चव्हाण साहेबांचे पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला.

जिल्हा केंद्राचे अध्यक्ष ॲड. नितिन ठाकरे व सचिव प्रा. अशोक पिंगळे समन्वयक भूषण काळे यांच्या उपस्थितीत सदर विद्यार्थिचा सत्कार करण्यात आला. या वेळी अभ्यासिकेतील PSI पदी निवड झालेले विद्यार्थि अश्विनी सांडखोरे व रविंद्र गायकवाड यांनी बोलतांना सागीतले की यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक या वास्तुत असलेली अभ्यासिका व त्यामधील शांत वातावरण तसेच गणेश ढगे सरांनी अभ्यासिकेत वेळोवेळी पुरविण्यात आलेली स्पर्धा परीक्षेची पुस्तके तसेच तज्ज्ञाचे मार्गदर्शन आई वडिांचे आशीर्वाद व घेतलेली मेहनत या सर्वाच्या पुण्याईने आज आम्ही हे ध्येय गाठू शकलो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी वाघ या अभ्यासिकेमधील विद्यार्थिनीने केले. या वेळी अभ्यासिकेतील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

- यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक व सकाळ एनआयई यांच्या संयुक्त विद्यमाने किल्ले बनवा कार्यशाळा अभिनव बालविकास मंदिर, गंगापूर रोड नाशिक येथे दि. २७ ऑक्टोबर २०२४ रोजी उत्साहात झाली.

अभिनव बालविकास मंदिराच्या पटांगणात सकाळीच पालकांसह आलेले विद्यार्थी विविध किल्ल्यांच्या प्रतिकृती बनविण्यात रमले होते. महाराष्ट्राच्या संस्कृतीचं प्रतीक दर्शविणारे किल्ले बनवितांना चिमुकल्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. जय भावानी जय शिवाजीचा जयघोष सर्वांचाच उत्साह वाढवत होता.

पालकही हिरीरीने किल्ले साकारताना मुलांसोबत सामील झाले. जंजिरा, सिंहगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी, सिंधुदुर्ग, रायगड, पन्हाळा, असे वैविध्यपूर्ण किल्ले साकारताना विद्यार्थिच्या बुध्दीला चालना मिळाली.

जिल्हा केंद्राचे अध्यक्ष ॲड. नितिन ठाकरे म्हणाले की, सध्या मातीचे खेळ लोप पावत आहेत. पूर्वी दिवाळीला किल्ले बनविण्याची स्पर्धा असायची या माध्यमातुन छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास व त्यांचे कर्तृत्व शौर्य याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती मिळत असे. किल्ला बनविण्याच्या प्रक्रियेतून त्यांना समृध्द संस्कृती व वारसाबद्दल खूप काही शिकायला मिळते. किल्ल्यांची उभारणी करताना बांधकामासाठी आवश्यक माती आणि पाण्याचे प्रमाण, मिश्रणाची सुसंगतता, इतर साहाय्यक सामग्रीची जमवाजमव यामधून विद्यार्थी नेतृत्व, संघभावना निर्माण होऊन व्यक्तिमत्त्व विकास होतो. या वेळी सकाळ चे वितरण विभागाचे सहाय्यक योगेश शिंपी, मनोहर शिंदे तसेच जिल्हा केंद्राचे सचिव प्रा. अशोक पिंगळे, सदस्य ॲड. राजेंद्र डोखळे, समन्वयक भुषण काळे, गणेश ढगे उपस्थित होते.

- यशवंतराव चव्हाण सेंटर व मविप्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी आशय निर्मित कार्यशाळा तसेच नेटीझन्सना रील्स, व्हिडीओचे धडे सध्या डिजिटल माध्यमांना महत्व असून या माध्यमातून प्रसिध्दीबरोबरच चांगले उत्पन्नही मिळते. मात्र त्यासाठी वाचन लेखनाबरोबरच कल्पनाशक्तीही महत्वाची असते रिल्स आणि व्हिडीओ बनविताना केवळ लाइक फॉलोअर्स मिळविणे हा उद्देश नसावा, असा संदेश या क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिला.

निमित्त होते यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र नाशिक आणि मविप्र समाज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित क्रिएटर वर्कशॉपचे गंगापूररोडवरील आयएमआरटी महाविद्यालयातील मुख्य सभागृहात नुकतेच वर्कशॉप झाले. मविप्र चे सरचिटणीस तथा यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते वर्कशॉपचे अदघाटन झाले.

या वेळी ॲड. ठाकरे म्हणाले, की महाराष्टाचे पाहिले मुख्यमंत्री आणि देशाचे माजी संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे विचार निरंतर जागरुक ठेवण्यासाठी यशवंतराव चव्हाण सेंटरची स्थापना करण्यात आली आहे. या माध्यामातून युवा नेतृत्व तयार करणे, सक्षम युवक घडविणे हा सेंटरचा उददेश असून, त्याला अनुसरूनच ही कार्यशाळा घेण्यात आली आहे. कल्पनाशक्तीला वाव द्या तसेच प्रथम सत्रात प्रसिध्द जाहिरात तज्ज्ञ व टायपोग्राफर सुनील धोपावकर यांनी यशस्वी आशय निर्मितीकार व्हा या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले, की सोशल मीडियाला भौगोलिक सीमा नाहीत. आपल्या लिखाणाची इतरांनी वाट बघितली पाहिजे, त्यांना आपण लिहिलेले वाचण्याची, ऐकण्याची सवय लागली पाहिजे, हे सर्व करताना कल्पनाशक्तीला वाव दिला पाहिजे. तसेच, अक्षरांचे सौंदर्य लक्षात घेतले पाहिजे.

दुसऱ्या सत्रात सायबरतज्ज्ञ ओंकार गंधे यांनी कन्टेन्ट क्रिएटरची सुरक्षितता या विषयावर मार्गदर्शन केले. सायबर कायदे, बुलिंग, ट्रोलिंग, हॅकिंग, स्टोकिंग, धमक्या, पासवर्ड, फेक फॉलोअर्स, फेक प्रोफाइल्स, डीप फेक, डीप न्यूड, डार्क वेब, रेड रुम, स्पाय, स्किमर या महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी प्रबोधन केले. या वेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी उत्तर दिली.

यावेळी सेंटरच्या सुरेखा बोऱ्हाडे, गणेश ढगे, उपस्थित होते, भूषण काळे यांनी सूत्रसंचालन केले. तसेच कन्टेन्ट क्रिएटर रिया राज व कुणाल रुपवते यांनीही संवाद साधला.

- **यशवंतराव चव्हाण सेंटर आयोजित दि. ३० डिसेंबर २०२४ रोजी काव्यवाचन स्पर्धा विषय 'राजकारण' काव्यवाचनातून राजकीय मंडळीवर फटकेबाजी**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक आयोजित काव्यवाचन स्पर्धेतून राजकारण या विषयावर विविध क्षेत्रातील उपस्थीत कवी यांनी राजकीय मंडळीवर तुफान फटकेबाजी करून सत्य परिस्थीतीची जाणीत करून दिली.

जागो जागी चाले आश्वासनांचा धडाका.. तसेच त्यावरी होता काहीसा उन्हाचा तडाखा.. लढण्याची तर पुरे झाली हौस.. यंदा जिकायला नव्हता म्हणे पाउस.. अशा एक ना अनेक विशेष कविता सादरीकरणातून अनेक कवींनी राजकीय मंडळीना शब्दरूपी फटके मारत आज राजकरणाची, सत्य परिस्थितीची जाणीव करून देऊन समाज्यात मतदानाचे महत्व काय असते व आपण मतदान करताना राजकीय नेते यांची आश्वासने व सत्य याचा विचार कवितेतून कवीनी राजकारण या विषयास अनुसरून कविता सादर केल्या व उपस्थितांना विचार करण्यास भाग पाडले.

आपण निवडून दिलंय त्यांना ते प्रतिनिधित्व करताय आपल्या मागण्या, आपले अधिकार पूर्ण करण्यासाठी नुसती लावायची नसते निवडणुकीत बोटाला शाई.. लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही अशा अनेक कविता सादर झाल्या.

या वेळी अध्यक्षस्थानी जिल्हा केंद्राचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे व माजी आमदार नानासाहेब बोरस्ते, जिल्हा केंद्राचे सचिव प्रा. डॉ. अशोक पिंगळे, सदस्य ॲड. राजेंद्र डोखळे, भूषण काळे, कवी लक्ष्मण महाडिक, सवानाचे संचालक संजय करंजकर, ज्येष्ठ कवी सुमती पवार, गणेश ढगे आदी उपस्थित होते. जिल्हा केंद्राच्या सदस्या प्रा. सौ. सुरेखा बोऱ्हाडे यांनी सूत्रसंचालन केले.

- सखोल अभ्यास समग्र चर्चेनंतरच अभ्यासक्रम आराखडा अमलात आणावा यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक व मविप्रच्या दि. २४ डिसेंबर २०२४ च्या चर्चासत्रातील सूर शासनाने प्राथमिक पायाभूत सुविधा अभ्यासक्रमात सतत केले जाणारे बदल, धरसोड धोरण अशा मुद्दयांचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ अभ्यासकांच्या समग्र चर्चेनंतरच राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ अमंलात आणावा, असा सूर यशवंतराव चव्हाण सेंटर शिक्षण कट्टा उपक्रमात उमटला.

केटीएचएम महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण सेंटर व मराठा विद्या प्रसारक समाज यांच्या वतीने शिक्षण कट्टा उपक्रमात राज्य अभ्यासक्रम आराखडयाविषयी चर्चासत्र पार पडले. यात लेखक व अभ्यासक अरविंद शिंगाडे यांच्यासह शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षकांनी सहभाग घेतला. अध्यक्षस्थानी चव्हाण सेंटरचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे होते.

प्रा. अरविंद शिगांडे यांनी उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले, आराखडयात समाविष्ट असलेल्या बाबी मांडल्या व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व, माध्यमिक स्तरावर विषय निवडीचे स्वातंत्र्य याकडे लक्ष वेधले हा आराखडा शिक्षण क्षेत्रातील सर्व घटक, समाज व माध्यम यांनी अभ्यासावा असे आवाहन केले.

तसेच बदलत्या आव्हानांना स्वीकारा व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करावा, असे आवाहन जिल्हा केंद्राचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे यांनी केले. प्रास्ताविकात सेंटरचे शिक्षण विभागाचे राज्य समन्वयक

योगेश कुदळे यांनी राज्यभर सेंटरने राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली शिक्षण कट्टयाच्या माध्यमातून शिक्षकांनी आराखडयाविषयी आपली मते मांडावीत सुधारणा सुचवाव्यात,असे सांगण्यात आले, या वेळी सेंटरचे अ‍ॅड राजेंद्र डोखळे, सुरेखा बोऱ्हाडे, भुषण काळे, डॉ. भास्कर डोखे, न्यायाधीश वसंतराव पाटील, गणेश ढगे आदी मान्यवर उपस्थित होते.

- **यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक येथे दि. १२ जानेवारी २०२५ रोजी पहील्यांदाच इंटिमेट थिएटरमध्ये "प्रथम पुरुष" नाटकाचे सादरीकरण**

मानवीय दृष्टिकोनातून समाजाच्या न्यायालयात स्त्रीने पुरुषावर केलेल्या अभियोगाची गोष्ट सांगणाऱ्या प्रथम पुरूष नाटकाचे सादरीकरण गंगापूर रोड येथील यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राच्या हॉल मध्ये झाले.

प्रथम पुरुष नाट्यप्रयोगात समाजातील पुरुषाचे स्थान टिकविण्यासाठीचा झगडा त्यातून स्त्रीवर होणारा अन्याय पितृसत्तेला बळकटी देणारे घटक, जात, वर्ग, धर्म, लिंग, हा संघर्ष आणि त्यातून होणारी हिंसा व गुंतागुंत, बेरोजगारी अशा महत्त्वपूर्ण प्रश्नांच्या मुळाशी जाउन नाटकातून भाष्य करण्यात आले. प्रयोगानंतर त्यावर चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चेत अभ्यासिकेतील तरुण तरुणींनी तसेच उपस्थित कलावंतांसह परखड मत मांडले नाटयकृतीबद्दल माजी जिल्हा न्यायाधीश वसंत पाटील यांनी ही विचार मांडतांना स्त्रीपुरुष भेदातून स्त्री वर्गाची होणारी हेळसांड व त्यातून स्त्रीवर होणारा अन्याय हे या नाटकातून दाखवण्यात आले आहे असे सांगितले.

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राचे सदस्य अ‍ॅड. राजेंद्र डोखळे यांनी नाटका प्रसंगी बोलतांना सांगितले की मी प्रथमच इतक्या छोटया जागेत इतके प्रभावी नाटकाचे सादरीकरण होवु शकते हे मी पहील्यांदीच पहात आहे. अतीशय उतकृष्ट सादरीकरण कलाकारांनी केले उपस्थित कलावंत अक्षरश: खिळवून ठेवण्यात कलाकार यशस्वी ठरले. तसेच पुढे बोलतांनी नाटकातुन समाजात होणाऱ्या स्त्रीवरील अन्यायास वाचा फोडणारे हे नाटक आहे. नाटकातुन सर्वांनी विचार करावा असाच संदेश हे नाटक देत आहे.

या वेळी यशवंतराव चव्हाण सेंटरचे अध्यक्ष तथा मविप्रचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच जिल्हा केंद्राचे सचिव प्रा. अशोक पिंगळे यांनीही नाटक उतकृष्ट झाल्याचे सांगितले. भूषण काळे यांनी नाशिकमध्ये पहिल्यांदा इंटिमेट थिएटरमध्ये नाटकाचा प्रयोग सादर झाला मुंबई आणि पुण्यात ही संकल्पना राबवली जाते. मात्र नाशिकमध्ये अशा प्रकारचा प्रयोग प्रथमच सादर झाला. असे बोलून सर्वांचे आभार मानले या वेळी गणेश ढगे, तलाह शेख, चेतन शशिर, संकेत थोरात उपस्थित होते.

- यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक आणि इप्टा नाशिक यांच्या संयुक्त विद्यामानाने द केक नाटकाचे सादरीकरण दि. १५ जानेवारी २०२५ रोजी. मराठी नाटय अभिनेता अभिषेक रहाळकर व विनीत पंडित यांनी प्रमूख भुमिका बजावली नाटकात दोन पात्रांनी भावनिक भावविश्व मुखपटातुन सादर केले नाटकास परीसरातील नागरीक व तरुणांची चांगली उपस्थिती होती. यशवंतराव चव्हाण सेंटर चे सचिव प्रा. डॉ. अशोक पिंगळे यांनी उपस्थित राहून कलाकारांचे आभार मानले.

- **यशवंतराव चव्हाण सेंटर व मविप्र तर्फे 'गिधाडांविषयी बोलू काही' उपक्रम दि. ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी गंगापूर रोड येथील I. M. R. T. महाविद्यालयात घेण्यात आला**

जिल्हा केंद्र नाशिक येथे लुप्त होणाऱ्या गिधाडांच्या संवर्धनासाठी एक लोकचळवळ उभी राहावी, या उद्देशाने

यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र नाशिक आणि मराठा विद्या प्रसारक समाज संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने "गिधाडांविषयी बोलू काही" हा कार्यक्रम घेण्यात आला. ०७ फेब्रुवारी २०२५ सकाळी गंगापूर रोड येथील आयएमआरटी महाविद्यालयातील सेमिनार हॉल येथे हा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमात नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या गिधाडांवर काम करणारी तज्ज्ञ मंडळी मार्गदर्शन करणारी होती. राज्यासह नाशिक जिल्हयातून गिधाडांच्या लूप्त होत चाललेल्या संख्येचा त्यांच्या अधिवासाचा आणि गिधाड संवर्धनाच्या दृष्टीने सुजाण नागरिकांची जबाबदारी या विषयांचे सादरीकरण उपस्थितांसमोर झाले. तसेच नाशिक जिल्हयात व राज्यात गिधाडांची संख्या वाढण्याच्या अनुषंगाने विविध संस्था व व्यक्ती काम करत आहेत. या सर्वांनी मिळून केलेल्या प्रयत्नांचे एकत्रीकरण एका व्यासपीठावर मांडण्यासाठी यशवंतराव चव्हाण सेंटर, व मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात महाएमटीबीने तयार केलेल्या नाशिकची गिधाडे या माहितीपटाच्या सादरीकरणाने करण्यात आली. त्यानंतर राज्य व नाशिक जिल्हयातील गिधाडांच्या परिस्थितीविषयी वन्यजीव जीवशास्त्रज्ञ प्रतीक्षा कोठुळे यांनी उपस्थितांना संबोधित केले. तसेच जिल्यातील गिधाडांच्या बचावकार्यासंबंधी रेस्क्यु-नाशिकचे हेड (ऑपरेशन) अभिजित महाले यांनी अनुभव व माहिती दिली.

या कार्यक्रमास उपस्थित जिल्हा केंद्राचे अध्यक्ष व मविप्र नाशिकचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच जिल्हा केंद्राचे सचिव प्रा. डॉ. अशोक पिंगळे यांनी आभार मानले तसेच कार्यक्रमास ॲड. राजेंद्र डोखळे, जिल्हा केंद्राचे कोष्याध्यक्ष विक्रांत मते, सदस्या प्रा. सुरेखा बोऱ्हाडे, भूषण काळे, गणेश ढगे यांनी सहकार्य केले.

- **'आठवणीतील साहेब' कार्यक्रमाचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक व मविप्र यांच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त दि. १५ मार्च २०२५ रोजी 'आठवणीतील साहेब' कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील नामवंत लेखक, ज्येष्ठ पत्रकार राजकीय अभ्यासक यांनी दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या देदीप्यमान कार्यकाळाचा आढावा मांडला.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे 'समाजकारण, राजकारण आणि यशवंतराव' या विषयावर सखोल व अभ्यासपूर्वक व्याखानातून उपस्थित यशवंतप्रेमींना त्या वेळचा महाराष्ट्र व आजचा महाराष्ट्र यातील फरक व राजकारणातील घसरलेली पातळी उजागर केली.

लेखक अरुण शेवते यांनी साहित्य, संस्कृती आणि यशवंतराव या विषयावर भाष्य करते वेळी अनुभवांची फार मोठी शिदोरी त्यांनी एका विशिष्ट शैलीत मांडली.

माजी आमदार ॲड. विलास लोणारी यांनी नाशिकशी यशवंतराव यांचे काय नाते आहे व त्यांनी नाशिकसाठी काय केले आहे. यावर भाष्य केले. व आठवणींना उजाळा दिला.

या वेळी यशवंतराव चव्हाण सेंटरचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे, सचिव प्रा. अशोक पिंगळे कोष्याध्यक्ष विक्रांत मते, सदस्य ॲड. राजेंद्र डोखळे, प्रा. सुरेखा बोऱ्हाडे, समन्वयक भूषण काळे, व्यवस्थापक गणेश ढगे उपस्थित होते.

- **यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक अभ्यासिकेस अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानकडून दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी पुस्तके भेट**

कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिन अर्थात, मराठी भाषा दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर येथील अभ्यासिकेस अक्षरमंच सामाजिक, सांस्कृतिक प्रतिष्ठान नाशिक शाखेच्या अध्यक्षा आरती कुलकर्णी यांनी मराठी भाषेची पुस्तके भेट दिली. मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्यांमध्ये मराठी भाषेची आणखी आवड निर्माण व्हावी,

या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आरती कुलकर्णी यांनी सांगितले जिल्हा केंद्र नाशिकचे व्यवस्थापक गणेश ढगे व जिल्हा केंद्र नाशिकच्या सदस्या प्रा. सुरेखा बोऱ्हाडे यांनी ही भेट स्वीकारली यावेळी जिल्हा केंद्र नाशिक येथील अभ्यासिकेचे विद्यार्थीही मोठया संख्येने उपस्थित होते.

## १०.२ जिल्हा केंद्र, औरंगाबाद (छत्रपती संभाजी नगर)

- **जिगीषा नाट्यसहवास महोत्सवात अनिता दाते व प्राजक्त देशमुख अभिनित 'तो राजहंस एक' नाटकाचे आयोजन**

गेल्यावर्षीपासून 'जिगीषा', यशवंतराव चव्हाण सेंटर, 'महात्मा गांधी मिशन' आणि 'मराठवाडा आर्ट, कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन'तर्फे दरवर्षी एक नाट्यमहोत्सव संभाजीनगर शहरात आयोजित करण्याची घोषणा झाली होती. त्यानुसार या वर्षीचा 'जिगीषा नाट्यसहवास' महोत्सवाचे दि. १७, १८, १९ मे २०२४ रोजी शहरात आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवार दि. १७ मे २०२४ रोजी सायंकाळी सात वाजता रुक्मिणी सभागृह, एमजीएम परिसर येथे संपन्न झाले. सोहळ्यानंतर सपान, नाशिक निर्मित, दत्ता पाटील लिखित, सचिन शिंदे दिग्दर्शित, सध्या महाराष्ट्रात गाजत असलेल्या 'तो राजहंस एक' नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. नाटकात प्रसिद्ध अभिनेत्री अनिता दाते, प्राजक्त देशमुख, हेमंत महाजन, अमेय बर्वे, धनंजय गोसावी आदी कलाकारांच्या भूमिका होत्या.

उद्घाटनाच्या पहिल्या दिवशी असणाऱ्या प्रयोगाला प्रवेश विनामूल्य देण्यात आला. या नाट्यमहोत्सवाला शहरातील रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. या वेळी 'जिगीषा' आणि महोत्सवाचे संयोजक नीलेश राऊत, डॉ.आनंद निकाळजे, दासू वैद्य, डॉ. रेखा शेळके, प्रेरणा दळवी, सुहास तेंडुलकर, नीना निकाळजे, शिव कदम, नीता पानसरे, डॉ.कैलास अंभुरे, सुबोध जाधव, गणेश घुले, डॉ.संदीप शिसोदे, श्रीकांत देशपांडे आदींची उपस्थिती होती.

- **शिक्षणकट्टा उपक्रमात 'मूल समजून घेताना' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई, जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर आणि श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने व शिक्षण विकास मंच आयोजित शिक्षण कट्टा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शनिवार, दिनांक १५ जून २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता हा कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमात खटाव जिल्हा सातारा येथील उपक्रमशील गटशिक्षणाधिकारी प्रतिभा भराडे यांनी 'मूल समजून घेताना...' या विषयावर शिक्षक, पालक, शिक्षणप्रेमी नागरिकांशी संवाद साधत मार्गदर्शन केले.

प्रतिभा भराडे यांनी सातारा जिल्ह्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये ज्ञान रचनावादी शिक्षणाचे प्रयोग राबविले आहेत. नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षणातील ज्ञानरचनावडाचे महत्त्व लक्षात घेता हा कार्यक्रम शिक्षक आणि पालकांसाठी उपयुक्त ठरला. या शिक्षण कट्ट्यास श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे सचिव डॉ श्रीरंग देशपांडे, यशवंतराव चव्हाण सेंटरचे निलेश राऊत ,शिक्षण विस्तार अधिकारी रमेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिक्षक, पालक, शिक्षव्यवस्थेतील प्रेमी, पत्रकार हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **"तुजी औकात काये ?" या नाट्य प्रयोगाचे आयोजन**

राज्यभर गाजत असलेल्या देवदासींच्या वंशात जन्मलेल्या वेदिकाची, तिच्या अस्तित्वासाठी तिने दिलेल्या लढ्यावर आधारित "तुजी औकात काये ?" या नाट्य प्रयोगाचे यशवंतराव चव्हाण सेंटर - जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर, महात्मा गांधी मिशन व मराठवाडा आर्ट कल्चर ॲण्ड फिल्म फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २२ जून २०२४ रोजी सायं. ७ वाजता रूक्मीणी सभागृह, एमजीएम परिसर येथे आयोजन करण्यात आले होते.

देवदासीसारख्या अनिष्ठ, बुरसटलेल्या दोनशे वर्ष जुन्या कुप्रथे विरोधात एका वेगळ्या पद्धतीने यात मांडणी केली होती. प्रसिद्ध लेखिका वेदिका कुमारस्वामी यांच्या गावनवरी या पुस्तकावर ही आधारित आहे. राज्यभरात या नाटकाचे अनेक प्रयोग सादर झालेले असून रसिकांच्या पसंतीस उतरलेला हा प्रयोग आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात पहिल्यांदाच हा प्रयोग आयोजित करण्यात आला होता.

नाट्यरसिकांनी या प्रयोगास मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. या वेळी केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, सल्लागार नंदकिशोर कागलीवाल, सचिन मुळे, नीलेश राऊत, डॉ.आनंद निकाळजे, दासू वैद्य, डॉ. रेखा शेळके, प्रेरणा दळवी, सुहास तेंडुलकर, नीना निकाळजे, शिव कदम, डॉ. कैलास अंभुरे, सुबोध जाधव, गणेश घुले, डॉ.संदीप शिसोदे, मंगेश निरंतर, श्रीकांत देशपांडे आदींची उपस्थिती होती.

- **चित्रपट चावडी मध्ये 'दिशा स्वराज्याची' या माहितीपटाचे प्रदर्शन**

यशवंतराव चव्हाण सेंटर, एमजीएम जर्नालिझम कॉलेज व एमजीएम स्कुल ऑफ फिल्म आर्टस्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्रपट चावडी या उपक्रमात आचार्य विनोबा भावे जयंतीनिमित्त 'दिशा स्वराज्याची' या माहितीपटाचे विशेष प्रदर्शन करण्यात आले. वीरेंद्र वळसंगकर यांनी या माहितीपटाचे दिग्दर्शन केले आहे. एमजीएम कॅम्पस येथील चित्रपती व्ही. शांताराम प्रेक्षागृह येथे शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता सदरील माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले.

मेंढा (लेखा) हे गडचिरोली जिल्ह्यातील छोटेसे गाव आहे. या गावाने एकत्र येऊन आपल्या गावभोवतालच्या जल, जंगल जमीनवरील अधिकार मिळवला आहे. अशा रीतीने वनाधिकार मिळवणारे ते भारतातील पहिले गाव ठरले आहे. एका छोट्याशा गावाने एकत्र येऊन गावचा कारभार कसा चालवता येऊ शकतो याचे उत्तम उदाहरण जगासमोर ठेवले आहे. 'दिशा स्वराज्याची' हा माहितीपट या गावाच्या संघर्षाची कथा सांगतो.

- **विख्यात गायक पद्मश्री व्यंकटेश कुमार यांची दिवाळी पहाट**

यशवंतराव चव्हाण सेंटर, महात्मा गांधी मिशन व मराठवाडा आर्ट कल्चर ॲण्ड फिल्म फाउंडेशनच्या वतीने

दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील अभ्युदय दीपोत्सव - २०२४ या दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुरूवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी (नरक चर्तुदशी) पहाटे ६ वाजता सदरील कार्यक्रम रूक्मिणी सभागृह, एमजीएम कॅम्पस येथे संपन्न झाला.

यंदाच्या दीपोत्सवात भारतीय शास्त्रीय संगीत परंपरेतील किराणा व ग्वालियर घराण्याचे विख्यात शास्त्रीय संगीत गायक पद्मश्री पं.व्यंकटेश कुमार यांनी आपले केले. पं. व्यंकटेशकुमार यांना पद्मश्रीसह संगीत नाटक अकादमी, कर्नाटक राज्योत्सव पुरस्कार, वत्सला भीमसेन जोशी पुरस्कार, मध्यप्रदेश सरकारचा मानाचा कालीदास सन्मान आदी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. भारतीय शास्त्रीय संगीताच्या परंपरेतील पंडीत व्यंकटेश कुमार हे आजच्या काळातील अतिशय महत्वाचे नाव आहे. या मैफिलीत पंडीतजींच्या साथीला प्रसिध्द हार्मोनियम वादक सुयोग कुंडलकर (पुणे), प्रसिध्द तबला वादक भरत कामत (पुणे) व शिवराज पाटील (कोल्हापूर) हे होते.

- **आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या चाळिसाव्या पुण्यतिथीनिमित्त 'महाराष्ट्र निवडणूक निकालांचा अन्वयार्थ' या विषयावर व्याख्यान**

**ज्येष्ठ राजकीय अभ्यासक प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी राज्य निवडणुकांचे विश्लेषण केले**

यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर व एम जी एम विद्यापीठाचा जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या चाळिसाव्या पुण्यतिथीनिमित्त 'महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालांचा अन्वयार्थ' या विषयावर शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख व ज्येष्ठ राजकीय अभ्यासक प्रा. डॉ. प्रकाश पवार यांच्या विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये कोण जिंकले ? कोण पराभूत झाले ? कोणाला त्याच्यामध्ये आवड होती ? कोणाचे मन खच्ची झाले ? कोणाला उत्सव वाटला ? याच्याशी काहीही संबंध न ठेवता तटस्थपणे ही निवडणूक समजून घेतली पाहिजे. आणि ती समजून घेतली नाही तर फार मोठी अडचण निर्माण होऊ शकते, असे प्रतिपादन ज्येष्ठ राजकीय अभ्यासक प्रा.डॉ. प्रकाश पवार यांनी या वेळी केले.

या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.जयदेव डोळे, ज्येष्ठ पत्रकार प्रवीण बर्दापूरकर, सुहास तेंडुलकर, वैशाली बावस्कर, प्राचार्या प्रा.डॉ.रेखा शेळके, सुबोध जाधव व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा.डॉ.पवार म्हणाले, ही निवडणूक समजून घेण्यासाठी बऱ्याच अडचणी आहेत. पैसा, मोदी आणि शक्ती या गोष्टीवर आपण फार जोर देऊन बोलू लागलो तर एका अर्थाने निवडणुकीच्या अनेक गोष्टी समजायला अडचण निर्माण होते. या गोष्टी नाहीतच असे नाही मात्र, या गोष्टीवर लक्ष दिले तर आणखी काय घडलं हे समजणार नाही. दोन्ही आघाड्यांमध्ये पंधरा ते साडे पंधरा टक्क्यांच्या मतांचे अंतर आहे. जिथे अर्धा टक्के मते फिरली झाली तर संपूर्ण निकाल बदलतो. इथे तर फार मोठा फरक आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात हिंदुत्वाची मते ही अगोदर १७ ते २५% दरम्यान असायची. आता हिंदुत्ववादाची मते साधारणपणे ५८% झाली आहेत.

महाराष्ट्र राज्यात जातीवर प्रचंड चर्चा घडवून आणल्याचा बनाव केला गेला मात्र, जातीने काम केले नाही तर या निवडणुकीत हिंदुत्वाने काम केले. राज्यातील प्रत्येक जात स्वत:च्या जातीचा विचार करीत होती म्हणजे

अंतिमत: ती जात हिंदुत्ववादाचा विचार करीत होती. या निवडणुकीत रोखठोकची जी भाषा ऐकायला आली ती हिंदुत्वाची भाषा होती. आक्रमक भाषेचे नाणे या निवडणुकीत चालले. या पार्श्वभूमीवर जातीची जी चर्चा झाली त्यामध्ये एका बाजूला मराठा आणि दुसऱ्या बाजूला ओबीसीची चर्चा होऊ दिली. पण मराठा नावाचे राजकारण या निवडणुकीत आहे का ? याचे उत्तर नाही असे आहे. या निवडणुकीत ओबीसीचे राजकारण आहे का ? याचे उत्तर ही नाही असे आहे. इथे फक्त हिंदुत्वाचे राजकारण होते, असे प्रा.डॉ.पवार यांनी या वेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या डॉ.रेखा शेळके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हृषिकेश मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ.ह.नि.सोनकांबळे यांनी केले.

- **'नर्मदा बचाव आंदोलना' च्या ३५ वर्षांचा आढावा घेणारा माहितीपट 'लकीर के इस तरफ चे चित्रपट चावडीत प्रदर्शन**

यशवंतराव चव्हाण सेंटर, एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय व एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस्यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रपट चावडीचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांतर्गत 'नर्मदा बचाव आंदोलना' च्या ३५ वर्षांचा आढावा घेणारा 'लकीर के इस तरफ' चित्रपटाच्या विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी या माहितीपटाच्या दिग्दर्शिका शिल्पा बल्लाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

'नर्मदा बचाव आंदोलना'च्या ३५ वर्षांचा आढावा घेणारा माहितीपट म्हणजे - लकीर के इस तरफ. ९० मिनिटांच्या या माहितीपटात, आंदोलनाचं यश-अपयश याची मांडणी तर आहेच, पण त्यापेक्षा मनात भरतात त्या आंदोलनानं सुरू केलेल्या आदिवासी मुलांसाठीच्या, नर्मदेच्या कुशीतल्या जीवनशाळा!!! लडाई - पढाई साथ साथ म्हणत, संघर्ष आणि निर्माण एकत्र कसं साधायचं याचा वास्तुफठ यात आहे.

महाराष्ट्र शासनाच्या समाजशास्त्र विषयाच्या पुस्तकात, लकीर के इस तरफ या माहितीपटाचा उल्लेख केला आहे. सामाजिक चळवळी या प्रकरणात संदर्भ म्हणून विद्यार्थ्यांना ही फिल्म सुचवली गेली आहे.

चित्रपट प्रदर्शनानंतर दिग्दर्शिका शिल्पा बल्लाळ यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

प्रवेश सर्वांसाठी खुला होता रसिक, विद्यार्थी, अभ्यासक यांची या वेळी मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

- **दहावा अजिंठा वेरूळ इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल**

जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या आठव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे बुधवार, दि. १५ ते रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ या दरम्यान हा महोत्सव आयनॉक्स थिएटर, प्रोझोन मॉल, औरंगाबाद येथे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवाचे उद्घाटन एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या वेळी, महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खरगे, महोत्सवाचे मानद अध्यक्ष व प्रसिद्ध दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, फिप्रेसी ज्यूरी चेअरपर्सन लतिका पाडगावकर, अभिनेत्री सीमा बिस्वास, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, महोत्सव संचालक सुनील सुकथनकर, महोत्सवाचे कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, महोत्सवाचे संयोजक नीलेश राऊत व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

नाथ ग्रुप, महात्मा गांधी मिशन व यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र औरंगाबाद प्रस्तुत व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल हा महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने झाला असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळाले होते. एनएफडीसी, सूचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती होती. नाथ स्कूल ऑफ बिजनेस मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी (एनएसबीटी), अभ्युदय फाउंडेशन हे या महोत्सवाचे सहआयोजक होते. एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस या महोत्सवाचे नॉलेज पार्टनर होते.

यंदाचा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार प्रसिद्ध व ज्येष्ठ लेखिका, नाटककार, निर्मात्या व चित्रपट दिग्दर्शिका पद्मभूषण सई परांजपे यांना त्यांच्या भारतीय सिनेमातील अतुल्य योगदानाबद्दल मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी, दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात बोलताना सई परांजपे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

भारतीय सिनेसृष्टीचे संस्थापक दादासाहेब फाळके यांनी १०५ वर्षांपूर्वी दिग्दर्शित केलेला प्रसिद्ध मूकपट कालिया मर्दन प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्याआधी दाखविण्यात आला. शंभर वर्षांपूर्वीचा मूकपट प्रत्यक्ष संगीताद्वारे रसिकांना अनुभवता यावा म्हणून कालिया मर्दन हा मूकपट कोलकाता येथील सतब्दीर सब्द या वाद्यवृंद समूहातर्फे सादरीकरणाद्वारे दाखविला गेला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीता पानसरे आणि प्रियंका शाह यांनी केले. तर प्रा. शिव कदम यांनी आभार मानले.

महोत्सवाच्या पाच दिवसात सुमारे सात हजार सिनेरसिकांनी हजेरी लावली.

- **यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त दि.१२ मार्च रोजी 'सुसंस्कृत? राजकारणाचा मराठवाडा पॅटर्न' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर व एम एम विद्यापीठाच्या जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त 'सुसंस्कृत ? राजकारणाचा मराठवाडा पॅटर्न' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. ज्येष्ठ पत्रकार व स्तंभलेखक सुहास सरदेशमुख यांनी या प्रसंगी आपले विचार व्यक्त केले. चव्हाण सेंटरच्या जिल्हा केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

मागील वर्षभरात मराठवाड्यात सातत्याने विविध गुन्हेगारी घटना घडत आहेत. दिवंगत संतोष देशमुख यांची हत्या, सोमनाथ सूर्यवंशी यांचा कोठडीतील संशयास्पद मृत्यू यांसह अनेक गुन्ह्यांमध्ये राजकीय सहभाग दिसून आलेला आहे. या सर्व सहभागाच्या निमित्ताने जो नवा राजकीय पॅटर्न जन्माला येत आहे त्याचा ऊहापोह या व्याख्यानाच्या निमित्ताने करण्यात आला. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला संस्कृत राजकारणाची परंपरा दिली. त्याच राज्यात आज राजकारणाचा मार्ग नेमकी कुठली दिशा धारण करतोय याबद्दल विचार करणे गरजेचे बनले आहे.

## १०.३ जिल्हा केंद्र, नांदेड

- यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने आयोजित मराठवाडा ते कोकण युवा अभिसरण (Youth Exchange Program) मध्ये नांदेड जिल्ह्यातील १६ युवा युवतींनी सहभाग घेतला होता. युवा अभिसरण राज्य समन्वयक

प्रा. रणजीत बायस यांनी काल नांदेड जिल्हा केंद्रात या सहभागी टीम सोबत दोन तास चर्चा केली आणि अभिसरणानंतर आपल्यात काय बदल झाले आणि आता आपण अनुभवलेल्या काही गोष्टींचा आपल्या दैनंदिन जीवन जगण्यात काही उपयोग होतो का ? नांदेड जिल्हा केंद्रासोबत आपल्याला कसे जोडून घेता येईल, काही उपक्रम आपण स्थानिक गरजेनुसार सुरू करू शकतो का ? अशा अनेक महत्त्वपूर्ण चर्चेत युवांनी सहभाग घेतला आणि मोठ्या आशावादासह आपण नक्कीच उत्कृष्ट कार्य करू आणि जिल्हा केंद्र व मुंबई कार्यालयासोबत संपर्कात राहू असा निर्णय झाला. अभिसरण या उपक्रमा चा युवकांच्या जडणघडणीत नक्कीच उपयोग होत आहे, हे दिसून आले. या वेळी अभिसरणात सहभागी युवक युवती अभिसरण राज्य समन्वयक प्रा. रणजीत बायस, सामाजिक कार्यकर्ते भगवान कंदारे, नांदेड जिल्हा केंद्र सचिव शिवाजी गावंडे आणि निखिल जाधव यांच्यासह अनेकांनी या सुसंवाद कार्यक्रमात सहभाग घेतला.

## १०.४ जिल्हा केंद्र, नवी मुंबई

- **ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यशाळा**

सेंटरच्या मुख्यालयाने ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ नागरीकांसाठी एक कार्यशाळा आयोजित करण्याचे आवाहन केले होते.

त्यास अनुसरून प्रसिध्द युवा मानसोपचार तज्ञ कुमारी. रिचीका गुप्ता, मुंबई यांचे व्याख्यान व कार्यशाळा ज्येष्ठ नागरिकांसाठी सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० पर्यंत दिनांक २ ऑक्टोबर, २०२४ रोजी आयोजित करण्यात आली. “Your Mind matters, No matter the Age” या विषयावर सदरील कार्यशाळा ज्येष्ठ नागरीक भवन, नेरुळ - पश्चिम येथे आयोजित करणेत आली व कुमारी. रिचीका गुप्ता यांनी ‘वयापेक्षा आपले मन महत्वाचे असून ते खंबीर करण्याबाबत’ मार्गदर्शन केले.

नवी मुंबई केंद्राचे अध्यक्ष, प्रमोद कर्नाड तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे श्री. अरविंद वाळवेकर यांच्यासह अनेक ज्येष्ठ नागरिकांनी आपले प्रश्न व शंका विचारून कार्यशाळेमध्ये सक्रिय सहभाग घेतला कार्यशाळेत PPT सादरीकरणपण झाले. कार्यक्रमानंतर केंद्रातर्फे सर्वांना अल्पोपहार व नाष्टा देण्यात आला.

- **दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२५ ‘कृतज्ञता पुरस्कार २०२५’ चे वितरण**

नवी मुंबई केंद्रातर्फे प्रतिवर्षी कृतज्ञता पुरस्कार नवी मुंबईतील आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या निवडक संस्था / व्यक्ती यांना दिला जात आहे. या वर्षी श्री गजाननलीला ट्रस्ट, नेरुळ यांना अनाथ व आदिवासी मुलांचे सक्षमीकरण या क्षेत्रासाठी, संकल्प चॅरीटेबल ट्रस्ट नेरुळ गाव यांना दिव्यांग व अपंगत्व समस्या निवारण या क्षेत्रासाठी, पुणे विद्यार्थी गृह नेरुळ यांना शिक्षण प्रसारण क्षेत्रासाठी तर आदित्य हेल्थ एज्युकेशन सोसायटी, कोपरखैराणे यांना आरोग्य सेवेतील उल्लेखनीय कार्यासाठी केंद्रातर्फे कृतज्ञता पुरस्कार प्रदान करण्यात आला.

तसेच सांस्कृतिक संवर्धन, साहित्य व प्रबोधन, पर्यावरण, क्रिडा, व्यसन मुक्ती, प्रशासन, संगीत सेवा, चित्रकला संवर्धन व तसेच पत्रकारीता इ. विविध क्षेत्रात नव्या मंबईत उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तींनाही “कृतज्ञता पुरस्कार- २०२५” प्रदान करण्यात आला. या प्रसंगी नुकतेच पद्मश्री किताबाने सन्मानित झालेले नवी मुंबईचे सुलेखनकार अच्युत पालव यांचा सत्कार करण्यात आला व काही पुरस्कार त्यांच्या शुभ हस्ते देण्यात

आले. सदरील कार्यक्रम स्टर्लिंग कॉलेजच्या वातानुकूलित हॉलमध्ये नेरुळ, नवीमुंबई येथे संपन्न झाला व त्यास सुमारे ४०० रसिक श्रोते उपस्थित होते.

- **सांगीतिक कार्यक्रम**

युवा संगीतकार कृष्णा - देवा कृतज्ञता पुरस्कार प्रदान समारंभाच्या प्रसंगी नेरुळमधील युवा कलाकार व संगीतकार जोडी चि. कृष्णा व चि. देवा यांचा दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२५ सांगितीक कार्यक्रम सादर करणेत आला. या प्रसंगी नवी मुंबई केद्राचे अध्यक्ष, श्री. प्रमोद कर्नाड यांच्या पसायदानाच्या सुश्राव्य गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सदरील कार्यक्रम स्टर्लिंग कॉलेजच्या वातानुकूलित हॉलमध्ये नेरुळ, नवीमुंबई येथे संपन्न झाला व त्यास सुमारे ४०० रसिक श्रोते उपस्थित होते.

## १०.५ केंद्र, कराड

- **सौ.वेणूताई चव्हाण यांची ४१वी पुण्यतिथी**

सौं.वेणूताई चव्हाण यांच्या ४१ व्या पुण्यतिथीनिमित्त शास्त्रीय सांगीत गायक श्री. मयूर महाजन व कु.अंजली गायकवाड यांचे शास्त्रीय संगीत व भक्तिगीतांची मैफल या कार्यक्रमाचे सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबि ट्रस्ट कराड येथे आयोजन करण्यात आले होते.प्रथम स्व. यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या प्रतिमेस मा. आ. बाळासाहेब पाटील व मा. खा. श्री. श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आल्यानंतर कार्यक्रमास सायंकाळी ६.३० वाजता सुरुवात करण्यात आली या वेळी संस्थेचे सदस्य श्री.नंदकुमार बटाणे श्री. राजेश पाटील वाठारकर श्री.सारंग पाटील सौरभ पाटील डॉ. गुजर व इतर मान्यवर तसेच प्रेक्षक वर्ग उपस्थित होते.

- **७८वा स्वातंत्र्यदिन**

यशवंतराव चव्हाण सेंटर विभागीय केंद्र कराड येथे १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ८ वाजता ७८ व्या स्वातंत्र्यदिना निमित्त श्री.अक्षय पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले या वेळी विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टचे सर्व कर्मचारी व अभ्यासिकेतील विद्यार्थीही उपस्थित होते.

- **अभिसरण उत्तर महाराष्ट्र ते पश्चिम महाराष्ट्रात अभिसरण**

'अभिसरण उत्तर महाराष्ट्र ते पश्चिम महाराष्ट्रात अभिसरण'च्या दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन कराड येथील यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज कराड येथे करण्यात आले होते सर्वप्रथम मुंबई सेंटरचे श्री. संतोष मेकाले, श्री. रंजीत बायस यांनी कार्यक्रमास सुरुवात करून सहभागी तरुणांना माहिती देउन प्रीतिसंगम या यशवंतराव चव्हाण साहेबांच्या समाधिस्थळाला भेट दिली आणि विरंगुळा निवासस्थानालाही भेट दिली. त्यानंतर सकाळ समूहाचे राज्य संपादक सम्राट फडणीस यांनी तरुणांना मार्गदर्शन केले, पश्चिम महाराष्ट्राची ओळख, इतिहास, संस्कृती, भाषा, खाद्यपदार्थ, किल्ले याबद्दल सविस्तर माहिती दिली. व जिल्ह्या नुसार करण्यात आल्यानंतर सातारा जिल्ह्यातील टिमने पुढील ३ भेट दिलेली ठिकाणे पुढीलप्रमाणे

१ यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या विरंगुळा येथे भेट देऊन येथील यशवंतराव चव्हाण यांचे फोटो पाहून त्यांचा पत्रव्यवहार व इतर साहित्य संपदेची माहिती घेतली

२ स़ौ.वेणूताई चव्हाण स्मृतिसदन येथील यशवंतराव चव्हाण यांची ग्रंथसंपदा, वस्तुसंग्रहालय व अँबेसिडर कार, सभागृह अभ्यासिकेची माहिती घेतली

३ कराड येथील यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन येथील सभागृह तसेच व अभ्यासिकेची माहिती घेतली

४ पंथाचा कोट येथील नकट्यारावळ विहीर

५ टेंभू धरण येथील जलविद्युत प्रकल्पाची पाहणी करून माहिती घेतली,

६ टेंभू गोपाळ गणेश आगरकर जन्मगाव व गोपाळ गणेश आगरकर शाळा भेट

७ करवडी येथील प्रगतशील शेतकरी यांच्या पेरू बाग ऊस उत्पादक शेतीस भेट दिली

८ सदाशिवगड छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या गडांपैकी कारकिर्दीतील हा एक गड आहे

९ आगाशिव येथील डोंगरावर 101 पांडवकालीन लेणी आहेत परंतु सध्या यापैकी सुस्थितीत ६4 लेणी आहेत व शंभू महादेव मंदिर आहे हे दाखवण्यात आले.

१० प्रथम दूध उत्पादन व प्रक्रिया प्रकल्प भेट

११ मलकापूर येथील सह्याद्री व्याघ्र प्रकल्प येथे भेट देऊन माहिती घेतली

- **यशवंतराव चव्हाण यांची ४० वी पुण्यतिथी सोहळा**

स्व.यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या ४० व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराड या दोन्ही संस्थांमधील यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या प्रतिमेस सकाळी ९.०० वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर केंद्र कराडचे अध्यक्ष मा. श्री. बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. या वेळी संस्थेचे सदस्य श्री. विक्रमसिंह पाटणकर, श्री. नंदकुमार बटाणे, श्री. राजेश पाटील वाठारकर, श्री. सारंग पाटील श्री. सुनिल पवार व इतर मान्यवर तसेच दोन्ही संस्थांमधील कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

- **प्रजासत्ताक दिन**

यशवंतराव चव्हाण सेंटर विभागीय केंद्र कराड येथे २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८ वाजता प्रजासत्ताक दिनानिमित्त विभागीय केंद्रचे ध्वजारोहण विभागीय केंद्र कराड चे सदस्य श्री. नंदकुमार बटाणे यांच्या हस्ते करण्यात आले या वेळी विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट चा कर्मचारीवर्ग व अभ्यासिकेतील विद्यार्थी उपस्थित होते.

- **सौ. वेणूताई चव्हाण यांची ९९ वी जयंती**

सौ. वेणूताई चव्हाण यांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराड या दोन्ही संस्थांमधील यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या प्रतिमेस संस्थेचे सदस्य श्री. नंदकुमार बटाणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले या वेळी दोन्ही संस्थांमधील कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

- **यशवंतराव चव्हाण साहेब यांचा ११२ वा जयंती सोहळ्यानिमित्त भक्तिगीत व काव्य गायन कार्यक्रम**

स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या ११२व्या जयंतीनिमित्त भक्तिगीत व काव्य गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम यशवंतराव चव्हाण सेंटर केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराड येथील यशवंतराव चव्हाण व सौ.वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास सकाळी १०.०० वाजता पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आल्यानंतर १०.३० वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र कराड 'विरंगुळा' येथे भक्तिगीत व काव्य गायन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली यावेळी श्री. सतीश कुलकर्णी, श्री. बाबा वैद्य, श्री. शंतनु गोखले, श्री. धनंजय कुंभार, श्री. विजय धोकटे, श्री. मयूर महाजन, श्री. महादेव शिंदे इतर मान्यवर तसेच दोन्ही संस्थांमधील कर्मचारीवर्ग उपस्थित होते .

## १०.६ जिल्हा केंद्र, जळगांव

- **सॅनिटरी नॅपकिन्सचे वितरण**

उद्दिष्ट: मासिक पाळी स्वच्छता प्रोत्साहन देणे आणि आदिवासी महिलांच्या आरोग्य स्थितीत सुधारणा करणे.

लक्ष्य: जळगाव जिल्ह्यातील विविध आदिवासी भागांमध्ये ५,000 सॅनिटरी नॅपकिन्सचे वितरण.

अंतर्भूत उपक्रम: आदिवासी समूहांची ओळख पटविणे

- मासिक पाळी स्वच्छतेबाबत जनजागृती सत्रे
- स्थानिक आरोग्य कर्मचारी व स्वयंसेवकांमार्फत वितरण

झालेला परिणाम:

- जनजागृती आणि स्वच्छता वाढली
- किशोरवयीन मुलींमध्ये शाळा बुडविण्याचे प्रमाण कमी झाले
- महिलांच्या आरोग्य व सन्मानाला आधार मिळाला

- **नाट्यप्रयोग - 'पाझर'**

उद्दिष्ट: दुष्काळ परिस्थितीवर नाटकाच्या माध्यमाने जागृती करणे.

स्थान: चोपडा शहर

अंतर्भूत उपक्रम:

- सामाजिक संदेश असलेले नाटकाचे लेखन
- स्थानिक कलाकारांचे सराव व प्रशिक्षण
- चोपड्यातील महत्त्वाच्या ठिकाणी सार्वजनिक प्रयोग

झालेला परिणाम:

- मनोरंजनाच्या माध्यमातून समाजातील लोकांचा सहभाग व शिक्षण
- सामाजिक प्रश्नांवर संवादाला प्रोत्साहन
- स्थानिक कला व प्रतिभेला चालना

- **नेत्र तपासणी शिबिर**

उद्दिष्ट: गरजू व दुर्लक्षित लोकसंख्येसाठी मोफत नेत्र तपासणी व दृष्टी आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.
स्थान: जळगाव जिल्हा
अंतर्भूत उपक्रम:

- स्थानिक रुग्णालये / नेत्रतज्ज्ञ यांच्याशी भागीदारी
- मोफत तपासणी व चष्म्यांचे वितरण
- मोतीबिंदू व इतर शस्त्रक्रियांसाठी आवश्यक असल्यास संदर्भ देणे

झालेला परिणाम:

- डोळ्यांच्या आजारांचे लवकर निदान
- लाभार्थ्यांच्या जीवनमानात सुधारणा
- गरजूंसाठी आरोग्यसेवा उपलब्धता

- **रक्त तपासणी शिबिर**

उद्दिष्ट: मधुमेह व पूर्व मधुमेह यांचे लवकर निदान करणे.
स्थान: जळगाव जिल्हा
अंतर्भूत उपक्रम:
विविध ठिकाणी मोफत रक्तशर्करा तपासणी शिबिरे आयोजित करणे
झालेला परिणाम:

- ज्ञात मधुमेहींसाठी साखरेची पातळी आणि औषधोपचारांचा परिणाम तपासण्यात मदत झाली
- ज्यांचे निकाल असामान्य आहेत अशा व्यक्तींना पुढील तपासण्या व उपचारासाठी संदर्भ दिला जाऊ शकतो
- दीर्घकालीन आजार व्यवस्थापनाची सुरुवात करण्यास मदत झाली
- जनतेला मधुमेहाचे धोके, लक्षणे व जीवनशैलीतील बदल याबाबत शिक्षण मिळाले
- मधुमेहाबाबतचे गैरसमज व सामाजिक कलंक कमी झाले

- **खतांचे वितरण**

शेतकऱ्यांना मोफत खतांचे वितरण करण्यात आले.
झालेला परिणाम:

- पिकांच्या हंगामापूर्वी व दरम्यान शेतकऱ्यांना खतांची वेळेवर उपलब्धता सुनिश्चित झाली
- संतुलित व कार्यक्षम खत वापराला प्रोत्साहन देऊन शेती उत्पादनक्षमतेत वाढ झाली

स्थान: जळगाव जिल्हा
निष्कर्ष:

यशवंतराव चव्हाण केंद्र - जळगाव हे आरोग्य, स्वच्छता जनजागृती आणि शेतकऱ्यांना मदत या क्षेत्रातील प्रभावी उपक्रमांद्वारे समाजकल्याणासाठी कटिबद्ध आहे.

या प्रकल्पांचे उद्दिष्ट जळगाव जिल्ह्यातील दुर्लक्षित भागात सकारात्मक बदल घडवून आणणे हे आहे.

## १०.७ जिल्हा केंद्र, सोलापूर

● यशवंतराव चव्हाण सेंटरच्या युवा विभागाकडून ११ मे ते १८ मे २०२४ दरम्यान आयोजित अभिसरण उपक्रमाअंतर्गत विदर्भातील ९ युवा सोलापूर जिल्ह्याच्या अभ्यासासाठी आले होते. या युवांना पश्चिम महाराष्ट्र समजावा हा यामागील हेतू होता. यासाठी भौगोलिक, शैक्षणिक, सामाजिक, शेती, उद्योग, संत परंपरेची संस्कृती यासह अभिनव उपक्रमांची माहिती या वेळी यांना करून देण्यात आली.

सहभागी युवांनी करमाळा तालुक्यातील समृद्ध शेती पहिली. पंढरपूर येथे विठ्ठल रुक्मिणी दर्शन, कैकाडी महाराजांचा मठ, सूर्यनारायण मंदिर यासह संत परंपरेचा अभ्यास केला तसेच पालवी या सामाजिक संस्थेची भेट घेतली. त्यानंतर मंगळवेढा तालुक्यातील संत दामाजी मंदिर, माचनूर येथील सिद्ध रामेश्वराचे प्राचीन मंदिर, त्याची शिल्पकला, भीमा नदीतून बोटीने प्रवास, दामाजी महाविद्यालयास भेट दिली. सोलापूर मधील विडी वळणाऱ्या महिलांशी संवाद, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तबला वादक पंडित आनंद बदामीकर, शिल्पकार भगवान रामपुरे, सहकार क्षेत्रातील नेते धर्मराज काडादी यांच्याशी विविध विषयांवर युवांनी मार्गदर्शन घेतले. प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांच्यासह करमाळ्याचे बिडीओ मनोज राऊत, सरपंच शरद भोसले, प्रगतशील शेतकरी सुहास गलांडे, बाळासाहेब बोडखे, गजेंद्र पोळ, पंढरपुरचे प्रा. दत्तात्रय मस्के, प्रा. यशपाल खेडकर, किशोरमहाराज जाधव, मंगळवेढ्याचे राहुल शहा, प्रा. दत्ता सरगर, सांगोल्याचे योगेश खटकाळे, सोलापूरचे दत्ता गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**● उद्योग व व्यापार यातील विश्वास आणि नीतिमूल्य जयकुमार पाटील यांनी जपली - डॉ. रावसाहेब पाटील**

सोलापूर हे उद्योगाचं पूर्वीपासून केंद्र आहे. कापड गिरण्या आणि सूत व्यवसाय व वस्त्र उद्योग यासाठी सोलापूर प्रसिद्ध होतं आणि आहे.

पण याला वेगळा आयाम देत स्व. कलगोंडा पाटील आणि जयकुमार पाटील यांनी यांत्रिक उद्योगास प्राधान्य दिलं. त्यामुळेच लक्ष्मी उद्योग समूह, प्रिसिजन, क्रॉस इंटरनॅशनल यासह अनेक मोठे उद्योग सोलापुरात उदयास आले. चिंचोली एमआयडीसी चे जनक जयकुमार पाटील यांनीच ही किमया घडवून आणली कारण ही एमआयडीसी उभी करण्यासाठी त्यांनी अतोनात मेहनत घेतली आहे.

स्वत:च्या व्यवसायासोबतच इतर व्यवसाय देखील सोलापुरात जोमाने सुरू व्हावेत हा व्यापक विचार जयकुमार पाटील यांनी नेहमीच जपला उद्योगात ग्राहक केंद्रबिंदू मानून उत्पादन आणि विक्री झाली पाहिजे हा त्यांचा मापदंड होता. त्यामुळे सोलापूरचे उद्योगशिल्प म्हणजे जयकुमार पाटील असे समीकरण निर्माण झाले आहे. उद्योगशिल्प जयकुमार पाटील यांच्या विसाव्या पुण्यतिथी निमित्ताने यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र सोलापूर आणि मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चर्चासत्रात डॉ.रावसाहेब पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले.

प्रारंभी. प्रा. सविता वैद्य यांनी प्रास्ताविकात चर्चासत्र आयोजनाचा हेतू सांगितला.

या उपक्रमामागील यशवंतराव चव्हाण सेंटरची भूमिका दत्ता गायकवाड यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना सांगितले प्रारंभी प्रिन्सिपल के पी मंगळवेढेकर तसेच आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण आणि उद्योग शिल्प जयकुमार पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी व्यवस्थापन शास्त्रातील विद्यार्थी तसेच प्रा. स्नेहल पाठक, प्रा. टिंकेश ग्यामलानी सरफराज शेख दिनेश शिंदे आदी उपस्थित होते.

## १०.८ जिल्हा केंद्र, अहिल्यानगर

- **महिलांचे कायदेविषयक हक्क व अधिकार**

यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र अहिल्यानगर व मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "महिलांचे कायदेविषयक हक्क व अधिकार" या विषयावर जनजागृतीपर सत्राचे आयोजन ३० सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले. ॲड. स्वाती पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या सत्रात POSH, POSCO, विवाह नोंदणी, कौटुंबिक अत्याचार विरोधी कायदे, यावर मार्गदर्शन केले. महिलांचे हक्क व अधिकार वेगवेगळे असून कायद्याला न घाबरता कायद्याचा योग्य वापर कसा करावा याचे मार्गदर्शन त्यांनी केले. या कार्यक्रमासाठी घुले पाटील कॉलेजचे प्राचार्य व त्यांचे सहकारी यांचे विशेष सहकार्य लाभले,

## १०.९ जिल्हा केंद्र, परभणी

- यशवंतराव चव्हाण सेंटर, परभणी जिल्हयाच्या वतीने आयोजीत मानसिक स्वास्थ्य व आरोग्य कार्यशाळा, मन करारे प्रसन्न.... ( शोध आनंदी जीवनाचा) दिनांक २२ नोव्हेंबर, २०२४ रोज शुक्रवार वेळ सायंकाळी ६.०० ते ८.०० स्थळ यशस्विनी सभागृह, ९ राखण, योगक्षेम कॉलनी, विसावा कॉर्नर, जिंतुर रोड, परभणी येथे हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या प्रसंगी अध्यक्षस्थानी (कृषिभुषण) मा. कांतरावजी देशमुख यांच्यासह प्रमुख वक्ते प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ मा. डॉ. जगदिश नाईक यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथून आलेल्या दिपीका शेरखाने, यशवंतराव चव्हाण सेंटर, परभणीचे सचिव विजय कान्हेकर, अरुण चव्हाळ, विलास पानखडे, मधुकर नायक, विठ्ठल भुसारे, सुभाष ढगे, सूरज कदम, जिल्हा प्रतिनिधी, (दैंनीक देशोन्नती), प्राचार्य बाळासाहेब जाधव, (श्री. शिवाजी महाविद्यालय, वसमत रोड, परभणी), रवि पाठक (फिल्म क्लब), विनोद डावरे, सुरेंद्र रोडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांना पुस्तके भेट देऊन यशवंतराव चव्हाण सेंटरचे विलास पानखडे, मधुकर नायक आदींनी पाहुण्यांचे स्वागत केले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

प्रास्तविक करतांना अरुण चव्हाळ यांनी त्यांच्या भाषणात सर्व तरुण, वयस्कर मंडळीनी समाजातील प्रचलित अंधश्रद्धेला थारा न देता, कसल्याही प्रकारचा न्यूनगंड न बाळगता वेळीच स्वत:वर उपचार करून मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे सूचित केले.

या प्रसंगी प्रमुख वक्ते प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ मा. डॉ. जगदिश नाईक यांनी त्यांच्या भाषणात उपस्थित सर्व श्रोत्यांना मानवी जीवणातील अनेक अडचणी, तणाव, प्रपंचातील विविध प्रश्न, आर्थिक समस्या तसेच सद्य: परिस्थितीतील सामाजिक वातावरणाचा युवा पिढी व वयोवृध्दांवर कशा प्रकारे परिणाम होतो आहे याचे विश्लेषन केले. उपस्थित बंधुभगीनीनां आनंदी जीवन जगण्याचा व सकारात्मक दृष्टिकोन समोर ठेवुन मार्ग काढण्याचा

सल्ला दिला. कुठल्याही बिकट परिस्थितीत मन प्रसन्न व शांत ठेवले तर, मार्ग निश्चितच सापडतो यावर त्यांनी भर दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लाभलेले मा. कांतरावजी देशमुख (कृषिभुषण) यांनी त्यांच्या भाषणात आपले मनोगत व्यक्त करतांना आपले मन नेहमी आनंदी कसे ठेवावे, स्वच्छ कसे राहावे, मानसिक आरोग्य कसे ठेवावे व चांगले कसे वागावे, तनाव मुक्त कसे रहावे असे वेगवेळी उदाहरणे देऊन आपले जिवन कसे आनंदी ठेवावे याचा संदेश दिला.

श्री. विजय कान्हेकर यांनी प्रमुख वक्ते प्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञ मा. डॉ. जगदिश नाईक यांना अश्याच प्रकारे भविष्यात संस्थेतर्फे होणा-या कार्यक्रमात सहभागी होऊन मार्गदर्शन करण्याचे आवाहन केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. कांतरावजी देशमुख (कृषिभुषण) यांचे मनोमन आभार मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण चव्हाळ यांनी केले उपस्थितांचे आभार विलास पानखडे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास समाजातील विविध स्तरांतून ज्येष्ठ नागरिक, युवा-तरुण आणि महिला वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विलास वाकडीकर, संतोष गाजरे, श्रावण वैरागड, शेख कलीम, योगेश जकाते आणि संतोष निर्मळ यांनी परिश्रम घेतले.

- यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई, जिल्हा केंद्र, परभणी व नुतन महाविद्यालय, सेलु यांच्या संयुक्त विद्यमाने, लेक वाचवा लेक वाढवा (स्त्रीभृणहत्या, बाल-विवाह प्रतिबंध जन-जागृती आणि हुंडा-निर्मूलन जन-जागृती काळाची गरज ) जागतीक महिला दिनानिमित्त दिनांक ०८ मार्च, २०२७ रोज शनिवार वेळ स. १०.०० ते दु. १.०० पं. या तरफदार सभागृह, नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी येथे याख्यान व कार्यशाळा हा कार्यक्रम आयोजीत केला होता. या कार्यक्रमाच्या प्रसंगी अध्यक्षस्थानी मा. कांतरावजी देशमुख (कृषिभुषण) यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, परभणी यांच्यासह प्रमुख वक्ते सौ. अर्चना डावरे (लेखिका व कवयित्री), मा. डॉ. विनायकराव कोठेकर, सचिव, नूतन महाविद्यालय शिक्षण संस्था, सेलु, मा. डॉ. उत्तमराव राठोड, प्राचार्य, नूतन महाविद्यालय, सेलु, प्रा. राजाराम झोडगे, गणेश माळवेसर, तसेच यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, परभणीचे विजय कान्हेकर (सचिव) व विलास पानखडे (कोषाध्यक्ष) यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांना पुस्तके भेट देऊन यशवंतराव चव्हाण सेंटरचे विलास पानखडे व विजय कान्हेकर आदिनी पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, यशवंतराव चव्हाण आणि नूतन महाविद्यालयाचे संस्थापक मा. श्रीरामजी भांगडिया यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन व दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

प्रास्ताविक विजय कान्हेकर यांनी केले. यशवंतराव चव्हाण सेंटर तर्फे विविध विभागाअंतर्गत कार्यक्रम व उपक्रम राबवून कशा सक्षमतेने आपले कार्य करत आहे. याचा त्यांनी उल्लेख केला. तसेच स्त्रियांच्या विविध प्रश्नांबाबत जनजागृती व दिव्यांगासाठीही केलेल्या कार्याचा आढावा सांगितला.

यशवंतराव चव्हाण सेंटर अंतर्गत नूतन महाविद्यालयातर्फे दरवर्षी विषेश उपक्रम राबविले जातात. यासाठी हे महाविद्यालय पुरस्काराचे मानकरी आहे.

परभणी व जालना जिल्हा हा मराठवाड्यामध्ये बालविवाहासाठी अग्रगण्य असल्याचा खुलासा केला. समाजाची कितीही प्रगती झाली तरी हुंडाबंदीबद्दल सामाजिक मानसिकता अजूनही बदललेली नाही. याबद्यल उदाहरण देऊन खंत व्यक्त केली.

प्रमुख वक्त्या सौ. अर्चना डावरे यांनी आपले विचार मांडताना स्त्रियांनी शिक्षण हे आधार नाही तर वैचारीक आकार देण्यासाठी असते. याबद्दल प्रतिपादन केले. विविध उदाहरणे देऊन त्यांनी स्त्रीसक्षमीकरणा बद्दल आपले विचार मांडले. तसेच उपस्थितांशी संवाद साधला. तसेच स्वांतत्र्य म्हणजे स्वैराचार नाही तर एक प्रकारची जबाबदारी आहे. असे सांगितले.

समारोपनाच्या भाषणामध्ये अध्यक्ष मा. कांतरावजी देशमुख (कृषिभुषण) यांनी विधवा-परित्यक्त्या महिलासाठी केलेल्या कार्याचा आवर्जून उल्लेख केला या महिलांना समाजात वावरत असतांना मानसन्मान मिळणे जरुरीचे आहे. व त्यांचे ही पुनर्वसन केल्यास महिलांचे सक्षमीकरण होईल असे प्रतिपादन केले.

या प्रसंगी मा. डॉ. विनायकराव कोठेकर सरांनी आजच्या हुडांबंदीबाबतची दिशा नेमकी कोणती आहे. याचा सामाजिक पातळीवर विचार करण्याची गरज आहे. असे म्हटले. तसेच महिला या प्राचीन काळापासून खऱ्या अर्थाने सक्षम होण्यासाठी क्रांती करत आहेत. जागतिक पातळीवर पाहिल्यास भारतामध्ये प्राचिन काळापासुन पावले उचली गेली हे त्यांनी अधोरेखित केले.

या प्रसंगी सेलू येथील महिला मंडळाच्या सौ. कांचन बाहेती, सौ. रमा बाहेती, श्रीमती. ललीता गिल्डा तसेच श्री. गणेश माळवेसर यांचाही सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन करतांना प्रा. राजाराम झोडगे यांनी त्यांच्या भाषणात परभणी जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील सर्व-सामान्य नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या हेतूने कार्यशाळेतील हे विषय आजही समाजातील प्रचलित अशा चुकीच्या रुढी-परंपरा व अंधश्रध्दा यावर प्रकाश टाकतात. समाजाला या सर्व, दिशाहीन करणा-या बाबींविरोधात जन-जागृती करण्याचा मानस यातून व्यक्त होतो. सामाजिक पुरोगामित्वाचा प्रचार आणि प्रसार करण्याचा हा सामूहिक कार्यक्रम आहे असे सांगीतले.

यशवंतराव चव्हाण सेंटरचे श्री. विलास पानखडे यांनी उपस्थित मान्यवर महिला वर्ग, विद्यार्थी, शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग यांचे मन:पुर्वक आभार मानले.

राष्ट्रगीतने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

या कार्यक्रमास समाजातील विविध स्तरातून ज्येष्ठ नागरिक, युवा-तरुण आणि महिला वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नूतन महाविद्यालयांचा शिक्षकवृंद, कर्मचारीवर्ग, श्री. गणेश माळवे सर, विलास वाकडीकर, संतोष गाजरे, शेख कलीम, यांनी परिश्रम घेतले.

## १०.१० जिल्हा केंद्र, बुलढाणा

● "शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रातील राज्याभिषेकाची घटना ही इतिहासाचा प्रवाह बदलण्यास कारणीभूत ठरली. महाराजांच्या मृत्यूनंतरही कित्येक वर्षे मुघलांच्या सत्तेला भिडण्याचे आणि दिल्लीचे तख्त राखण्याचे असामान्य शौर्य व धैर्य मराठे दाखवू शकले याची प्रेरणाबीजे राज्याभिषेकाच्या घटनेत आहेत. राज्याभिषेकाने केवळ राजकीयच नव्हे, तर सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि भाषिक क्षेत्रांतही उत्क्रांती घडली. शिवराय हे केवळ राष्ट्रपुरुष नव्हते तर ते जागतिक स्तरावरील युगपुरुष होते" असे मत चेतन कोळी यांनी व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण सेंटर बुलढाणा केंद्र, शिवराज शिक्षण संस्था अन्त्री तेली व सह्याद्री प्रतिष्ठान मुळशी,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'शिवजागर' या उपक्रमात ते राष्ट्रवादी भवन बुलढाणा येथे दिनांक ८ जून २०२४ रोजी बोलत होते.

शिवराज्याभिषेक सोहळ्यात ३५० वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने बुलढाण्यात शिवजागर सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटक आमदार धीरज लिंगाडे , अध्यक्ष म्हणून ॲडव्होकेट विजय सावळे होते. तर मुख्य वक्ते अनिल पवार, शिवराज्याभिषेक ग्रंथाचे संकल्प व चेतन कोळी लेखक, संपादक व प्रकाशक होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये आयोजक तथा सचिव यशवंतराव चव्हाण सेंटर, नरेश शेळके यांनी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राच्या कार्याबर प्रकाश टाकत सांगितले की शिवरायांचे कार्य फक्त अफजलखानाचा कोथळा काढणे, शाहिस्तेखानाची बोटे कापणे अशा रंजक कथांपुरते मर्यादित नसून त्यांनी जगातील पहिले अलौकिक रयतेचे राज्य निर्माण केले. त्यांच्या कार्याचे विविध पैलू अभ्यासपूर्ण समजून घेणे गरजेचे आहे. या वेळी अनिल पवार यांनी आपल्या व्याख्यानामध्ये शिवराज्याभिषेक, भारताच्या इतिहासातील असामान्य घटना या ग्रंथाच्या निर्मितीबाबत माहिती सांगितली व शिवराज्याभिषेक शासकीय स्तरावर संपूर्ण महाराष्ट्रात साजरा करण्यासाठी केलेल्या केलेल्या पाठपुराव्याबाबत वर्णन केले. या वेळी आमदार धीरज लिंगाडे व विजय सावळे यांची समायोचित भाषणे झाली.

या प्रसंगी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या युवा विभागाच्या प्रमुख डॉ.गायत्री सावजी यांनी शिवरायांच्या कार्याबाबतचा देखावा निर्माण केला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवपूजनानंतर शाहीर सज्जनसिंग व विक्रांत राजपूत या पिता-पुत्रांनी महाराष्ट्र गीत व शिव वंदना सादर करून उपस्थित त्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. रामकृष्ण मस्के, रणजीत सिंगराजपूत, डॉ.अण्णासाहेब म्हळसणे, ज्ञानेश्वर वायाळ, डॉ.विजयाताई काकडे ,शंकर महाराज, डॉ.ज्योती खेडकर, डॉ.गायत्री सावजी ,उर्मिला बावस्कर, विजय गवारगुरू, प्रा. अंजली गाढे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रणजितसिंह राजपूत व उर्मिला बावस्कर यांनी केले. कार्यक्रमाला प्रा. गजानन जाधव, विजयसिंग राजपूत, माधवराव हुडेकर, देविदास जाधव, लक्ष्मी शेळके, अनिता शेळके, अनिल बावस्कर, तुळशीराम काळे, प्रतिभा भुतेकर प्रा. संगीता काळाने, रफिक कुरेशी, विजया कोळसे, यांच्यासह मोठ्या संख्येने श्रोते उपस्थित होते.

● **सामाजिक एकता व देशाची अखंडता टिकविणे युवकांची जबाबदारी**

इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी असंख्य ज्ञात अज्ञात युवकांनी स्वातंत्र्य संग्रामणात

उड्या घेतल्या, स्वातंत्र्य योद्धयांनी लाठ्याकाठ्या खाल्ल्या, तुरुंगवास भोगला, छातीवर गोळ्या झेलल्या, फासावर गेले हुतात्मे पकडले तेव्हा आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. आज आपण स्वातंत्र्याची फळे चाखत असताना स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाची जाण ठेवून आपल्या देशाला घातक असलेल्या प्रवृत्तीपासून सज्ज राहावं. आजच्या युवकाचे कार्य देशहिताचे असावे, सामाजिक एकता व अखंडता टिकविणे ही युवकांची जबाबदारी आहे असे मत नरेश शेळके सचिव, यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा यांनी, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला बुलढाण्यामध्ये आयोजित युवा स्वतंत्र ज्योत रॅली मध्ये केले

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई यांच्या वतीने महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला युवा स्वतंत्र ज्योत रॅली काढल्या जाते. आजच्या युवकांना स्वातंत्र्यवीरांनी केलेल्या जागांची जाण व्हावी या हेतूने खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून काढली जाते. बुलढाणा शहरांमध्ये देखील यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा व शिवराज शिक्षण संस्था अन्त्रि तेली यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या सोळा वर्षापासून युवा स्वतंत्र ज्योत रॅली काढल्या जाते. या वर्षी देखील १४ ऑगस्ट वार बुधवार रोजी रात्री आठ वाजता जयस्तंभ चौक बुलढाणा येथून सदर रॅली काढण्यात आली .रॅलीची सुरुवात बुलढाणा शहराचे ठाणेदार नरेंद्र ठाकरे यांच्या शुभहस्ते ज्योत प्रज्वलित करून करण्यात आली. रॅली ही शहराच्या मुख्य मार्गाने देशभक्तिपर नारे देत हुतात्मा गोरे स्मारक येथे आली. हुतात्मा गोरे स्मारकावरती पुष्पचक्र समर्पित करून देशाच्या स्वातंत्र्यासाठी हुतात्मे पत्करलेल्या हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. अंजली गाडे यांनी केले, तर या वेळी ज्येष्ठ समाजसेविका शाहीना ताई पठाण, प्राचार्य अण्णासाहेब म्हळणे, पीएम जाधव, डॉ. गायत्री सावजी यांनी आपले मनोगत व्यक्त केले सूत्रसंचालन प्रा. दीपक आमले यांनी केले या वेळी डी डी वायाळ माजी गटशिक्षणाधिकारी, डॉ. विजयाताई काकडे, माजी सभापती लक्ष्मी शेळके, ह भ प शंकर महाराज, अनिल बावस्कर, बाळासाहेब एसकर, सत्तर कुरेशी, रामेश्वर मानमोडे, गोपालराव देशमुख, प्रकाश काळवाघे, अनिल कोळसे, प्रा. सचिन खरे नाझीमाताई खान, गजानन भीमशंकर, मनोज चंदन, सुरेंद्र जवरे, संतोष पवार, विनोद गवई, संतोष बोर्डे, सुजित देशमुख, रवींद्र शेळके ,सतीश शेळके, शारदा उबरहंडे, शिवराज शेळके, यांच्यासह मोठ्या संख्येने युवक व नागरिक उपस्थित होते

## १०.११ जिल्हा केंद्र, हिंगोली

- सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय भारत सरकार सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, रिजनल रिसोर्स अँड ट्रेनिंग सेंटर अंतर्गत यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र हिंगोली, महात्मा गांधी सेवा संघ संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र हिंगोली व संजीवनी सेवाभावी संस्था हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमानाने पिढी पिढीतील स्नेहबंध या विषयावर व्याख्यान व मार्गदर्शन डॉक्टर कुलदीप केळकर (सायकॉलॉजीस्ट) व परसराम हेंबाडे सर (राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त) यांनी दिले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. ज्योतीताई कोथळकर होत्या व प्रमुख पाहुणे मीराताई कदम (आदर्श शिक्षक व समाज सेविका), सरस्वती ताई कोरडे (बाल संरक्षण अधिकारी), धनराज कदम सर, सौ. नीलिमा येनकर (प्रकल्प समन्वयक CSSC व RRTC), पुजा शेरे (कार्यक अधिकारी व लेखापाल, निर्मला सार्मत (CSSC RRTC मुख्य कार्यकारी अधिकारी, उपाध्यक्ष व माजी महापौर मुंबई) उपस्थित होते

## १०.१२ जिल्हा केंद्र, जालना

- **अभिसरण : मराठवाडा ते कोकण उपक्रमामध्ये सहभागी युवक यांच्याशी संवाद**

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई युवा विभाग, यांच्यामार्फत आयोजित अभिसरण मराठवाडा ते कोकण या ९ दिवसाच्या अभ्यास दौऱ्यासाठी ज्या युवक व युवती यांनी जालना जिल्हा व परिसर येथून सहभाग नोंदवला होता त्यांनी आज यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई-जालना केंद्राचे अध्यक्ष माजी मंत्री मा. आ. श्री राजेशभैय्या टोपे याची भेट घेतली. या अभ्यास दौऱ्या मार्फत युवकांनी कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर अश्या विविध विकाणी भेटी देऊन सांस्कृतिक, भौगोलिक, राजकीय अनुषंगाने कोकण समजून घेण्याचा प्रयन केला.

या वेळी जिल्हा केंद्र जालना चे सचिव प्रा. डॉ. रावसाहेब ढवळे सर, जिल्हा समन्वयक प्रा. रंजित बायस उपस्थित होते. या दौऱ्यामध्ये आलेल्या अनुभवाच्या आधारे डॉ. मयूर अहिरे या सहभागी युवकाने सादर केलेली कविता

- **प्रा. गणेश शिंदे यांच्या 'जीवन सुंदर आहे' या व्याख्यानपर कार्यक्रमाचे आयोजन**

'जीवन सुंदर आहे' हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई, केंद्र जालनाच्या वतीने घेण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते, मा. प्रा. गणेश शिंदे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी मा. श्री. राजेश भैय्या टोपे, अध्यक्ष यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई केंद्र जालना यांची उपस्थिती लाभली. कन्यादान मंगल कार्यालय तीर्थपुरी येथे हा कार्यक्रम पार पडला.

- **यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र जालना कार्यालयाचे खा सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते उद्‌घाटन**

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या कार्याध्यक्ष सन्माननीय खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते जिल्हा केंद्र जालना कार्यालयाचे उद्‌घाटन करण्यात आले. या वेळी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र जालनाचे सन्माननीय पदाधिकारी सदस्य व समन्वयक यांची उपस्थिती होती.

जिजाऊ जयंतीनिमित्त जिल्हा केंद्राने महिलांसाठी मोफत कर्करोग निदान उपचार मार्गदर्शन शिबिर घेतले. सदरील शिबिरासाठी संजीवनी हॉस्पिटल जालना तसेच, बजाज हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर इथून प्रसिद्ध कॅन्सर तज्ज्ञ डॉ. कल्याण सिंग गोटवाल, अपोलो हॉस्पिटल नवी दिल्लीचे डॉ केतन चंद्रकांत शिरसाठ व सेठ नंदलाल धूत हॉस्पिटलचे संदीप पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

- **यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई, केंद्रास जिल्हा परिषद जालना येथील चौदा विद्यार्थी व सहा शिक्षकांनी भेट दिली.**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र जालना अध्यक्ष मा. राजेश भैय्या टोपे यांच्या पुढाकाराने जिल्हा परिषद जालना येथील काही विद्यार्थी व शिक्षकांची मुंबई केंद्रास भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई केंद्राच्या विविध विभागाची माहिती घेतली व कार्य समजून घेतले. यशवंतराव चव्हाण सेंटर चे माननीय हेमंत टकले सर व मुख्य कार्यकारी अधिकारी दीप्ती नाखले यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण जीवन प्रवाह हा फोटो अल्बम भेट देण्यात आला.

- **'शिक्षक आणि पालक यांची मुलांच्या अभ्यासातील भूमिका' या विषयावर शिक्षण कट्ट्याचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र जालना व सरस्वती भुवन विद्यालय, रांजणी ता घणसांवगी, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने, 'शिक्षक आणि पालक यांची मुलांच्या अभ्यासातील भूमिका' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या शिक्षण कट्टा या कार्यक्रमा मध्ये उपक्रमशील शिक्षण विस्तार अधिकारी, मा रमेश ठाकूर (छ. संभाजी नगर) यांनी उपस्थितांना अंतर्मुख करणारे बहुमोल मार्गदर्शन केले. यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राध्यक्ष माननीय राजेश भैय्या टोपे यांच्या उपस्थितीत या कट्ट्याच्या आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मा. गौतम देशमुख, मा. आबासाहेब वरखडे, मा रवी जोशी, प्रा रावसाहेब ढवळे, प्रा रंजित बायस, मा मधुकर बिन्डारे, मा. जगदीश कुडे, यांची विशेष उपस्थिती होती.

- **युवक नेतृत्व विकास या एक दिवसीय शिबिराचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई, जिल्हा केंद्र जालना यांच्या वतीने युवक नेतृत्व विकास शिबिराचे मत्स्योदरी महाविद्यालय अंबड येथे आयोजित करण्यात आले होते. ग्रामीण भागातील १०० पेक्षा जास्त युवक व युवती यांनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदविला होता. यावेळी प्रसार माध्यमे व ए. आय व आजची तरुणाई, व्यक्तिमत्व विकास व युवकांची जबाबदारी, स्वची ओळख आणि सामाजिक जाणीव, तरुणाई व सोशल मीडिया अशा वेगवेगळ्या विचार सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ. राम चव्हाण सर, मा संदेश लालन, मा. सुनौलभाई रायठ्ठाठा, मा. संदेश लालगे, मा. गजानन दिवाण, सुभाष बोद्रे, ॲड, दीपक कोल्हे, प्रा. शशिकांत पाटील, प्राचार्य डॉ. शहाजी गायकवाड यांनी युवांना मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेसाठी यशवंतराव चव्हाण सेंटरचे सचिव प्रा. डॉ. रावसाहेब ढवळे सर, जिल्हा समन्वयक प्रा. रंजीत बायस, प्रा. शंकर वैद्य, डॉ. दिगंबर भुतेकर, डॉ राम काकडे, डॉ. मयूर अहिरे, शंकर मोरे, शुभम शिंदे, गणेश उढाण, रविकिरण भुतेकर यांचे सहकार्य लाभले.

- **आषाढी वारी - २०२४ या विषयावर प्रसिद्ध छायाचित्रकार मा संदेश भंडारे यांच्या उपस्थितीत छायाचित्र प्रदर्शन व चर्चासत्र**

आषाढी एकादशीनिमित्त आषाढी वारी २०२४ हा कार्यक्रम मंडिल कॉलेज घनसावंगी मुख्य सभागृहात आयोजित करण्यात आला यामध्ये छायाचित्रकार संदेश भेडारे यांनी टिपलेली आषाढी वारीतील जिवंत आकर्षक छायाचित्रे दाखविली गेली. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह तालुक्यातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र जालना आणि मॉडेल कॉलेज धनसावंगी यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आ. राजेश टोपे यांच्यासह प्राचार्य डॉ. राम चव्हाण, डॉ. बळीराम बागल, संतोष मेकाले, प्रा. बी वाय. कुलकर्णी, प्रा. डॉ. लक्ष्मीकांत शिंदे, विनोद जैतमहाल, अनुज बन्सल यांची उपस्थिती होती.

या वेळी उपस्थित प्राध्यापक, विद्यार्थी जिवंत आकर्षक छायाचित्रांच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाला विठूराया बद्दल वाटत असलेल्या आपुलकीचे आपल्या बोलक्या छायाचित्रांतून हुबेहूब वर्णन करून दाखविले आहे. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

## १०.१३ देवराष्ट्रे (जन्म घर)

- दि.१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या एक वर्षाच्या कालावधीत जन्मघर स्मारकास एकूण १५२४ पर्यटकांनी भेटी दिल्या, तसेच विविध ठिकाणच्या ९ जिल्हा परिषद शाळेच्या १९२० विध्यार्थ्यांनी भेटी दिल्या आहेत.

- दि.१८ ऑगस्ट २०२४ रोजी जन्मघर स्मारकामध्ये विठामाता यांचा पुण्यतिथी दिन साजरा करण्यात आला. श्री.पोपटराव महिंद (व्हा.चेअरमन सोनहिरा सह.साखर कारखाना)यांचे हस्ते विठामाता चव्हाण यांच्या फोटो ला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

- दि.२६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत खा. सुप्रिया ताई सुळे यांच्या संकल्पनेतून अभिसरण हा उपक्रम राबवण्यात आला. यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई,यांच्या मार्फत उत्तर महाराष्ट्र ते पश्चिम महाराष्ट्र असा हा दहा दिवसांचा कार्यक्रम होता. या कार्यक्रमा अंतर्गत सांगली जिल्ह्यासाठी ९ मुलांची निवड करण्यात आली होती.शेती, उद्योग, इतिहास, भौगोलिक, ग्रामीण जीवन या सर्व घटकांचा मुलांना अभ्यास करावा या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

- दि.१० नोव्हेंबर २४ रोजी जागतिक विज्ञान दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर केंद्र देवराष्ट्रे व यशवंतराव चव्हाण हायस्कूल यांचे संयुक्त विद्यमाने हायस्कूल मधील मुलांना चित्रकला स्पर्धा, भाषणे, आणि आकलन या विषयावरती हि स्पर्ध घेण्यात आली होती.युवान ग्रह निर्माण संस्थेकडून मुलांना एक शिल्ड व प्रमाणपत्र देण्यात आले.

- दि.२५ नोव्हेंबर २४ रोजी मा.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जन्मघरी मा. शरद (भाऊ)लाड ( क्रांती सह.साखर कारखाना) यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

- दि.२८ नोव्हेंबर २४ रोजी मा.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथी निमित्त महिला अत्याचार आणि त्यावरील कायदे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ॲाड.मयूर जाधव (नाशिक)हे होते.यशवंतराव चव्हाण हायस्कूल व यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई केंद्र देवराष्ट्रे यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

- दि.१२ मार्च २५ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई केंद्र देवराष्ट्रे व यशवंतराव चव्हाण ग्राम विकास प्रबोधिनी देवराष्ट्रे यांचे संयुक्त विध्यामाने यशवंत कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.हे कवी संमेलनाचे १० वर्ष असून या संमेलनास बीड व अबाजोगाई येथून कवी प्रभाकर सालेगावकर,राजेसाहेब

कदम,अतुल कुलकर्णी,प्रा.अनिल चावले हे उपस्थित होते.तसेच सांगली जिल्हा कवी संघटनेचे अध्यक्ष रघुराज मेटकरी ,तसेच पलूस कडेगाव वाळवा तालुक्यातिक कवी या कार्यक्रमास उपस्थित होते.

● दि.१८ जुलै २४ रोजी मा.आ.बच्चू कडू यांनी जन्मघर स्मारकास सदिच्छा भेट दिली. तसेच मा खा. मा.शरदचंद्र पवार साहेबांनी दि. ५ सेप्टेंबर २४ रोजी मा.चव्हाण साहेबांच्या जन्मघर स्मारकास सदिच्छा भेट दिली.या वेळी मा. जयंत पाटील,मा.अरुण लाड,मा.शशिकांत शिंदे,हे देखील उपस्थित होते. तसेच दि. २२ ऑक्टोंबर २४ रोजी मा.आ.रोहित (दादा)पाटील यांनी देखील जन्मघर स्मारकास सदिच्छा भेट दिली.

## १०.१४ जिल्हा केंद्र, रत्नागिरी

● **पालक व पाल्यासाठी मार्गदर्शनपर शिबिर :** यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र रत्नागिरी यांच्या वतीने दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी पालक व पाल्यासाठी मार्गदर्शनपर शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी डॉ. चंद्रशेखर दाभाडकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमास स्कूल कमिटी चेअरमन रवींद्र कालेकर, ए. जी. हायस्कूलचे मुख्याध्यापक कांबळे सर तसेच डॉ. सोनवणे, रत्नागिरी जिल्हा सदस्य सचिन तोडणकर व सचिव अभिजीत खानविलकर उपस्थित होते. सूत्रसंचालन माधव शेट्टी व स्वप्नील उपललकर यांनी केले.

## १०.१५ जिल्हा केंद्र, बीड

● यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र बीड, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, सामाजिक न्याय व अधिकरीता मंत्रालय भारत सरकार, महात्मा गांधी सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाई येथे गरजू दिव्यांगांना मोफत ‘व्हिल चेअर’ चे वितरण करण्यात आले. ई. डी. पी योजनेअंतर्गत हे वितरण करण्यात आले. गरजू दिव्यांगांना हे वितरण स्वा. रा. ती वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकरराव धपाटे सरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी स्वा. रा. ती. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकरराव धपाटे, सर्जरी विभाग प्रमुख डॉ. नितीन चाटे, या केंद्राचे संचालक डॉ. नरेंद्र काळे, डॉ. कचरे, संभाजी लांडे, व्यंकटेश चामनर सर, रानमारे सर, समन्वयक इब्राहिम गवळी, प्रा. रामेश्वर जगदाळे, सलिम शेख इ. उपस्थित होते. या वेळी २३ गरजूंना व्हिल चेअर चे वाटप करण्यात आले. विजय कान्हेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

● यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र बीड व मानवलोक, अंबाजोगाई नारायण दादा काळदाते स्मृती, प्रतिष्ठान अंबाजोगाई यांच्या वतीने अंबाजोगाई तालुक्यातील १५ विविध माध्यमिक शाळांमध्ये ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन व करीयर समुपदेशन करण्यात आले.

प्रसिद्ध करिअर मार्गदर्शक प्रा. कार्तिकस्वामी देवमाने यांनी ग्रामीण भागात शाळेवर जाऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्या वेळी विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न विचारून विविध क्षेत्रांतील करिअर संधींविषयी माहिती करून घेतली. या प्रसंगी डॉ. नरेंद्र काळे, श्री. जी जी. दड व अनिकेत लोहिया उपस्थित होते.

## यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

**यशवंतराव चव्हाण सेंटरच्या प्रकाशनांची यादी खालीलप्रमाणे :**

| | | |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र कृष्णाकांठ/यशवंतराव चव्हाण | ३००/- |
| २. | ऋणानुबंध-यशवंतराव चव्हाण | २५०/- |
| ३. | कृष्णातीरे यशवंतराव चव्हाण की आत्मकथा | ३००/- |
| ४. | कृष्णकाठ/यशवंतराव चव्हाण | ३९५/- |
| ५. | भूमिका / यशवंतराव चव्हाण | २४०/- |
| ६. | यशवंतराव चव्हाण यांची विधिमंडळातील निवडक भाषणे खंड | २५०/- |
| ७. | माझ्या विद्यार्थी मित्रानों. स्व. यशवंतराव चव्हाण यांची दीक्षान्त समारंभातील भाषणे | ३९५/- |
| ८. | सहयाद्रीचे वारे/यशवंतराव चव्हाण | २२५/- |
| ९. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन परिसंवाद /शिंदे अण्णासाहेब | २००/- |
| १०. | यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तीमत्व | १००/- |
| ११. | मार्गदर्शिका ज्येष्ठ नागरिकासाठी (मराठी) | १३५/- |
| १२. | यशवंतराव चव्हाण/महानोर ना.धो यांचे मूळ विचार. | १०/- |
| १३. | यशवंतराव चव्हाण जीवनप्रवाह फोटो अल्बम / प्रधान राम | ६५०/- |
| १४. | यशवंतराव चव्हाण यांची विधीमंडळातील निवडक भाषणे (खंड इंग्रजी) Selected Speeches in the State Legislature/Khobrekar,V.G. | ३००/- |
| १५. | Y.B.Chavan A.Pictoral Biography/Pradjan R.D. | ८५०/- |
| १६. | Handbook for senior citizens (English) | १३५/- |
| १७. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००/- |

**DVD**

| | | |
|---|---|---|
| १८. | एक साठवण यशवंतराव चव्हाण सिडिज इंग्रजी भाग १ | १००/- |
| १९. | एक साठवण यशवंतराव चव्हाण सिडिज इंग्रजी भाग २ | १००/- |
| २०. | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ओडिओ DVD | ४००/- |
| २१. | प्रवासी पक्षी विडीओ DVD | ५००/- |
| २२. | पु.ल. क्रॉनिकल व्हिडिओ DVD | ६००/- |
| २३. | मी एस.एम. विडीओ DVD | ३००/- |
| २४. | यशवंतराव विडीओ DVD | ५००/- |
| २५. | यशवंतराव चव्हाण यांची निवडक भाषणे ओडिओ DVD | १००/- |
| २६. | भूमिका ऑडिओ DVD | १००/- |
| २७. | सहयाद्रीचे वारे या पुस्तकाच्या ओडिओ DVD | १००/- |
| २८. | कृष्णाकांठ या आत्मचरित्राच्या पुस्तकाच्या ओडिओ DVD | १००/- |
| २९. | माझ्या विद्यार्थी मित्रानों.. स्व. यशवंतराव चव्हाण यांची दीक्षान्त समारंभातील भाषणे ओडिओ DVD | १००/- |

## अध्यापन विभाग

| | |
|---|---|
| ३०. शैक्षणिक गुणवत्ता आव्हान आणि आवाहन डॉ. वसंत काळपांडे | २००/- |
| ३१. हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०/- |
| ३२. उपक्रम वेचक-वेधक डॉ. वसंत काळपांडे | १००/- |
| ३३. स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना सुप्रिया सुळे | २०/- |
| ३४. 'संवादिनी' सुप्रिया सुळे | २०/- |
| ३५. 'शाळांचे प्रगतिपुस्तक' डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००/- |
| ३६. शिक्षणवृत्ती डॉ. कुमुद बन्सल | २००/- |
| ३७. शिक्षणकट्टा बसंती रॉय | २००/- |
| ३८. वाटचाल ई-शिक्षणाची बसंती रॉय | २००/- |
| ३९. हवामान बदलास आमचे उत्तर | १००/- |
| ४०. Whats App चर्चा-शिक्षण विकासाच्या संपादक माधव सूर्यवंशी, नितीन खंडागळे, किशोर भागवत | २००/- |
| ४१. सेमी इंग्रजी का आणि कसे ? | २००/- |
| ४२. शालेय प्रशासन आणि मानवी संबंध / डॉ. वसंत काळपांडे | २९९/- |
| ४३. देशोदेशीचे शालेय शिक्षण | ४९९/- |
| ४४. नवीन शैक्षणिक धोरण: प्रश्न मनातले | - |
| ४५. नवोपक्रमांची नवलनगरी / SPIF फेलो | ३५०/- |
| ४६. धोरण कुठवर आलं ग बाई | ५९०/- |

## शरद पवार इन्स्पायर फेलोशिप (साहित्य)

## प्रकाशित पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. | जनुकोशशास्त्र/ असीम अमोल चाफळकर - मधुश्री पब्लिकेशन | ३००/- |
| २. | करुणापटो / मृद्गंधा दीक्षित - मधुश्री पब्लिकेश | २५०/- |
| ३. | आहार/ अमृता देशपांडे - कृष्णा पब्लिकेशन | ३९९/- |
| ४. | ज्वारीची कहाणी/ धनंजय सानप - साधना प्रकाशन | १५०/- |
| ५. | द हाउस ऑफ पेपर/ अभिषेक धनगर - कृष्णा पब्लिकेशन | ३५०/- |
| ६. | खोल खोल दुष्काळ डोळे/ प्रदीप कोकरे - लोकवाडमय गृह | ३००/- |

# Y. B. Chavan Centre
## A Computer Institute

- MS-CIT
- TALLY
- Advanced Certification in Software Engineering (All Graduates)
- Advanced Excel
- Graphic Designing
- Typing - English / Marathi
- PG DAC
- PreCAT
- Hardware & Networking
- Basic Programming Courses
- Mobile Operating Course for Senior Citizens

YASHWANTRAO CHAVAN CENTRE
Serving with Trust and Excellence

AIT
ACADEMY OF INFORMATION TECHNOLOGY

## Admission OPEN

Concession Available



**MS-CIT**
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

**Academy of Information Technology (YCC)**

5th Floor, Y. B. Chavan Centre, Gen. J. Bhosale Marg,
Near Sachivalaya Gymkhana, Opp. Ameeta Bldg;
Nariman Point, Mumbai - 400021.

9769256343 / 8452085815 / 022-22817975

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

## Auditor's Report of YASHWANTRAO CHAVAN CENTRE, MUMBAI
## for the year ended 31st March, 2025

[Annexure to Report under Section 33(2) and Rule 19 of The Bombay Public Trust Act, 1950]

**Opinion**

We have audited the financial statements of, **YASHWANTRAO CHAVAN CENTRE**, **Mumbai** which comprise the Balance Sheet as at March 31, 2025, and the Income and Expenditure Account for the year then ended, a summary of significant accounting policies and other explanatory information. In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the financial statements give the information required by the relevant sections and rules of the Bombay Public Trust Act, 1950 in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:

i. In the case of the Balance Sheet, of the State of Affairs of the Trust as at **31st March, 2025** and
ii. In the case of the Income and Expenditure Account, of the **Surplus** for the year ended on that date.

**Basis for Opinion**

We conducted our audit in accordance with Standards on Auditing (SAs). Our responsibilities under those Standards are further described in the Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements section of our report.

We are independent of the entity in accordance with the ethical requirements that are relevant to our audit of the financial statements, and we have fulfilled our other responsibilities in accordance with these requirements. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

**Responsibilities of Management of Trust and Those Charged with Governance for the Financial Statements**

Trust Management is responsible for the preparation of these financial statements in accordance with accounting standards generally accepted in India necessary to enable the preparation of financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

In preparing the financial statements, management is responsible for assessing the entity's ability to continue as a going concern, disclosing, as applicable, matters related to going concern and using the going concern basis of accounting unless management either intends to liquidate the entity or to cease operations, or has no realistic alternative but to do so.

Those charged with governance are responsible for overseeing the entity's financial reporting process.

**Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements**

Our objectives are to obtain reasonable assurance about whether the financial statements as a whole are free from material misstatement, whether due to fraud or error and to issue auditor's report that includes our opinion. Reasonable assurance is a high level of assurance, but is not a guarantee that an audit conducted in accordance with SAs will always detect a material misstatement when it exists. Misstatements can arise from fraud or error and are considered material if, individually or in the aggregate, they could reasonably be expected to influence the economic decisions of users taken on the basis of these financial statements.

**Report on Other Legal and Regulatory Requirements**

In addition to our report attached in the prescribed form under relevant sections and rules of the Bombay Public Trust Act and subject to notes on the above.

We report that:

(I) We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit.
(ii) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the trust as far as appears from our examination of those books.
(iii) The Balance Sheet and Income and Expenditure Account dealt with by this report are in agreement with the books of account;
(iv) In our opinion, the Balance Sheet and Income and Expenditure Account dealt with by this report comply with the accounting standards to the extent applicable.

**Place: Mumbai**
**Date: 8th September 2025**

**For CVK & ASSOCIATES,**
**Chartered Accountants**
**Firm Regn. No. 101745W**

**sd/-**
**S. Y. Joshi (Partner)**
**Membership No. 032523**

**YASHWANTRAO CHAVAN**
**Balance Sheet**

| Previous Year Rs. | FUNDS & LIABILITIES | Schedule | Rs. | Current Year Rs. |
|---|---|---|---|---|
| | **Trust Fund or Corpus** | | | |
| 11,01,91,342 | Balance as per last Balance Sheet | | 13,52,52,342 | |
| 2,50,61,000 | Add: Corpus Donations | | 30,000 | |
| **13,52,52,342** | | | | **13,52,82,342** |
| | **Other Earmarked Funds:** | | | |
| | Yashwantrao Chavan Centre Building Fund | | | |
| 7,39,79,834 | 1) Contribution Received | | 7,39,79,834 | |
| 3,00,00,000 | 2) Grant Received from Government | | 3,00,00,000 | |
| 5,25,00,000 | 3) Transfer from Income & Expenditure A/C | | 5,25,00,000 | |
| 15,64,79,834 | | | 15,64,79,834 | |
| 11,04,38,715 | Less: Provision of Depreciation on building transferred to income and expenditure as on 1st April,2024. | | 11,30,10,821 | |
| 25,72,106 | Less:Current year-Depreciation on building | | 23,02,970 | |
| **4,34,69,013** | | | | **4,11,66,043** |
| 50,00,000 | Contingency Reserve Fund | | 50,00,000 | |
| 5,00,00,000 | Contingency Fund for Lease Rent | | 5,00,00,000 | |
| - | Contingency Fund for Property Tax | | - | |
| 1,00,00,000 | National & State Awards Fund | | 1,00,00,000 | |
| | Other fund | | | |
| **6,50,00,000** | | | | **6,50,00,000** |
| **8,088** | **Donation Received in Kind - Books** | | | **8,088** |
| | **Current Liabilities** | | | |
| 2,38,436 | For Expenses | **1a** | 9,01,531 | |
| 8,02,91,047 | For Rent and Other Deposits | **1b** | 8,13,74,083 | |
| 2,10,762 | For Sundry Credit Balances | **1c** | 29,892 | |
| 69,137 | GST Liability (after adjusting excess ITC) | **1d** | - | **8,23,05,506** |
| **8,08,09,382** | | | | |
| | **Non Current Liabilities** | **4** | | **-** |
| | **Income & Expenditure Account** | | | |
| | Balance as per last | | | |
| 5,52,89,769 | Balance sheet (Surplus) / Deficit | | 6,72,77,143 | |
| 94,15,267 | Less: (Surplus) of the Year | | 7,99,96,585 | |
| 6,47,05,036 | | | 14,72,73,728 | |
| 25,72,106 | Add: Transfer from Building Fund | | 23,02,970 | |
| **6,72,77,143** | | | | **14,95,76,698** |
| | **Notes to the Accounts** | **12** | | |
| **39,18,15,967** | | | | **47,33,38,676** |

**Place:Mumbai**
**Dated: 8th September, 2025.**

**As per our report of even date**
C.V.K Associates
Chartered Accountants
Firm Registration No. 101745W

**Sd/-**
S.Y.Joshi
(Partner)
Membership No.32523

**CENTRE, MUMBAI** **Charity Comm.Reg. No. F10643**
**As at 31st March, 2025** **Dated 17-9-1985**

| Previous Year Rs. | Property & Assets | Schedule | Rs | Current Year Rs. |
|---|---|---|---|---|
| | **Immoveable Properties** | | | |
| 13,76,57,655 | Opening Balance | **2a** | 14,09,83,577 | |
| 33,25,922 | Add: Additions | | - | |
| - | Less: Deductions | | - | |
| 11,75,82,324 | Less: Accumulated Depreciation | | 11,99,22,449 | |
| **2,34,01,253** | | | | **2,10,61,128** |
| | **Landscaping Work** | | | |
| 27,84,215 | Opening Balance | **2b** | 27,84,215 | |
| - | Add: Additions | | - | |
| -21,76,621 | Less: Accumulated Depreciation | | 22,37,351 | |
| **6,07,594** | | | | **5,46,864** |
| | **Furniture, Fixtures,Generator, Computers & Allied Equipments etc.:** | | | |
| 12,57,60,220 | Opening Balance | **3a** | 13,18,84,601 | |
| 1,15,23,323 | Add: Additions | | 73,39,736 | |
| 53,98,942 | Less: Deductions | | - | |
| 9,40,87,621 | Less: Accumulated Depreciation | | 10,01,46,637 | |
| **3,77,96,980** | | | | **3,90,77,700** |
| | **Library Books:** | | | |
| 76,63,459 | Opening Balance | **3b** | 78,72,400 | |
| 2,08,941 | Add: Additions | | 1,01,322 | |
| 59,52,995 | Less: Accumulated Depreciation | | 61,51,158 | |
| 19,19,405 | | | 18,22,564 | |
| 8,088 | Add: Received as Donation | | 8,088 | |
| **19,27,493** | | | | **18,30,652** |
| | **Y.B.Chavan Film** | | | |
| 1,06,66,981 | Opening Balance | **3c** | 1,06,66,981 | |
| - | Add: Additions | | - | |
| - | Less: Other Deductions | | - | |
| 1,06,66,981 | Less: Accumulated Depreciation | | 1,06,66,981 | - |
| **-** | | | | - |
| **27,44,82,702** | **Investments (at cost)** | **4** | | **35,02,59,185** |
| | **Advances:** | | | |
| 45,85,730 | Employees | **5A** | 41,59,168 | |
| 3,00,93,315 | TDS | **5B** | 3,54,22,254 | |
| 48,34,912 | Others | **5C** | 1,51,848 | |
| **3,95,13,957** | | | | **3,97,33,270** |
| - | Service tax Recoverable from various parties | | - | |
| - | Service tax Receivable - paid under protest | | - | |
| 35,57,248 | Service tax Receivable - paid in advance | | 9,91,111 | |
| - | GST Receivable - Paid in advance | | 6,80,022 | **16,71,133** |
| **35,57,248** | | | | |
| **16,24,928** | **Deposits** | | | **16,18,228** |
| | **Cash & Bank Balances** | | | |
| 78,22,262 | Savings Bank A/c | **6A** | 1,61,41,839 | |
| 9,69,520 | Current Account | **6B** | 12,86,116 | |
| 30,475 | Cash in hand | **6C** | 16,167 | |
| 81,554 | Debit Card Balance | **6D** | 96,394 | |
| **89,03,811** | | | | **1,75,40,516** |
| **39,18,15,967** | | | | **47,33,38,676** |

+ Income outstanding
(if accounts are maintained in cash basis)

**For Yashwantrao Chavan Centre, Mumbai**

| | |
|---|---|
| **Interest** | Rs. 42,39,470/- |
| **Other Income** | Rs. |
| **Total** | Rs. 42,39,470/- |

**Sd/-**
**Aditi Nalawde**
(Treasurer)

**Sd/-**
**Hemant Takle**
(General Secretary)

## YASHWANTRAO CHAVAN
## Income & Expenditure Account

| Previous Year Rs. | Particulars | Schedule | Rs. | Current Year Rs. |
|---|---|---|---|---|
| | **Expenditure in respect of properties** | | | |
| 31,00,648 | Net Rates, Taxes and Cesses | | 24,26,484 | |
| 97,75,615 | Repairs and Maintenance | | 96,03,421 | |
| 54,77,462 | Salaries (Watch & Ward) | | 56,76,812 | |
| 1,86,682 | Insurance | | 1,82,504 | |
| **1,85,40,407** | | | **1,78,89,221** | |
| **1,62,60,306** | **Establishment Expenses** | **7** | **1,79,54,508** | |
| **1,31,16,409** | **GST related Expenses** | **8** | **6,03,068** | |
| **9,35,000** | **Legal & Professional expenses** | | **5,13,717** | |
| **90,000** | **Audit Fees** | | **1,00,000** | |
| | | | 3,70,60,514 | |
| **(3,10,07,478)** | **Less: Reimbursement** | | **1,94,06,674** | |
| **1,79,34,645** | | | | **1,76,53,840** |
| **90,18,442** | **Depreciation** | | | **86,58,044.77** |
| **86,77,665** | **Auditorium Expenses** | **9** | | **72,48,666** |
| | **Expenditure on Objects of Trust:** | | | |
| 1,27,38,982 | Education excluding common expenses and depreciation | | 1,91,21,649 | |
| 1,41,77,702 | Others | **10** | 1,48,50,933 | |
| **2,69,16,684** | | | | **3,39,72,582** |
| | **Net Balances Written Off** | | | **28,31,723** |
| **94,15,267** | **Surplus carried over to Balancesheet** | | | **7,99,96,585.07** |
| | **Notes to the Accounts** | **12** | | |
| **7,19,62,703** | | | | **15,03,61,441** |

**Place:Mumbai**
**Dated: 8th September, 2025.**

**As per our report of even date**
C.V.K Associates
Chartered Accountants
Firm Registration No. 101745W

**sd/-**
**S.Y.Joshi**
(Partner)
Membership No.32523

